# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०७/२०१०** **दिनांक ०४.०७.२०१०**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा रविवार दिनांक ०४.०७.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-८०६०-२०१०, दिनांक २९ जुन, २०१० रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

परंतू काही अपरिहार्य कारणास्तव या सभेच्या वेळेत बदल करण्यात येऊन सदरहू सभा त्याच दिवशी म्हणजे रविवार दिनांक ०४.०७.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजेऐवजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-८०६४-२०१०, दिनांक २९ जुन, २०१० रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक ०४.०७.२०१० रोजी दुपारी ०२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१.मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष
०३. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभग
०४. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०५. मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०६. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे
०७. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०८. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०९. मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये
१०. मा.डॉ.पी.एल.तिवारी
११. मा.सौ.जयश्री विष्णू थोरात

मा.किशोर रा.मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसल्याने अर्धा तास मा.सदस्यांची वाट पाहून नंतर सकाळी ११.३० वाजता सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले. सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत सर्वश्री मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.समि खतिब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया व मा.श्री रमाकान्त गणेश कर्णिक यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा फॅक्स पत्राद्वारे कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **दिनांक २२.०५.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५२२** दिनांक २२.०५.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**निर्णय क्र.४८६**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे टिव्ही चॅनेलवर पर्याय १ व २ ची सुविधा बंद करुन, फक्त संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) विविध चॅनेलमार्फत उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यास दिनांक ०१/०४/२०१० ते दिनांक ३१/०३/२०११ या कालावधीत रुपये वीस लाख + सर्व्हिस टॅक्स रॉयल्टी घेण्यात यावी असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे टिव्ही चॅनेलवर पर्याय १ व २ ची सुविधा बंद करुन, फक्त संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) विविध चॅनेलमार्फत उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यास दिनांक ०१/०४/२०१० ते दिनांक ३१/०३/२०११ **या कालावधीत रुपये वीस लाख + सर्व्हिस टॅक्स घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०१.०६.२०१० रोजी मुंबई येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५२३** दिनांक ०१.०६.२०१० रोजी मुंबई येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

---

**विषय नं.०३** **दिनांक २२.०५.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या छाननी समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.५२४** दिनांक २२.०५.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या छानणी समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

सदरहू सभेत पुरविण्यात आलेल्या **परिशिष्ट "अ"** मधील प्रस्तावित विषयावर अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नसल्याचे मा.उपाध्यक्ष श्री शंकरराव गेणूजी कोल्हे यांनी सांगितले. तद्नंतर सदरहू सभा पुढे ढकलण्यात यावी, असे चर्चेअंती ठरले. तसेच, **परिशिष्ट "ब"** मधील प्रस्तावांबाबत आवश्यक ती कागदपत्रे मागणी करण्यात यावीत. सदरचे कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन, सन २००९-१० चे लेखापरिक्षण झालेनंतर छानणी समितीची पुढील बैठक आयोजित करण्यात यावी, असे ठरले त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.०४ दिनांक २७.०५.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्त .**

**निर्णय क्र.५२५** व्यवस्थापन समितीचे दि. २७.०५.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष यांचे आलेल्या दूरध्वनी निरोपाची नोंद घेणेत आली.

या सभेत खालील विषयांवर चर्चा होऊन शिफारशी करण्यात आल्या.

**०१) श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०१०-११ या वर्षाकरीता वार्षिक औषधे खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणे बाबत**

श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयासाठी सन २०१०-२०११ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे खरेदीकामी अंदाजे रु. २२,८६,८०,२२३/- चे खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०/०१/२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे सभेत वार्षिक औषधे खरेदीकामी संस्थानचे विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात यावे तसेच वेबसाईटवर देखील निविदा टाकण्यात यावी, असे ठरले होते.

त्यानुसार उपरोक्त वार्षिक औषधे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस -मुंबई , महाराष्ट्र टाईम्स-मुंबई, लोकमत- औरंगाबाद, नवभारत- नागपुर तर सकाळ - पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच संस्थानच्या संकेत स्थळावर निविदा टाकण्यात आली होती. त्यानुसार दि.२५/०१/२०१० ते दि. १३/०२/२०१० अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१५/०२/२०१० अखेर ठेवण्यात आलेली होती.तसेच एकुण २३५ कंपन्याना इकडील पत्र क्र.१४५८ दि.२३/०१/२०१० अन्वये जाहिरातीबद्दल अवगत करण्यात आले होते .

परंतू दि.०२.०२.२०१० रोजीच्या प्रशासनाकडून प्राप्त आदेशाप्रमाणे सदर निविदा प्रक्रिया स्थगित ठेवणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या होत्या. त्यानुसार सदरची निविदा प्रक्रिया वर्तमान पत्रात जाहिरात देऊन स्थगित ठेवण्यात आली होती. त्यानंतर दि.३०.०३.२०१० पुन्हा सदर निविदाची प्रक्रिया चालू करणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या होत्या. तेंव्हा पुन्हा ज्या वर्तमान पत्रात औषधे खरेदी करणेबाबतची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती त्याच वर्तमान पत्रात उपरोक्त जाहिरात संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यानुसार दि.०७/०४/२०१० ते दि. २२/०४/२०१० अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४/०४/२०१० अखेर ठेवण्यात आलेली होती.

सदरच्या जाहिरातीस अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालयात एकूण १५६ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे-

| S.N. | Name of Tenderer | S.N. | Name of Tenderer |
|---|---|---|---|
| 1 | Ace Medical Technology, Aurangabad | 79 | Austin Healthcare, Pune |
| 2 | Advance Cardiologix, Mumbai (2 Envelop) | 80 | B.Braun Medical (India) Pvt. Ltd. Mumbai |
| 3 | Advance Technologies, Bhopal | 81 | B.L. Lifesciences Pvt.Ltd., New Delhi |
| 4 | Advance Vascular Technologies,Thane(W) | 82 | Bard India Healthcare(P) Ltd, Mumbai |
| 5 | Affiance Medi Tech Pvt.Ltd, Nashik (2 Envelope) | 83 | Bharat Agencies, Rahuri |
| 6 | Ajinkya Medical Agencies, Ahmednagar | 84 | Bharat Serum & Vaccinces Ltd., Mumbai |
| 7 | Alkem Laboratories Ltd, Mumbai | 85 | Bhawani Enterprises, Ahmedabad |
| 8 | Allwin Life Care, Mumbai | 86 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 9 | Almet Healthcare Pvt.Ltd.,Mumbai | 87 | Biomerieux India Pvt.Ltd., Mumbai |
| 10 | Ambica Drug House, Pune | 88 | Bioshields, Goa |
| 11 | Anand Enterprises, Pune | 89 | Blue Neem Medical Devices Pvt. Ltd., Bangalore |
| 12 | Anant Agencies,Kolhapur | 90 | Cachet Pharmaceuticals Pvt.Ltd., Mumbai |
| 13 | Cadila Pharmaceuticals Ltd., Ahmedabad | 91 | Karwa Agencies, Sangamner |
| 14 | Capro Labs Exports India Pvt.Ltd., Bangalore | 92 | Kaustubh Enterprises, Mumbai |
| 15 | Cardiotech, Pune | 93 | Keps Pharma, Mumbai |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | Chetna Enterprises, Ahmednagar | 94 | Life Care Medical Systems, Pune |
| 17 | Cosmos Enterprises, Mumbai | 95 | M.K.Enterprise, Ahmedabad |
| 18 | Critical Care Systems, Pune | 96 | Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune |
| 19 | Deva Distributor, Shrirampur | 97 | Maureen Surgical Company, Aurangabad |
| 20 | Eccare Pharmaceuticals (P) Ltd., Chennai | 98 | Mediplus Surgicals, Pune |
| 21 | Franco Indian Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai | 99 | Mil Laboratories Pvt.Ltd., Mumbai |
| 22 | Fujifilm India Private Limited, Mumbai | 100 | Milan Enterprises, Ahmednagar |
| 23 | G.G. Medicaid, Ahmednagar | 101 | MRK Healthcare, Mumbai (2 Envelope) |
| 24 | Gagan Pharma, Mumbai | 102 | Munot Medical Agencies, Manmad. |
| 25 | Galaxy Medical Devices Pvt. Ltd., Mumbai | 103 | N.P. Agencies, Mumbai |
| 26 | Gandhi Enterprises, Ahmedngar | 104 | Namoh Agencies,Ahmednagar |
| 27 | Goa Antibiotics & Pharmacuticals Ltd.,Goa | 105 | Navshakti Ayurvedalya Pvt Ltd., Bhusawal |
| 28 | Guru Agencies, Ahmednagar | 106 | New Medicon Pharm Lab.Pvt.Ltd., Secundrabad |
| 29 | Gurukripa Agencies, Kopargaon | 107 | Nirmal Agencies, Ahmednagar |
| 30 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | 108 | Om Agencies, Aurangabad |
| 31 | Harshvaibhav Chem Pharma Pvt.Ltd., Aurangabad | 109 | Om Medical & General Store, Shrirampur (Received on 26.04.10)( 2 Envelope) |
| 32 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | 110 | Om Health Care, Surat |
| 33 | Hestar Diagnostics Pvt.Ltd., Mumbai | 111 | Omni Lens Pvt.Ltd., Ahmedabad |
| 34 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai | 112 | Panacea Biomedicals, Pune |
| 35 | HLL Lifecare Ltd., Mumbai | 113 | Pankaj Pharma, Pune |
| 36 | Human Touch Technologies, Pune | 114 | Pathak Ayurvedic Pharmacy, Nagpur |
| 37 | ICDDIS Pvt.Ltd.,Mumbai | 115 | Peral Trading Co., Mumbai |
| 38 | Icon Meditech Pvt.Ltd.,Nagpur | 116 | Pharmacea Link, Pune |
| 39 | Imaging Products Ind. Ltd., Mumbai | 117 | Pharmaco, Pune |
| 40 | Indu Pharma, Jejuri | 118 | Pharmaveda (I) Pvt.Ltd., Mumbai |
| 41 | Intas Pharmaceuticals, Ltd., Ahmedabad | 119 | Pioneer Enterprises, Ahmednagar |
| 42 | Inter Medics, Mumbai | 120 | R.R. Diagnostics, Dhule |
| 43 | Ives Drugs(India) Pvt. Ltd., Indore | 121 | Radhe Enterprises, Mumbai |
| 44 | J.S.P.Surgical, Nashik | 122 | Rajasthan Distributors, Malegaon |
| 45 | Jae Pharmacy Pvt.Ltd.,Mumbai | 123 | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai |
| 46 | JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon | 124 | Ramco Pharma, Mumbai |
| 47 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Asp Division) | 125 | Regency Life Sciences, Bangalore |
| 48 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethicon Division) | 126 | Relysys Medical Devices Ltd., Ibrahimpatnam (M) R.R. Dist Hyderabad A.P. |
| 49 | Kabra Medicals, Jalgaon | 127 | Renuka Surgical Systems, Aurangabad |
| 50 | Kaivalyam Surgicals, Shrirampur | 128 | Rishab Trading Co, Mumbai |
| 51 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | 129 | RPG Life Sciences Limited, Mumbai |
| 52 | Kapil Medicals, Jalgaon | 130 | S.S.Scientific Co, Dhule |
| 53 | Karnataka Antibiotics & Pharmaceuticals Ltd., Mumbai | 131 | Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat |
| 54 | Sai Enterprises, Ahmednagar | 132 | Snehal Enterprises, Nagpur |
| 55 | Sai Medical Systems, Jalgaon | 133 | Spandan Biotech, Aurangabad. |
| 56 | Sairaj Agencies Paramaceuticals Distributors, Kopargaon | 134 | Spandan Medical System, Pune |
| 57 | Saitrons Medical Equipment, Loni, | 135 | Steranco Health Care Pvt.Ltd., Mumbai |
| 58 | Sanjay Agencies, Ahmednagar.(2 Envelope) | 136 | Sunbeam Glass Works, Mumbai |
| 59 | Bharat Surgical, Rahuri | 137 | Surya Surgi Pharma, Nashik |
| 60 | Sanjivani Medical & Gen. Stores, Ahmednagar | 138 | Sushrut Natural Health Care Pvt.Ltd., Ahmednagar |
| 61 | Sanket Distributors, Pune | 139 | Svizera Health Care, Mumbai |
| 62 | Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai | 140 | Swar Enterprises, Pune |
| 63 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai | 141 | Tirupati Enterprises, Pune |
| 64 | Seva Medical Equipment Pvt. Ltd., Pune | 142 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai |
| 65 | Shalaks Pharmaceuticals Pvt. Ltd., New Delhi | 143 | Trimurti Agencies, Nashik |
| 66 | Shiddheshwar Medical & General Stores, Ahmednagar | 144 | Trimurti Enterprises, Sillod |
| 67 | Shivam Trading Company, Mumbai | 145 | TTK Healthcare Limited, Mumbai |
| 68 | Shri Balaji Medical & Parmaceutical Distributor's, Nashik | 146 | Tyco Healthcare India Pvt. Ltd., Mumbai |
| 69 | Shree Distributors, Aurangabad | 147 | Unimark Remedies Ltd., Mumbai |
| 70 | Shree Enterprises, Pune | 148 | Universal Chemicals, Nashik |
| 71 | Shree Pacetronix Ltd., Pune | 149 | Universal Traders, Pune |
| 72 | Shree Pharma, Shrirampur | 150 | Vascular Concepts Ltd., Mumbai |
| 73 | Shreeji Agency, Shrirampur | 151 | Vascular Solution(India) Pvt.Ltd.,Mumbai |
| 74 | Shreya Enterprises, Ahmednagar | 152 | Vijay Latex Products Pvt.Ltd., Mumbai |
| 75 | Shriram Distributors, Pune | 153 | Vikrant Medical & General Store, Pune |
| 76 | Shushruta Medical Systems, Pune | 154 | Vishal Agencies, Ahmednagar. |
| 77 | Siddhi Medical Distributors, Aurangabad | 155 | Yoga Enterprises, Pune |
| 78 | Sino Care Surgical Pvt.Ltd, Mumbai | 156 | Zenith Surgical Co., Mumbai |

वरीलपैकी अ.नं.१०९ मे.ओम मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, श्रीरामपुर यांची निविदा दि.२६.०४.२०१० रोजी उशीरा प्राप्त झालेली आहे. तसेच मे.अरिहंत केमिस्ट,पुणे यांची निविदा उशिरा

म्हणजे दिनांक २७.०४.२०१० रोजी बंद पाकीटात प्राप्त झालेली होती. ती देखील आजचे सभेपूढे उघडण्यास समितीने मान्यता दिली.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या एकूण १५६ निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना सभेत समक्ष बोलविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात ते आणखी काही सुट देणार किंवा कसे याबाबत लेखी स्वरुपात तपशील देणेबाबत त्यांना सांगण्यात आले. तसेच निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या फेर दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यातील निम्नतम दराचे १,२,३ क्रमांकांच्या, किंवा तांत्रिक बाबींचा निकष लावून त्यातील निवडक निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी पुन्हा बोलविण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करुन निम्नतम दराचे तीन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०२) <u>मे सिमेंन्स कंपनीचे ५०० एमए एक्स-रे मशिनचे एक्स-रे ट्यूब बदलणेकामी प्राप्त कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत</u>**

श्री साईनाथ रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागात ५००MA एक्स-रे मशीनची टयुब खराब झाल्यामुळे बदलणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेच्या दि. १८.०४.२०१० चे सभेतील विषय क्र. ३६ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, एक्स-रे मशीनची टयुब विविध कंपन्याकडून कोटेशन मागणी विहीत पध्दतीने खरेदीस व याकामी येणारे अंदाजे किंमत रु. १,३५,०००/- चे खर्चास मांन्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार खालील पुरवठाधारकांकडुन पत्र पाठवुन कोटेशनची मागणी करण्यात आली होती.

०१) मे. सिमेन्स लि., मुंबई ०२) मे. जी.ई.मेडीकल सिस्टिम्स, पुणे
०३) मे. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमीटेड, पुणे ०४) मे. साई मेडिकल सिस्टीम, नाशिक
०५) मे. एपीटी सर्व्हिसेस, पुणे

वरील पैकी दि. १७.०५.२०१० पर्यंत खालील प्रमाणे बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

०१) मे. सिमेन्स लि., मुंबई ०२) मे. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमीटेड, पुणे

तसेच

मे. एपीटी सर्व्हिसेस, पुणे यांचे कोटेशन दि. ०६.०५.२०१० रोजी प्रशासन शाखेकडून उघडून प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता एकही कोटेशन्ससादरकर्ते चर्चा/वाटाघाटीस उपस्थित नव्हते. त्यांनी देऊ केलेले दर खालीलप्रमाणे

| अ.न | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपये (सर्व करांसहीत) |
|---|---|---|
| ०१ | मे. सिमेन्स लि., मुंबई | १,३५,०००/- |
| ०२ | मे. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमीटेड, पुणे | ७६,५००/- + ट्रान्सपोर्ट चार्जेस |
| ०३ | मे. एपीटी सर्व्हिसेस, पुणे | १,०५,१८७/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमीटेड, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०३) <u>जाहिरातीच्या खर्चास मान्यता मिळणे बाबत</u>**

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०४) श्री <u>साईबाबा हॉस्पिटलमधील नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता स्प्लिट ए.सी खरेदी बाबत.</u>**

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व श्री साईनाथ रुग्णलयातील ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु., जनरल आय.सी.यु. इ. तातडीने कार्यान्वित करणेकामी स्थानिक विश्वस्त समितीस व वैद्यकिय संचालक यांना सदरचे ओ. टी. व आय.सी.यु. साठी लागणारे मशिनरी / उपकरणे / फर्निचर / इन्स्ट्रुमेंट / किरकोळ साहित्य इ. सर्व प्रकारचे खरेदीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

त्यानुसार तीनही ऑपरेशन थिएटर विभाग व आय.सी.यु. साठी लागणारी आवश्यक मशिनरी / उपकरणे / फर्निचर / इन्स्ट्रुमेंट / किरकोळ साहित्य इत्यादीची यादी तयार करण्यात आली असून त्यासाठी अंदाजे खर्च रु.३,००,७२,५००/- (अक्षरी रु. तीन कोटी बहात्तर हजार पाचशे मात्र) चे खर्चास व वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदीस दि.११/०३/२०१० चे स्थानिक विश्वस्त समितीचे सभेत मान्यता मिळालेली

आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या असून त्यापुढील कार्यवाही चालु आहे.

याशिवाय सदरचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागालगतच्या खोल्यामध्ये सहा ते आठ खाटांचे आय.सी.यु. बनावयाचे आहे. त्यासाठी प्रत्येक खाटाजवळ प्रत्येक रुममध्ये Split A/C बसवावे लागणार आहे. उपरोक्त Split A/C प्रत्यक्ष पाहणी करुन किती टन क्षमतेचे बसवावे याबाबत विदयुत विभागाकडुन इकडील पत्र दि. ३०/०४/२०१० अन्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार विदयुत विभागाने दि. १३/०५/२०१० चे पत्रान्वये प्रत्यक्ष पाहणी करुन पुर्वी असलेले ए.सी. विचारात धरुन व्होल्टास कंपनीचे, व्हर्टीस प्लस मॉडेल प्रत्येकी २ टन क्षमतेचे ०९ Split A/C बसवावे असा अहवाल दिलेला आहे. त्यानुसार २ टन क्षमतेचे ०९ नग Split A/C खरेदीकामी अंदाजे प्रती नग रु. ३०,०००/- याप्रमाणे रु. २,७०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता ०९ नग Split A/C खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,७०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०५) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकडील शिक्षक रिक्त पदांसाठी शिक्षण सेवक नेमणूकीबाबत**

श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल हे सन १९९० साली सुरु झालेले असून शाळेत ज्यु.केजी ते इ. १० वी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेत पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक असे विभाग आहेत. दिवसेंदिवस शाळेत विद्यार्थ्यांचे संख्येत वाढ होत असून नैसर्गिक वाढीने व विद्यार्थी संख्येतील वाढीमुळे जादा तुकडया तयार होत आहेत. त्यासाठी वरील विभागाचे आवश्यकतेनुसार वर्ग/तुकडीसाठी शिक्षकांची नेमणूक करावी लागणार आहे.

दि.१८.०४.२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३८० अन्वये केजी विभागासाठी ०२, इ. १ ली ते ४ थी साठी ०३, तर इ. ५ वी ते ७ वी साठी ०२ शिक्षण सेवक नेमणूक करणेकामी मान्यता मिळालेली आहे.

सन २०१०-११ मध्ये ज्यु केजीच्या ०६ तुकडया व सि.केजी या वर्गाच्या ०३ तुकडया अशा केजी विभागाच्या ०९ तुकडया होणार आहे. आपल्या कडे केजी विभागासाठी ०४ कायम कर्मचारी शिक्षीका उपलब्ध आहेत. सन २००९-१० करीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०८.२००९ व ०६.०३.२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक अनुक्रमे ७०८ व ३२१ अन्वये जाहिरातीव्दारे अर्ज मागणी करुन मुलाखतीव्दारे खालील ०४ शिक्षण सेविकांची ११ महिन्याकरीता नेमणूक करण्यात आलेली होती.

०१) श्रीमती डांगे योगिता गोरक्ष ०२) श्रीमती गाडेकर शितल अंबादास
०३) श्रीमती लबडे उज्वला भागचंद ०४) श्रीमती कोटकर सविता राधाकिसन

वरील ०४ शिक्षण सेविकांचे काम समाधानकारक असून वर्तणूक चांगली आहे. सबब या ०४ शिक्षीकांना सन २०१०-११ करीता ११ महिन्याकरीता नेमणूक देता येईल. या ०४ शिक्षण सेविकांना सन २०१०-११ मध्ये ११ महिन्याकरीता नेमणूका दिल्यास आपल्याकडे ०८ शिक्षक उपलब्ध होतात व आणखी ०१ शिक्षण सेविकेची आवश्यकता लागणार आहे. त्यासाठी जाहिरात देवून अर्ज मागणी करुन मुलाखतीव्दारे नेमणूक करता येईल. वरील ०४ शिक्षण सेविकांची सन २०१०-११ मध्ये ११ महिन्या करीता पुन्हा नेमणूक करणेत यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**(०६) प्लॅस्टिक पिशवी दरामधील व्हॅट बाबत-**

सन २०१०-११ करिता प्रसादालयासाठी आवश्यक प्लॅस्टिक पिशवी वार्षिक दर पद्धतीने खरेदीकामी विहित पद्धतीने जाहिरात प्रसिद्ध करुन, नमुने व निविदा मागवून तसेच दि.०३.०४.२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन मंडळाचे उपसमिती सदस्यांसमोर झालेल्या चर्चेनुसार पुरवठाधारकांनी खालीलप्रमाणे सुट दर देऊ केले होते.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | मुळ दर | मा.व्य.मंडळाचे सभेत चर्चेच्या वेळी देऊ केलेले निव्वळ दर |
|---|---|---|---|
| **अ** | **प्लॅस्टिक पिशवी ४x६ प्लेन व्हर्जीन फुड ग्रेड एलडी** | | **मागणी ३५ क्विंटल** |
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | १०,०००/- | **९,८००/-** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | १०,७००/- | १०,५००/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | १०,७००/- | १०,०००/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | १०,२००/- | ९,८७५/- |
| **ब** | **प्लॅस्टिक पिशवी ५x६.५ लाडूसाठी, ४ रंगात छपाई, २०० गेज पीपी मागणी ४२० क्विंटल** | | |
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | १२,०००/- | **१०,३००/-** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | १२,९००/- | १२,७००/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | १३,०००/- | १२,५००/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | ११,४००/- | १०,४००/- |

| क | प्लॅस्टिक पिशवी ८x१० छपाईसह १ रंगात व्हर्जीन फुड ग्रेड, १०० गेज एलडी मागणी १५० क्विंटल | | |
|---|---|---|---|
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | ११,०००/- | **१०,२००/-** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | ११,५००/- | ११,२००/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | ११,५००/- | १०,७००/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | १०,८००/- | १०,३००/- |

मे.सरस प्लॅस्टिक यांनी दिलेली सुट स्विकारुन त्यांचे दर न्युनतम असल्याने त्यांना इकडील जा.नं.६०६७/१९.०४.२०१० अन्वये वार्षिक माल पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

इकडील माल मागणी चलनान्व्ये मालाची मागणी नोंदविली असता त्यांनी मालाचा पुरवठा सुरु केला आहे. परंतू त्यांनी त्यांचेकडील पत्रान्वये त्यांनी दि.०३.०४.२०१० रोजीच्या मा.व्य.मंडळाचे सभेत देऊ केलेले सुट दर हे व्हॅटसह नसुन निव्वळ दर आहेत व त्या दरावर शासन निर्णयानुसार व्हॅट आकारणी करुन सुधारित पुरवठा आदेश देणेबाबत विनंती केली आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | मुळ दर प्रती क्विंटल | मा.व्य.मं.सभेत देऊ केलेले निव्वळ दर | ५ % व्हॅटसह दर |
|---|---|---|---|---|
| **अ** | **प्लॅस्टिक पिशवी ४x६ प्लेन व्हर्जीन फुड ग्रेड एलडी मागणी ३५ क्विंटल** | | | |
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | १०,०००/- | **९,८००/-** | **१०,२९०/-** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | १०,७००/- | १०,५००/- | ११,०२५/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | १०,७००/- | १०,०००/- | १०,५००/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | १०,२००/- | ९,८७५/- | १०,३६८.७५ |
| **ब** | **प्लॅस्टिक पिशवी ५x६.५ लाडूसाठी, ४ रंगात छपाई, २०० गेज पीपी मागणी ४२० क्विंटल** | | | |
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | १२,०००/- | **१०,३००/-** | **१०,८१५/-** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | १२,९००/- | १२,७००/- | १३,३३५/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | १३,०००/- | १२,५००/- | १३,१२५/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | ११,४००/- | १०,४००/- | १०,९२०/- |
| **क** | **प्लॅस्टिक पिशवी ८x१० छपाईसह १ रंगात व्हर्जीन फुड ग्रेड, १०० गेज एलडी मागणी १५० क्विंटल** | | | |
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | ११,०००/- | **१०,२००/-** | **१०,७१०/-** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | ११,५००/- | ११,२००/- | ११,७६०/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | ११,५००/- | १०,७००/- | ११,२३५/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | १०,८००/- | १०,३००/- | १०,८१५/- |

त्यानंतर खरेदी विभागाकडील दि.११.०५.२०१० रोजीचे टिपणीन्वये द्वितीय न्युनतम धारक मे. आर्युदेय प्लॅस्टिक इंडस्ट्रीज, कोल्हापुर यांना व्हॅट संदर्भात विचारणा केली असता त्यांनी त्यांचे दि.२०.०५.२०१० रोजीच्या पत्रान्वये चर्चेत देऊ केलेल्या निव्वळ दरावर ५% व्हॅट लागेल असे सांगितले आहे. त्यानुसार ५% व्हॅट देऊ केल्यास पुढीलप्रमाणे दर ग्राह्य राहातील.

उपरोक्त ५% व्हॅटसह दर देऊ केल्यास मे.सरस प्लॅस्टिक, अहमदनगर यांचे दर हे न्युनतम असून मे.आर्युदेय प्लॅस्टिक इ., कोल्हापुर हे द्वितीय न्युनतमधारक आहेत.

तरी सदर ठरावामध्ये दुरुस्ती होऊन, प्लॅस्टिक पिशवीचे दर हे चर्चेमध्ये ठरलेले निव्वळ दर + व्हॅट असे ग्राह्य धरावे व त्यानुसार न्युनतम दर धारकास पुरवठा आदेश पारित करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली . (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**(०७) मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**आजचे सभेत मा.विश्वस्तांनी खालीलप्रमाणे सूचना मांडल्या-**

**(०१)** अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी नवीन बेंचेस खरेदीकामी प्राप्त झालेले बेंचेसचे नमुन्यांची पहाणी उपसमितीचे सदस्यांनी केली. पहाणीनंतर संस्थानचे शैक्षणिक संकुलातील बेंचेसचे मोजमापाप्रमाणे विद्यार्थ्यांना बसण्यांस सोईस्कर अशा मापांचे बेंचेस खरेदी करावेत. तसेच बेंचेसचा टॉप हा सागवाणी लाकडाचा असावा,जेणेकरुन खराब होणार नाही व बेंचेसची जोडणी ही नटबोल्टचे ऐवजी वेल्डिंगची असावी. एकूणच भविष्यात बेंचेसची देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी सोपी असतील अशी जोडणी असलेले बेंचेस पुरवावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी/प्राचार्य,आय.टी.आय)

**(०२)** नियोजित साईउद्यान गार्डन उभारणी करतांना गार्डनमध्ये कोणते तंत्रज्ञान वापरले जावे तसेच गार्डनमधील मनोरंजनात्मक बाबी यावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन नंतरच निर्णय घेण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०५ दिनांक १०.०६.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.५२६** व्यवस्थापन समितीचे दि. १०.०६.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१) श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०१०-११ चे वार्षिक औषधे खरेदीकामी निविदाधारकांनी देऊ केलेले सुटीचे दरपत्रके उघडणेकामी प्राप्त झालेले दरपत्रके उघडणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे २०१०-२०११ चे वार्षिक औषधे खरेदी कामी प्राप्त झालेल्या एकूण १५७ निविदा उपसमिती सभा दि.२७.०५.२०१० चे सभेत उघडण्यात आल्या होत्या त्याच दिवशी सर्व निविदा धारकांना चर्चा वाटाघाटी कामी सभेपुढे समक्ष बोलवण्यात आले होते. त्यानुसार दि. २७.०५.२०१० चे सभेपुढे एकूण १११ निविदाधारक उपस्थित होते. सदर निविदा धारकांना सभेपुढे एकत्रीत बोलावून त्यांना सांगणेत आले की,आपण सादर केलेल्या सिलबंद निविदेमध्ये आपण जे काही दर दिलेले आहेत. त्यामध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ ही दोन्ही धर्मदाय रुग्णालये - असल्याने आपण दिलेल्या मुळ दरावर आणखी किती सुट देऊ शकतात ती एका पत्रावर लिहून बंद पाकिटात देण्यात यावी असे सांगण्यात आले. त्यानुसार एकूण १११ निविदा धारकांनी बंद पाकिटात त्यांनी सुट दिलेली होती. तसेच १० निविदाधारकांनी फॅक्स व्दारे सुट दिलेली होती. ती एका पाकिटात बंद करण्यात आली होती अशी सर्व पाकिटे हि एका पाकिटात सिलबंद करुन ती आजचे सभेत उघडण्यात आली.

उपरोक्त प्रमाणे उघडलेल्या पाकिटात दिलेल्या सुटीचा तपशील खालीलप्रमाणे -

| S.N. | Name of Tenderer | Discount | S.N. | Name of Tenderer | Discount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Ace Medical Technology,Aurangabad | 3% | 80 | Austin Healthcare, Pune | Absent |
| 2 | Advance Cardiologix, Mumbai | Item wise | 81 | B.Braun Medical (India) Pvt. Ltd. Mumbai | Item wise |
| 3 | Advance Technologies, Bhopal | Item wise | 82 | B.L. Lifesciences Pvt.Ltd., New Delhi | Absent |
| 4 | Advance Vascular Technologies,Thane(W) | Item wise | 83 | Bard India Healthcare(P) Ltd, Mumbai | 2.5% |
| 5 | Affiance Medi Tech Pvt.Ltd, Nashik | Item wise | 84 | Bharat Agencies, Rahuri | item wise |
| 6 | Ajinkya Medical Agencies, Ahmednagar | Nill | 85 | Bharat Serum & Vaccinces Ltd., Mumbai | Absent |
| 7 | Alkem Laboratories Ltd, Mumbai | 5% | 86 | Bhawani Enterprises, Ahmedabad | 1% by fax |
| 8 | Allwin Life Care, Mumbai | Item wise by fax | 87 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai | Item wise |
| 9 | Almet Healthcare Pvt.Ltd.,Mumbai | Item wise | 88 | Biomerieux India Pvt.Ltd., Mumbai | Absent |
| 10 | Ambica Drug House, Pune | 1% | 89 | Bioshields, Goa | 12% |
| 11 | Anand Enterprises, Pune | Absent | 90 | Blue Neem Medical Devices Pvt. Ltd., Bangalore | 10% |
| 12 | Anant Agencies,Kolhapur | Nill | 91 | Cachet Pharmaceuticals Pvt.Ltd., Mumbai | Item wise |
| 13 | Cadila Pharmaceuticals Ltd., Ahmedabad | 1% | 92 | Karwa Agencies, Sangamner | Absent |
| 14 | Capro Labs Exports India Pvt.Ltd., Bangalore | Absent | 93 | Kaustubh Enterprises, Mumbai | Absent |
| 15 | Cardiotech, Pune | Item wise | 94 | Keps Pharma, Mumbai | 1% |
| 16 | Chetna Enterprises, Ahmednagar | Item wise | 95 | Life Care Medical Systems, Pune | 1% |
| 17 | Cosmos Enterprises, Mumbai | 1% | 96 | M.K.Enterprise, Ahmedabad | 2% by fax |
| 18 | Critical Care Systems, Pune | Nill | 97 | Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | Absent |
| 19 | Deva Distributors, Shrirampur | Item wise | 98 | Maureen Surgical Company, Aurangabad | 3% |
| 20 | Eccare Pharmaceuticals (P) Ltd., Chennai | Absent | 99 | Mediplus Surgicals, Pune | 2% |
| 21 | Franco Indian Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai | Absent | 100 | Mil Laboratories Pvt.Ltd., Mumbai | Item wise |
| 22 | Fujifilm India Private Limited, Mumbai | Item wise | 101 | Milan Enterprises, Ahmednagar | Absent |
| 23 | G & G. Medicaid, Ahmednagar | Nill | 102 | MRK Healthcare, Mumbai | Item wise by fax |
| 24 | Gagan Pharma, Mumbai | Absent | 103 | Munot Medical Agencies, Manmad. | Nill |
| 25 | Galaxy Medical Devices Pvt. Ltd., Mumbai | Item wise | 104 | N.P. Agencies, Mumbai | Item wise |
| 26 | Gandhi Enterprises, Ahmedngar | Nill | 105 | Namoh Agencies,Ahmednagar | Absent |
| 27 | Goa Antibiotics & Pharmaceuticals Ltd.,Goa | 5% by fax | 106 | Navshakti Ayurvedalaya Pvt Ltd., Bhusawal | 10% |
| 28 | Guru Agencies, Ahmednagar | 2% | 107 | New Medicon Pharm Lab.Pvt.Ltd., Secundrabad | Absent |
| 29 | Gurukrupa Agencies, Kopargaon | 1% | 108 | Nirmal Agencies, Ahmednagar | 2% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 30 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | Absent | 109 | Om Agencies, Aurangabad | Absent |
| 31 | Harshvaibhav Chem Pharma Pvt.Ltd., Aurangabad | 3% | 110 | Om Medical & General Store, Shrirampur | Absent |
| 32 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | Item wise | 111 | Om Health Solutions pvt.Ltd., Surat | Item wise |
| 33 | Hestar Diagnostics Pvt.Ltd., Mumbai | Item wise | 112 | Omni Lens Pvt.Ltd., Ahmedabad | Item wise |
| 34 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai | 2% | 113 | Panacea Biomedicals, Pune | Item wise |
| 35 | HLL Lifecare Ltd., Mumbai | Absent | 114 | Pankaj Pharma, Pune | Absent |
| 36 | Human Touch Technologies, Pune | Item wise | 115 | Pathak Ayurvedic Pharmacy, Nagpur | Item wise |
| 37 | ICDDIS Pvt.Ltd.,Mumbai | Item wise | 116 | Pearl Trading Co., Mumbai | Item wise |
| 38 | Icon Meditech Pvt.Ltd.,Nagpur | Item wise | 117 | Pharmacea Link, Pune | Absent |
| 39 | Imaging Products (India).pvt. Ltd., Mumbai | 2% | 118 | Pharmaco, Pune | Absent |
| 40 | Indu Pharma, Jejuri | 1% by fax | 119 | Pharmaveda (I) Pvt.Ltd., Mumbai | Nill |
| 41 | Intas Pharmaceuticals, Ltd., Ahmedabad | Nill | 120 | Pioneer Enterprises, Ahmednagar | 2% |
| 42 | Inter Medics, Mumbai | Nill | 121 | R.R. Diagnostics, Dhule | Nill by fax |
| 43 | Ives Drugs(India) Pvt. Ltd., Indore | Nill | 122 | Radhe Enterprises, Mumbai | Item wise |
| 44 | J.S.P.Surgical, Nashik | Item wise | 123 | Rajasthan Distributors, Malegaon | 1% |
| 45 | Jae Pharmacy Pvt.Ltd.,Mumbai | Item wise | 124 | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai | Item wise |
| 46 | JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon | 1% | 125 | Ramco Pharma, Mumbai | Item wise |
| 47 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Asp Division) | Nill | 126 | Regency Life Sciences, Bangalore | 1% |
| 48 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethicon Division) | Nill | 127 | Relisys Medical Devices Ltd., Ibrahimpatnam (M) R.R. Dist. Hyderabad A.P. | Item wise |
| 49 | Kabra Medicals, Jalgaon | Item wise | 128 | Renuka Surgical Systems, Aurangabad | Item wise |
| 50 | Kaivalyam Surgicals, Shrirampur | Item wise | 129 | Rishab Trading Co, Mumbai | 1% |
| 51 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | Nill | 130 | RPG Life Sciences Limited, Mumbai | Nill |
| 52 | Kapil Medicals, Jalgaon | Item wise | 131 | S.S.Scientific Co, Dhule | Nill by fax |
| 53 | Karnataka Antibiotics & Pharmaceuticals Ltd., Mumbai | Nill by fax | 132 | Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat | Item wise |
| 54 | Sai Enterprises, Ahmednagar | 2% | 133 | Snehal Enterprises, Nagpur | Absent |
| 55 | Sai Medical Systems, Jalgaon | Item wise | 134 | Spandan Biotech, Aurangabad. | Item wise |
| 56 | Sairaj Agencies, Kopargaon | Item wise | 135 | Spandan Medical Systems, Pune | Item wise |
| 57 | Saitrons Medical Equipment, Loni, | 5% | 136 | Steranco Health Care Pvt.Ltd., Mumbai | Item wise |
| 58 | Sanjay Agencies, Ahmednagar. | 1% | 137 | Sunbeam Glass Works, Mumbai | Absent |
| 59 | Bharat Surgicals, Rahuri | Nill | 138 | Surya Surgi Pharma, Nashik | Item wise |
| 60 | Sanjivani Medical & Gen. Stores, Ahmednagar | Absent | 139 | Sushrut Natural Health Care Pvt.Ltd., Ahmednagar | 5% |
| 61 | Sanket Distributors, Pune | 1% | 140 | Svizera Health Care, Mumbai | Absent |
| 62 | Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai | Absent | 141 | Swar Enterprises, Pune | 1% |
| 63 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai | Nill | 142 | Tirupati Enterprises, Pune | Item wise |
| 64 | Seva Medical Equipment Pvt. Ltd., Pune | 5% | 143 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai | Item wise |
| 65 | Shalaks Pharmaceuticals Pvt. Ltd., New Delhi | Nill | 144 | Trimurti Agencies, Nashik | 0.5% |
| 66 | Shiddheshwar Medical & General Stores, Ahmednagar | Absent | 145 | Trimurti Enterprises, Sillod | Nill |
| 67 | Shivam Trading Company, Mumbai | Item wise | 146 | TTK Healthcare Limited, Mumbai | 2% |
| 68 | Shri Balaji Medical & Pharmaceutical Distributor's, Nashik | 6% | 147 | Tyco Healthcare India Pvt. Ltd., Mumbai | 2% |
| 69 | Shree Distributors, Aurangabad | Absent | 148 | Unimark Remedies Ltd., Mumbai | Item wise |
| 70 | Shree Enterprises, Pune | Absent | 149 | Universal Chemicals, Nashik | 1.5% |
| 71 | Shree Pacetronix Ltd., Pune | 4% | 150 | Universal Traders, Pune | Absent |
| 72 | Shree Pharma, Shrirampur | Absent | 151 | Vascular Concepts Ltd., Mumbai | Item wise |
| 73 | Shreeji Agency, Shrirampur | Company wise | 152 | Vascular Solution(India) Pvt.Ltd.,Mumbai | 5% |
| 74 | Shreya Enterprises, Ahmednagar | Absent | 153 | Vikrant Medical & General Store, Pune | 1% |
| 75 | Shriram Distributors, Pune | 2% | 154 | Vishal Agencies, Ahmednagar. | Nill |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 76 | Shushruta Medical Systems, Pune | 3% | 155 | Yoga Enterprises, Pune | Item wise |
| 77 | Siddhi Medical Distributors, Aurangabad | Absent | 156 | Zenith Surgical Co., Mumbai | Nill by fax |
| 78 | Sino Care Surgical Pvt.Ltd, Mumbai | Nill | 157 | Arihant Chemist, Pune | Nill |
| 79 | Vijay Latex Products Pvt.Ltd., Mumbai | 1% | | | |

उपरोक्त उघडलेल्या दरपत्रकाबाबत खालीलप्रमाणे शिफारसी मान्य करण्यात आल्या.

०१) एकूण १५७ निविदा धारकांपैकी **१)** Intas Pharmaceuticals, Ltd., Ahmedabad **२)** Anand Enterprises, Pune **३)** Arihant Chemist, Pune यांनी निविदा सोबत अनामत रक्कम जमा केलेली नाही त्यामुळे त्यांच्या निविदा अपात्र ठरवण्यात यावी तर Anant Agencies,Kolhapur, Svizera Health Care, Mumbai यांनी संकेतस्थळावरुन निविदा घेतलेली आहे. परंतु निविदेसोबत निविदा फॉर्मची किंमत जमा केलेली नाही परंतु अनामत रक्कम दिलेली असल्यामुळे त्यांची निविदा पात्र ठरविण्यात येऊन सदर निविदा धारकांकडून निविदा फॉर्म किंमत भरुन घ्यावी.

०२) मागील वर्षी सी.टी.स्कॅन, एम आर आय, डीजीटल एक्स रे मशीन साठी लागणाऱ्या क्ष किरण फिल्म खरेदीकामी तीन वर्षासाठी निर्मल एजन्सी, अहमदनगर यांचे बरोबर करार नामा करण्यात आलेला आहे. त्याच दराने पुढे खरेदी चालू ठेवण्यात यावी.

०३) औषधांचा तुटवडा भासू नये म्हणून आवश्यक तेथे औषधांची वाढ सुचविण्यात यावी.

०४) तसेच ज्या साहित्याची / औषधांची किंमत जास्त आहे अशा काही निवडक औषधे / साहित्यासाठी तांत्रीक बाबी, किंमत, नामांकित कंपनी, इ. चा विचार करुन ज्या ठिकाणी त्यांना एक, दोन किंवा तीन किंवा त्यापेक्षा जास्त निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले असतील अशा ठिकाणी कमीत कमी तिन निविदा धारकांची निवड करुन त्यांना समीतीच्या पुढील सभेपुढे चर्चा / वाटाघाटी साठी बोलावण्यात यावे.

०५) ज्या ठिकाणी नामांकित कंपनी किंवा तांत्रीक दृष्टया योग्य आहे व तेथे दर देखील निम्नतम प्राप्त झालेले आहे. तेथे त्यांची खरेदीसाठी शिफारस करण्यात यावी.

०६) उपरोक्त प्रक्रियेसाठी वैद्यकीय संचालक यांनी मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर यांचे मार्गदर्शन घ्यावे.

०७) औषधांचे वापरासंबंधी Consultant यांचे सोबत चर्चा करावी. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०२) नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व I.C.C.U. मध्ये वायरींग काम करणेबाबत ...**

श्री साईबाबा हॉस्पीटलमधील नेत्र विभागाचे (Opthal Department) ठिकाणी नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व ७-८ खाटांचे I.C.C.U. कक्ष तयार करावयाचे आहे. या Operation Theator व I.C.C.U. मध्ये मशिनरीकरीता विद्युत पुरवठा करणेकरीता Power point / plug switch board wiring करुन दयावयाची आहे. Power point / plug switch board करीता कराव्या लागणा-या कामाचा व येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. | 400 Mtr. | 44.10 | 17,640.00 |
| 02 | 1-3-2 | Supplying & erecting mains with 2x1.5sq.mm. F.R.L.S. solid copper PVC insulated wire. | 200 Mtr. | 40.95 | 8,190.00 |
| 03 | 1-3-4 | Supplying & erecting mains with 2x2.5sq.mm. F.R.L.S. stranded/solid copper PVC insulated wire. | 300 Mtr. | 44.10 | 13,230.00 |
| 04 | 1-3-4 | Supplying & erecting mains with 1x2.5sq.mm. F.R.L.S. stranded/solid copper PVC insulated green wire for earth. | 900 Mtr. | 22.05 | 19,845.00 |
| 05 | 1-3-6 | Supplying & erecting mains with 2x4sq.mm. F.R.L.S. stranded solid copper PVC insulated wire. | 600 Mtr. | 60.90 | 36,540.00 |
| 06 | 5-3-2 | Suppling,erecting & marking SPMCB 32A, C-series (for motor/power) | 024 Nos. | 171.15 | 4,107.60 |
| 07 | 5-4-8 | Supplying & erecting triple pole and neutral distribution board (TPNDB) with door surface / flush mounted SPMCB of 24 ways. | 01 Nos. | 3,006.15 | 3,006.15 |
| 08 | 5-6-7 | Providing erecting & commissioning 4 pole 80A RCCB. | 01 Nos. | 4,442.55 | 4,442.55 |
| 09 | 1-8-3 | Supplying and erecting modular type bell-push 6A/10A (2 Module) | 10 Nos. | 102.90 | 1,029.00 |
| 10 | 1-8-6 | Supplying and erecting modular type switch 16A/20A with indicator. | 80 Nos. | 128.10 | 10,248.00 |
| 11 | 1-8-15 | Supplying and Erecting modular type 3 pin 6 / 16A combined unit. | 80 Nos. | 185.85 | 14,868.00 |
| 12 | 1-8-22 | Supplying and Erecting modular type bell indicator. | 10 Nos. | 177.45 | 1,774.50 |
| 13 | 1-8-39 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate for 1 module. | 10 Nos. | 140.70 | 1,407.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 14 | 1-8-41 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate 3 module. | 13 Nos. | 147.00 | 1,911.00 |
| 15 | 1-8-45 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate 12 module. | 16 Nos. | 316.05 | 5,056.80 |
| | | | | Total. | 1,43,295.60 |
| | | | | + Contigency 5% | 7,164.78 |
| | | | | Total Amount :- | 1,50,460.38 |
| | | | | **Round up :-** | **1,50,460.00** |

उपरोक्तप्रमाणे कार्डीयाक Operation Theator व I.C.C.U. मध्ये Power point वायरींगचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.१,५०,४६०/-इतका खर्च अपेक्षित आहे. वरील रकमेमध्ये ए.सी.खरेदीचा खर्च धरण्यात आलेला नाही. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पूर्वीचे Operation Theator व I.C.C.U. मध्ये Power point वायरींगचे काम केलेल्या विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन्स मागवून काम करुन घेण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**०३)** श्री साईबाबा रुग्णालयातील कायम परिचारिका सौ. ॲगेस देठे यांचा दोन वर्षाचा मुलगा चिरंजीव अभिषेक देठे याची मेंदूची शस्त्रक्रिया श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो सर्जन डॉ. मोदगी हे करणार आहेत.

सदर शस्त्रक्रियेसाठी एक विशिष्ट प्रकारचा शंट लागणार आहे असे डॉ. मोदगी यांनी दि. ९.०६.२०१० चे पत्रान्वये कळविलेले आहे. सौ.ॲगेस देठे यांनी त्यांचे दि.९.०६.२०१० चे अर्जान्वये माझ्या मुलाची यापूर्वी सदर आजारासाठी तीन वेळा बाहेरील रुग्णालयात शस्त्रक्रिया झालेली आहे. परंतु सदर शस्त्रक्रिया व्यवस्थीत झालेली नाही परंतु त्यासाठी माझे अंदाजे रु १,५०,०००/- पर्यंत खर्च झालेला असल्यामुळे सदर शंटची किंमत रु. ३५,००० /- मी खर्च करु शकत नाही तरी संस्थानकडून मला सदरचा शंट खरेदी करुन मिळावा असा विनंती अर्ज केलेला आहे.

सदरचा अर्ज आजच्या सभेपुढे ठेवण्यात आला होता. यावर चर्चा होऊन परिचारिका सौ. ॲगेस देठे यांना सदरचा शंट संस्थान तर्फे खरेदी करुन देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०४)** श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना इन्सेन्टीव्ह देणेकामी या पुर्वीच मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे प्रस्ताव सादर केलेला होता. त्याच्या प्रती आजचे सभेत समितीच्या सदस्यांना अभ्यास करण्यासाठी देण्यात आल्या. तसेच झालेल्या चर्चेप्रमाणे सदरकामी सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात येऊन तो समितीच्या पुढील सभेपुढे ठेवण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.
(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०६ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता माहे मार्च-एप्रिल -मे,२०१०**

**(ब) माहे मार्च -एप्रिल-मे, २०१०मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे मे, २०१० मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे मे २०१०मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे मार्च-एप्रिल-मे,२०१० मधील अनुक्रमे जमा रु. २२,५०,४६,५९५/-,रु.१९,८८,७०,३५०/- व रु.२४,३७,०१,८३३/-आणि खर्च रुपये २०,२५,५८,६७०/-, रु.२,०९,६०,५२४/- व रु.११,५९,२६,८५८/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील मार्च-एप्रिल-मे,२०१० अनुक्रमे रुपये ६,३१,७४६/-, रु. ३५,२५९/- व रु.१,८५,५९०/- चा तक्ता, दिनांक ३१,०३,२०१०,दिनांक १५.०६.२०१० व दिनांक १८.०६.२०१० अखेर संस्थानची गुंतवणूक अनुक्रमे रुपये ४२७,१७,०२,९२९/-, रुपये ४४३,७१,७५,८७३/- व रुपये ४४३,७१,७५,८७३/- चा तक्ता, माहे मे,२०१० या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ८,८५,३३,२०९/- देणगीचा तक्ता, माहे मे,२०१० मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये १,६४,८७४/- चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२७ नोंद घेण्यात आली.**

---

**०२. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे, २०१० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे मे,२०१० मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये २२,४९,१५३/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२७ नोंद घेण्यात आली.**

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे मे ,२०१० या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

(C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे मे,२०१० मध्ये रुपये ४३,२४,२२५/- देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२७ नोंद घेण्यात आली.**

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे मे, २०१० मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

(D) साईनाथ रुग्णालयात माहे मे,२०१० मध्ये रुग्णांना अंतररुग्ण रुपये ६१,९५८/- बाह्य रुग्ण रुपये ४६,९४२/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५८,४५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२७ नोंद घेण्यात आली.**

---

**०५. माहे माहे मे, २०१० मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(E) माहे मे,२०१० संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४५,४७९ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२७ नोंद घेण्यात आली.**

---

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.५२७ नोंद घेण्यात येऊन तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले अदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०१) द्वारावती इमारत बांधकाम करणेकामी (तळमजला अधिक ३ मजले) मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई यांचे रक्कम रुपये १२,९०,९२,०९८/-मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०२) नविन पिंपळवाडी रस्ता कॉंक्रेटीकरण करणेकामी मे.शिन्दे डेव्हलपर्स प्रा.लि.,पुणे यांचे रक्कम रुपये २,६०,३३,०२२/-मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०३) मंदीर परिसरात दर्शन रांग व महाद्वार या ठिकाणी कायमस्वरुपी मंडप (शेड) उभारणेकामी मे.सिटाडेल आर्किटेक्ट चरल सोल्यूशन प्रा.लि.,मुंबई यांचे रु. १,००,८५,५८२/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०४) श्री हनुमान मंदीराचे नुतनीकरण करणेकामी मे.निर्मिती कन्स्ट्रुवेल,नाशिक यांचे रुपये १९,५६,७६६/-मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०५) नविन भक्तनिवासस्थान येथील नगर-मनमाड रोड लगतची कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणेकामी मे.संतोष एम.गंजेगावकर, निघोज यांचे रुपये ३,७३,१९९/-मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०६) सिंकदराबाद येथे संस्थानचे गेस्ट हाऊस उभारणेकामी मे.एल.करुणाकर रेड्डी, हैद्राबाद यांचे रुपये ३२,२०,७३४/-मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०७) श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता धर्मशाळा क्र.०१ चे इमारतीत उद्वाहक (लिफ्ट) बसविणेकामी सिव्हील वर्क करणे याकामासाठी मे.महेंद्र आर.टाटीया,श्रीरामपूर यांचे रुपये ४,४४,८२४/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**०७ पाणी तपासणी अहवाल**

(G) माहे एप्रिल-मे,२०१० मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२७ नोंद घेण्यात आली.**

---

**विषय नं.०७ संस्थान मालमत्ता विमा पॉलिसी घेणेसाठी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** दरवर्षी संस्थानच्या इमारती, फर्निचर, इत्यादी (वाहनांशिवाय) चल-अचल मालमत्ता, कॅश इन ट्रॅन्झीट, कॅश इन सेफ इत्यादीचा विमा एकत्रितपणे उतरविण्यात येतो. मागील वर्षी दिनांक १० जुलै, २००९ ते ०९ जुलै, २०१० या कालावधीसाठी मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी यांचेकडे स्पर्धात्मक दरानुसार प्रिमियम स्वरुपात रुपये ६,८०,०००/- इतकी प्रिमियम रक्कम अदा करुन इतर सर्व चल, अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार सर्व संस्थान कर्मचा-यांचा समुह विमा उतरविण्यात आलेला आहे. या विम्याची मुदत दिनांक ०९ जुलै, २०१० रोजी पूर्ण होत आहे. तरी त्यापुढील दिनांक १० जुलै, २०१० ते ०९ जुलै, २०११ अखेर पर्यन्तच्या एका वर्षासाठी पॉलिसीज घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती चे आजचे सभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(ब)** यासाठी राष्ट्रीयकृत सार्वजनिक सर्वसाधारण विमा कंपन्यांना पॉलीसीजसाठी आवश्यक सर्व माहितीसह पत्र देऊन या कंपन्यांच्या प्रतिनिधींना आजचे सभेसमोर अंतीम दरपत्रके सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे. या कंपन्या खालील प्रमाणे :

(१) दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर (राष्ट्रीयकृत)
(२) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी (राष्ट्रीयकृत)
(३) ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर (राष्ट्रीयकृत)
(४) नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगांव (राष्ट्रीयकृत)

**(क)** उपरोक्त कंपन्यांचे उपस्थित प्रतिनिधी बरोबर समक्ष चर्चा करुन या कंपन्यांना त्यांची अंतीम दरपत्रके बंद पाकिटात सादर करणेस सांगणेत यावे, तसेच याबाबत पुन्हा चर्चा- तथा- वाटाघाटी करणेत येणार नाहीत, असे स्पष्ट करुन, या कंपन्यांना सारासार विचार करुन न्यूनतम दर नमुद करण्यास सुचित करण्यात यावे व ही दरपत्रके लागलीच मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडून तुलनात्मक दृष्टीकोनातून निर्णय व्हावा, ही विनंती आहे.

सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकात विमा खाती रक्कम रु. ३९,४५,०००/- एवढी तरतूद केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी सभेपुढे बोलविण्यात आले होते. त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी किती सुट देणार याबाबत बंद पाकीटात लेखी देणेबाबत त्यांना सांगण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | देऊ केलेले दर (रु.) |
|---|---|---|
**विषय नं.२३ श्री साई प्रसादालयासमोरील परिसरात साईभक्तांचे सोयीसाठी स्टेनलेस स्टिलचे संरक्षक रेलिंग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालया समोरील परीसरात साईभक्तांचे सोईसाठी स्टेनलेस स्टीलचे संरक्षक रेलींग तयार करुन बसविणेकामी व येणा-या रक्कम रुपये ४,९०,०३६/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव दिनांक ०३-०४-२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / ७४५९ / २०१० दिनांक २५-०५-२०१० अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०५ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.शुभम स्टील रेलींग्ज ॲण्ड फर्निचर, नाशिक |
| ०२) | मे.आकार मशिन्स प्रा.लि., अंबड, नाशिक |
| ०३) | मे.रवि ट्रेडींग कंपनी, पुणे |
| ०४) | मे.मेहता स्टील कॉर्पोरेशन, हाऊस ऑफ स्टेनलेस स्टील,अंबड, नाशिक |
| ०५) | मे.मुकुंद एन्टरप्राईजेस, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालया समोरील परीसरात साईभक्तांचे सोईसाठी स्टेनलेस स्टीलचे संरक्षक रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले

| अ.नं | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर रु. | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रू. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.शुभम स्टील रेलींग्ज ॲण्ड फर्निचर, नाशिक | ४,५०,१५०/- | ४,५०,०००/- |
| ०२ | मे.आकार मशिन्स प्रा.लि., अंबड, नाशिक | ४,९५,०००/- | ४,९५,०००/- |
| ०३ | मे.रवि ट्रेडींग कंपनी, पुणे | ५,१५,७००/- | ५,१५,७००/- |
| ०४ | मे.मेहता स्टील कॉर्पोरेशन, हाऊस ऑफ स्टेनलेस स्टील,अंबड, नाशिक | ६,००,०००/- | ६,००,०००/- |
| ०५ | मे.मुकुंद एन्टरप्राईजेस, नाशिक | ५,३८,४३७/- | ५,३०,०००/- |

**निर्णय क्र.५४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.शुभम स्टील रेलींग्ज ॲण्ड फर्निचर, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२४ गुरुस्थान मंदिर दक्षिण बाजूस वाढीव स्टेनलेस स्टिल रेलिंग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** गुरुस्थान मंदिर दक्षिण बाजूस वाढीव स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी व येणा-या रक्कम रुपये ४,९९,५००/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव दिनांक ०३-०४-२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व

याकामी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/विद्युत/७४६०/२०१० दिनांक २५-०५-२०१० अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.साई इंजिनिअर्स, नाशिक |
| ०२) | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स, नवि मुंबई |
| ०३) | मे.आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |

उपरोक्तप्रमाणे गुरुस्थान मंदिर दक्षिण बाजूस वाढीव स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले

| अ.नं | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर रु. | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रू. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स, नाशिक | ४,७३,६२५/- | ४,६०,०००/- |
| ०२ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स, नवि मुंबई | ५,०८,५५६/- | ५,०८,०००/- |
| ०३ | मे.आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ५,००,०००/- | ५,००,०००/- |

**निर्णय क्र.५४५ यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.साई इंजिनिअर्स, नाशिक, अंबड, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२५ थर्मिक फ्ल्यूड हिटींग यंत्रणेकरीता थर्मिया फ्ल्यूड सर्क्यूलेशन पंप व ऑईल खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीकरुन निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात मोतीचूर लाडू प्रसाद बनविणेकामी थर्मिक फ्ल्युड यंत्रणा वापरणेत येत आहे. सदर यंत्रणा दि.२३/०८/२००९ रोजी सुरु केलेली आहे. मोतीचूर लाडूसाठी लागणारी बुंदी तळणेसाठी थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणा अतिशय फायदेशीर ठरलेली आहे.

साईभक्तांच्या गर्दीनुसार लाडू तयार करणेकामी थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणा अविरत चालू असते. सदर यंत्रणेद्वारे २८०°C तापमानाचे ऑईल कायम सर्क्युलेशन होत असलेने पंपाच्या ग्लॅन्ड जळू शकतात, पंप कायम चालू राहीलेने मोटारची क्वाईल जळू शकते अथवा स्पेअरपार्ट खराब होऊ शकतात. सर्क्युलेशन पंपामध्ये बिघाड झाल्यास लाडू बनविणेकामी पर्यायी पंप नसल्यामुळे, संपूर्ण यंत्रणा पुर्णपणे बंद होवू शकते. तसे होऊ नये म्हणून एक अतिरीक्त सर्क्युलेशन पंप, मोटार इरेक्शन चार्जेससह व २१० लिटर थर्मिक फ्ल्युड ऑईल खरेदीकामी कोटेशन मागविणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.१०/०१/२०१० चे सभेतील विषय क्र.५५ वरील निर्णय क्र.१५८ नुसार मान्यता मिळालेली आहे. तरी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करणेसाठी प्रसादालयाकडील दि.२५/०३/२०१० ची मंजूर टिपणीनुसार खालील एजन्सींना दरपत्रक पाठविणेबाबत पत्र देण्यात आलेली होती.

१) पद्माटेक इंजिनीअरींग सिस्टीम, पुणे.
२) मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद.
३) गुरु साई एन्टरप्राईजेस, पुणे.
४) कोणार्क इंजिनीअर्स, नाशिक.
५) के. बी. एस. पंप्स प्रा.लि., पुणे

वरीलपैकी खालीलप्रमाणे ४ एजन्सींनी कोटेशन्स पाठविलेले आहेत.

०१ पद्माटेक इंजिनीअरींग सिस्टीम, पुणे.
०२ मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद.
०३ गुरु साई एन्टरप्राईजेस, पुणे.
०४ के.बी.एस.पंप्स प्रा.लि.पुणे चे डिलर मे.पाटील इंजिनीअरींग, पुणे.

उपरोक्तप्रमाणे थर्मिक फ्ल्यूड हिटींग यंत्रणेकरीता थर्मिया फ्ल्यूड सर्क्यूलेशन पंप व ऑईल खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघड्ण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले

| तपशिल | पद्माटेक इंजिनीअरींग सिस्टीम, पुणे. | मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद. | गुरु साई एन्टरप्राईजेस, पुणे. | मे.पाटील इंजिनीअरींग, पुणे. |
|---|---|---|---|---|
| थर्मिक फ्ल्युड सर्क्युलेशन पंप | | | | |
| निविदेतील दर | ३,२४,६७८.०० | १,५२,०००.०० | १,६१,०१९.०० | ७४,५३२.०० |
| अधिक व्हॅट १२.५ टक्के | ४०,५८४.७५ | १९,०००.०० | २०,१२७.३७ | ३,७२६.६० |
| एकुण | ३,६५,२६२.७५ | १,७१,०००.०० | १,८१,१४६.३७<br>+ वहातुक खर्च | ७८,२५८.६०<br>+ वहातुक खर्च |
| वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रू. | --- | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| थर्मिक फ्ल्युड<br>निविदेतील दर<br>अधिक व्हॅट १२.५ टक्के<br>एकुण | --- | १२५/- प्रति लिटर<br>१५.६२<br>१४०.६२ प्रति लिटर | ११५/- प्र. लिटर<br>१४.३७<br>१२९.३७ प्र.लिटर<br>+ एक्साईज ड्युटी<br>+ वहातुक खर्च | ---- |
| वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रू. | ---- | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**निर्णय क्र.५४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त ४ निविदासादरकर्त्यांमध्ये फक्त मे. पद्माटेक इंजिनीअरींग सिस्टीम, पुणे यांनी भरलेली निविदा परिपूर्ण आहे. तसेच मे.पद्माटेक इंजिनीअरींग सिस्टीम, पुणे यांनी थर्मिक फ्ल्यूड पंपाच्या पुलींगसाठी स्वतंत्र पंप दर्शविलेला असून यंत्रणेच्या पाईपलाईनच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वेल्डींग जॉईन्ट तसेच एक्सपान्शन बेलोची १०० टक्के रेडिओग्राफी (एक्स-रे टेस्ट) देणेबाबत निविदेत नमूद केलेले आहे. उर्वरित निविदासादरकर्त्यांनी निविदेमध्ये स्वतंत्र पुलींग पंप व पाईपलाईन रेडिओग्राफीचा उल्लेख केलेला नाही. तसेच चर्चा व वाटाघाटीसाठीही ते उपस्थित राहीलेले नाहीत. त्यामूळे त्यांचे दर निम्नतम असूनही त्यांच्या निविदा अपूर्ण असल्याने न्युनतम दराचा विचार न करता मे.पद्माटेक इंजिनीअरींग सिस्टीम, पुणे हे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी हजर राहील्याने त्यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन थर्मिक फ्ल्यूड उभारणीचे काम व २१० लिटर थर्मिक ऑईल पुरविणेसाठी एकत्रित रुपये २,९०,०००/- मात्र त्यांना देण्याचे ठरले. तसेच पंप उभारणीकामी लागणारी वीज संस्थानने मोफत देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय विभाग )

---

**विषय नं.२६ शालेय गणवेष निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देणेकामी पुरवठाधारकांना निविदा सादर करणेकामी दि. २७ मे २०१० रोजी निविदा पत्रे पाठविण्यात आली होती. सदर निविदा ०८ जून २०१० पर्यंत भरण्यास मुदत देण्यात आलेली होती. त्यानूसार खालील तीन पुरवठा धारकांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

**०१)** ऑनेस्टी कलेक्शन, नाशिक **०२)** जगदिश गारमेंटस, कोपरगांव

**०३)** आर के कलेक्शन, नाशिक

उपरोक्त पुरवठादारांनी देऊ केलेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन पुरवठादारांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपस्थित सर्व पुरवठादारांना सभेत समक्ष बोलविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत लेखी बंद पाकीटात देणेबाबत सांगण्यात आले. पुरवठादारांनी देऊ केलेले बंद पाकीटे उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

**श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल शिर्डी (विद्यार्थी गणवेश)**

| वर्ग | तपशील | साईज | कापड | आर. के.कलेक्शन नाशिक | | जगदिश गारमेंटस कोपरंगाव | | ऑनेस्टी नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| ज्यु.के.जी सि.के.जी. मुले | हाफ शर्ट | | एस.कुमार रॉयल्टी, | 150.00 | ***145.00*** | 148.50 | 148.50 | 175.00 | 175.00 |
| | हाफ पॅट | | | 150.00 | | 153.50 | 153.50 | | |
| ज्यु.के.जी सि.के.जी. मुली | फ्रॉक | | एस.कुमार रॉयल्टी, | 140.00 | ***135.00*** | 135.50 | 135.50 | 140.00 | 140.00 |
| | | | | 140.00 | | 140.50 | 140.50 | | |
| १ ली ते ७ वी मुले | हाफ पॅट | १३ | एस.कुमार रॉयल्टी, | 90.00 | 87.30 | 91.25 | 91.25 | 80.00 | ***75.00*** |
| | | १४ | | 95.00 | 92.15 | 96.25 | 96.25 | 85.00 | ***80.00*** |
| | | १५ | | 100.00 | 97.00 | 101.25 | 101.25 | 90.00 | ***85.00*** |
| | | १६ | | 105.00 | 101.85 | 108.25 | 108.25 | 95.00 | ***90.00*** |
| | | १७ | | 110.00 | 106.70 | 115.25 | 115.25 | 100.00 | ***95.00*** |
| | | १८ | | 115.00 | 111.55 | 122.25 | 122.25 | 105.00 | ***100.00*** |
| | | १९ | | 120.00 | 116.40 | 124.25 | 124.25 | 110.00 | ***105.00*** |
| | | २० | | 125.00 | 121.25 | --- | --- | 115.00 | ***110.00*** |
| १ ली ते १०वी मुले /मुली | हाफ शर्ट | ६ | एस.कुमार २.७६ × २.७६ ३०-७०% कॉटन + | 85.00 | 82.45 | 97.00 | 97.00 | 80.00 | ***80.00*** |
| | | ७ | | 90.00 | 87.30 | 102.00 | 102.00 | 85.00 | ***80.00*** |
| | | ८ | | 95.00 | 92.15 | 107.00 | 107.00 | 90.00 | ***80.00*** |
| | | ९ | | 100.00 | 97.00 | 112.00 | 112.00 | 95.00 | ***90.00*** |
| | | १० | | 105.00 | 101.85 | 117.00 | 117.00 | 100.00 | ***90.00*** |
| | | ११ | | 110.00 | 106.70 | 122.00 | 122.00 | 105.00 | ***90.00*** |
| | | १२ | | 115.00 | 111.55 | 129.00 | 129.00 | 110.00 | ***100.00*** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १३ | पॉलिस्टर | 120.00 | 116.40 | 136.00 | 136.00 | 115.00 | **100.00** |
| | | १४ | | 125.00 | 121.25 | 143.00 | 143.00 | 120.00 | **100.00** |
| | | १५ | | 130.00 | 126.10 | 150.00 | 150.00 | 125.00 | **110.00** |
| | | १६ | | 135.00 | 130.95 | 157.00 | 157.00 | 130.00 | **110.00** |
| | | १७ | | 140.00 | 135.80 | 159.00 | 159.00 | 135.00 | **115.00** |
| | | १८ | | 150.00 | 145.50 | 161.00 | 161.00 | 140.00 | **115.00** |
| इ.५वी ते १० वी मुली | स्कर्ट डिव्हायडेट | उंची २२ | एस.कुमार रॉयल्टी, | 140.00 | 135.80 | 180.00 | 180.00 | 160.00 | **150.00** |
| | | उंची २४ | | 145.00 | 140.65 | 185.00 | 185.00 | 165.00 | **160.00** |
| | | उंची २६ | | 155.00 | 150.35 | 190.00 | 190.00 | 170.00 | **170.00** |
| | | उंची २८ | | 165.00 | 160.05 | 195.00 | 195.00 | 175.00 | **175.00** |
| | | उंची ३० | | 180.00 | 174.60 | 200.00 | 200.00 | 180.00 | **180.00** |
| ८ वी ते १०वी मुले | फुल पॅट | उंची ३४ | एस.कुमार रॉयल्टी, | 180.00 | 174.60 | 165.00 | 165.00 | 140.00 | **140.00** |
| | | उंची ३६ | | 190.00 | 184.30 | 170.00 | 170.00 | 145.00 | **145.00** |
| | | उंची ३८ | | 200.00 | 194.00 | 175.00 | 175.00 | 150.00 | **150.00** |
| | | उंची ४० | | 210.00 | 203.70 | 180.00 | 180.00 | 155.00 | **155.00** |
| इ. १ली ते ४ थी मुली | साधा स्कर्ट नमुन्या प्रमाणे | उंची २० | एस.कुमार रॉयल्टी, | 130.00 | 126.10 | | | 130.00 | 125.00 |
| | | उंची २२ | | 135.00 | 130.95 | | | 140.00 | 130.00 |
| | | उंची २४ | | 140.00 | 135.80 | | | 150.00 | 135.00 |
| | | उंची २६ | | 150.00 | 145.50 | | | 160.00 | 145.00 |

## २) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल शिर्डी (पी. टी. गणवेश )

| वर्ग | तपशील | साईज | कापड | आर. के.कलेक्शन, नाशिक | | जगदिश गारमेंटस कोपरगाव | | ऑनेस्टी नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| १ ली ते १०वी मुले /मुली | हाफ टी शर्ट | २४ | होजिअरी पॉलिस्टर कॉटन (पीसी) | 100.00 | 97.00 | 105.00 | 105.00 | 90.00 | **80.00** |
| | | २६ | | 110.00 | 106.70 | 110.00 | 110.00 | 95.00 | **80.00** |
| | | २८ | | 120.00 | 116.40 | 115.00 | 115.00 | 100.00 | **90.00** |
| | | ३० | | 130.00 | 126.10 | 120.00 | 120.00 | 105.00 | **90.00** |
| | | ३२ | | 140.00 | 135.80 | 125.00 | 125.00 | 110.00 | **100.00** |
| | | ३४ | | 150.00 | 145.50 | 130.00 | 130.00 | 115.00 | **100.00** |
| | | ३६ | | 160.00 | 155.20 | 140.00 | 140.00 | 120.00 | **110.00** |
| | | ३८ | | 170.00 | 164.90 | 150.00 | 150.00 | 125.00 | **110.00** |
| | | ४० | | 180.00 | 174.60 | 160.00 | 160.00 | 130.00 | **120.00** |
| १ ली ते ७ वी मुले<br>१ ली ते ४ थी मुली | हाफ पॅट | १२ | होजिअरी पॉलिस्टर कॉटन (पीसी) | 80.00 | 77.60 | 81.00 | 81.00 | 70.00 | **70.00** |
| | | १३ | | 85.00 | 82.45 | 86.00 | 86.00 | 75.00 | **70.00** |
| | | १४ | | 90.00 | 87.30 | 91.00 | 91.00 | 80.00 | **70.00** |
| | | १५ | | 95.00 | 92.15 | 96.00 | 96.00 | 85.00 | **80.00** |
| | | १६ | | 100.00 | 97.00 | 101.00 | 101.00 | 90.00 | **80.00** |
| | | १७ | | 105.00 | 101.85 | 106.00 | 106.00 | 95.00 | **80.00** |
| | | १८ | | 110.00 | 106.70 | 113.00 | 113.00 | 100.00 | **90.00** |
| | | १९ | | 120.00 | 116.40 | 118.00 | 118.00 | 105.00 | **90.00** |
| | | २० | | 130.00 | 126.10 | 125.00 | 125.00 | 110.00 | **90.00** |
| | | २२ | | 140.00 | 135.80 | 125.00 | 125.00 | 115.00 | **95.00** |
| इ.५वी ते १० वी मुली | स्कर्ट डिव्हायडेट | उंची २२ | होजिअरी पॉलिस्टर कॉटन (पीसी) | 140.00 | 135.80 | 156.00 | 156.00 | 150.00 | **135.00** |
| | | उंची २४ | | 145.00 | 140.65 | 163.00 | 163.00 | 155.00 | **140.00** |
| | | उंची २६ | | 155.00 | 150.35 | 170.00 | 170.00 | 160.00 | **150.00** |
| | | उंची २८ | | 165.00 | 160.05 | 177.00 | 177.00 | 165.00 | **150.00** |
| | | उंची ३० | | 180.00 | 174.60 | 184.00 | 184.00 | 170.00 | **160.00** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ वी ते १० | | उंची | होजिअरी | 200.00 | 194.00 | 181.00 | 181.00 | 130.00 | **120.00** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वी मुले | | ३४ | पॉलिस्टर कॉटन (पीसी) | | | | | | |
| | | उंची ३६ | | 210.00 | 203.70 | 189.00 | 189.00 | 135.00 | ***125.00*** |
| | | उंची ३८ | | 220.00 | 213.40 | 197.00 | 197.00 | 140.00 | ***130.00*** |
| | | उंची ४० | | 230.00 | 223.10 | 205.00 | 205.00 | 145.00 | ***135.00*** |

## ३) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी (विद्यार्थीनी गणवेश)

| वर्ग | तपशील | साइज | कापड | आर. के.कलेक्शन नाशिक | | जगदिश गारमेंटस कोपरगाव | | ऑनेस्टी नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| इ.५वी ते ७ वी मुली | ब्लाऊज + पिनो कापडी बेल्टसह | २८ | पिनो -एस कुमार रॉयल्टी, ब्लाऊज- एस.कुमार २.७६ ×२.७६ ३०-७०% कॉटन +पॉलिस्टर | 215.00 | ***208.55*** | 278.00 | *278.00* | 100.00 | 230.00 |
| | | ३० | | 230.00 | ***223.10*** | 288.00 | *288.00* | 105.00 | 240.00 |
| | | ३२ | | 245.00 | ***237.65*** | 298.00 | *298.00* | 110.00 | 250.00 |
| | | ३४ | | 260.00 | ***252.20*** | 308.00 | *308.00* | 115.00 | 260.00 |
| | | ३६ | | 275.00 | ***266.75*** | 318.00 | *318.00* | 120.00 | 270.00 |
| | | ३८ | | 290.00 | ***270.00*** | 328.00 | *328.00* | 125.00 | |
| | | | | | | | | मूळ दर चुकलेले आहेत. | |
| इ. ८ वी ते १०वी मुली | पंजाबी ड्रेस व ओढणी सव्वा दोन मीटर मार्बल | सर्व साईज | एस.कुमार २.७६ ×२.७६ ( ३०-७०% कॉटन +पॉलिस्टर | 280.00 | ***249.00*** | 275.00 | *275.00* | 300.00 | 250.00 |

## ४) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी (विद्यार्थी गणवेश)

| वर्ग | तपशील | साइज | कापड | आर. के.कलेक्शन, नाशिक | | जगदिश गारमेंटस कोपरगाव | | ऑनेस्टी नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर | मुळ दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| इ.११ वी व १२ वी मुले | हाफ शर्ट | S | एस.कुमार २.७६ ×२.७६ ( ३०-७०% कॉटन +पॉलिस्टर | | | | | 150.00 | 140.00 |
| | | M | | 140.00 | | 154.00 | 154.00 | 155.00 | 145.00 |
| | | L | | | | | | 160.00 | 150.00 |
| | | XL | | | | | | 165.00 | 160.00 |
| इ.११ वी व १२ वी मुले | फुल पॅंट (बुटकट) | उंची ३८ | एस.कुमार रॉयल्टी, | | | 172.00 | 172.00 | 155.00 | 155.00 |
| | | उंची ४० | | 215.00 | | 177.00 | 177.00 | 160.00 | 160.00 |
| | | उंची ४२ | | | | 182.00 | 182.00 | 165.00 | 165.00 |
| | | उंची ४४ | | | | 190.00 | 190.00 | 170.00 | 170.00 |
| इ.११ वी व १२ वी मुले | फुल पॅंट (बुटकट) | उंची ३८ | मॅटी -एस कुमार हाय पॉवर | | | 230.00 | 230.00 | 155.00 | 150.00 |
| | | उंची ४० | | 280.00 | | 235.00 | 235.00 | 160.00 | 155.00 |
| | | उंची ४२ | | | | 240.00 | 240.00 | 165.00 | 160.00 |
| | | उंची ४४ | | | | 250.00 | 250.00 | 170.00 | 165.00 |
| इ.११ वी व १२ वी मुले | फुल पॅंट (बुटकट) | उंची ३८ | मॅटी - सुझुकी सुपर पॉवर ट्राऊजर | | | 170.00 | 170.00 | 155.00 | 155.00 |
| | | उंची ४० | | 225.00 | | 175.00 | 175.00 | 160.00 | 160.00 |
| | | उंची ४२ | | | | 180.00 | 180.00 | 165.00 | 165.00 |
| | | उंची ४४ | | | | 190.00 | 190.00 | 170.00 | 170.00 |
| इ.११ वी १२ वी मुली | पंजाबी ड्रेस व ओढणी सव्वा दोन मीटर मार्बल | **सर्व साईज** | एस.कुमार २.७६ ×२.७६ ( ३०-७०% कॉटन +पॉलिस्टर ½ | 280.00 | ***270.00*** | 275.00 | 275.00 | 325.00 | 275.00 |
| इ.११ वी व १२ वी मुले | हाफ शर्ट व फुल पॅंट (बुटकट) (नमुन्या प्रमाणे ड्रेस) | **सर्व साईज** | एस.कुमार २.७६ ×२.७६ ३०-७०% कॉटन + पॉलिस्टर व मॅटी - सुझुकी सुपर पॉवर ट्राऊजर | ----- | 335.00 | ----- | (154.00 + 180.00) = 334.00 | ---- | ***300.00*** |

**निर्णय क्र.५४७ यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त अधोरेखित दर मान्य करण्यात यावे असे ठरले.**
(कार्यवाही-प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कूल/प्राचार्य, कन्या विद्या मंदिर/ प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.२७ MRI Compatible Laryngscope खरेदीकामी चर्चा /वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात एम.आर. आय.विभागात MRI Compatible Laryngescope ०१ नग खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२०१० निर्णय क्र.४५ अन्वये विहित पध्दतीने कोटेशन्स मागवुन खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,४२,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार अकरा कंपन्या/ अधिकृत विक्रेते यांचेकडून इकडील पत्र क्र.२३८३ ते २३९३ दि.०५.०२.२०१० अन्वये दि.२६.०२.२०१० अखेर सिलबंद कोटेशन मागविण्यात आले होते.परंतू कोणीही पुरवठाधारकांचे वेळेत कोटेशन प्राप्त झाले नाही. तेंव्हा त्यांना दुरध्वनीवरुन वेळोवेळी तगादा करण्यात आला होता. तेंव्हा फक्त मे.सुमित हेल्थकेअर,मुंबई यांनी दि.२०.०२.२०१० रोजी आपले बंद कोटेशन पाठविले आहे. तर मे.प्रभा सर्जीकल, मुंबई व मे.पलमोट्रॉनिक्स, मुंबई यांचे प्रतिनिधी शिर्डी येथे समक्ष आले असता ते देखील सदरचा Laryngescope विक्री करतात असे समजले. तेंव्हा त्यांनी देखील स्वत: कोटेशन दिलेले आहे. तेंव्हा त्यांचे बंद कोटेशन प्राप्त झाले असून ते देखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे. ते खालील प्रमाणे.

१) M/s.Prabha Surgicals, Mumbai (कोटेशन प्राप्त दि.१०.०३.२०१०)
२) M/s.Pulmotronics, Mumbai (कोटेशन प्राप्त दि.१०.०३.२०१०)
३) M/s.Summit Healthcare (P) Ltd., Mumbai (कोटेशन प्राप्त दि.२०.०२.२०१०)

उपरोक्त प्रमाणे तीन बंद कोटेशन हे मा.उप-कार्यकारी अधिकारी साहेब यांच्या समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. सदर तीन कोटेशन पैकी मे.प्रभा सर्जीकल, मुंबई व मे.पल्मोट्रॉनिक्स, मुंबई यांनी आपले मागणी प्रमाणे १ टक्का अनामत रक्कम दिलेली नाही तेंव्हा त्यांचे दर विचारात घेता येणार नाही. मे. सुमित हेल्थकेअर, मुंबई यांनी १ टक्का अनामत रक्कम दिलेली असून त्यांचे दर देखील निम्नतम आहे. शिवाय त्यांचे स्पेशिफीकेशन आपले मागणी प्रमाणेच आहे. तेंव्हा त्यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा वाटाघाटीसाठी बोलवुन निर्णय घेता येईल.

उपरोक्तपैकी मे. सुमित हेल्थकेअर, मुंबई यांना आजचे सभेपुढे समक्ष बोलविण्यात आले होते, परंतु ते सदरहू सभेस उपस्थित नसल्यामुळे त्यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा केली असता, त्यांनी ३ टक्के सुट देऊन ३ वर्षाचा वॉरंटी कालावधी देऊ कलेला आहे. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| S. N. | Description | Qty. | Summit Healthcare, Mumbai | | Total Amt in Rs. | Prabha Surgical, Mumbai | | Total Amt in Rs. | Pulmotronics, Mumbai | | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Type | Rate per in Rs. In All Taxes | | Type | Rate per in Rs. In All Taxes | | Type | Rate per in Rs. In All Taxes | |
| 1 | MRI Compatible Laryngoscope Set- Consist of Following | 1 | Truphatek Model Tru-MR Set Contain-ing | 146250.00 | 146250.00 | Truphatek Model Tru-MR Set Contain-ing | 172000 | 172000 | Penlon Miller 1 and Mac 2,3 & 4 blades, handle, 1 Battery and Bag | 198000 | 198000 |
| | 5 Blades (Miller 0&1 Mac 2,3&4) | | Yes | | | Yes | | | | | |
| | 1 Handle | | Yes | | | Yes | | | | | |
| | 2 Battery Packs | | Yes | | | Yes | | | | | |
| | 1 Carrying Case | | Yes | | | Yes | | | | | |
| | Total Amount in Rs.- | | | | 146250.00 | | | 172000 | | | 198000 |
| Rate After Negotiation | | | | | | | | | | | |
| | Total Amount in Rs.- | | | | 141862.50 | | | | | | |
| | Warranty | | | | 3 Year | | | | | | |

**निर्णय क्र.५४८ यावर चर्चा होऊन मे. सुमित हेल्थकेअर प्रा. लि., मुंबई यांचे दर स्विकारण्यात येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८ सि.व्ही.टी.एस ऑपरेशन थिएटर विभागासाठी लाईट सोर्स ३०० वॅट खरेदीकामी चर्चा/वाटाघाटीकरुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात सि.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटर विभागात शस्त्रक्रिया करणेसाठी सध्या वापरत असलेला लक्स टेक कंपनीचा लाईट सोर्स हा वापरुन खराब झालेला आहे व तो सध्या वारंवार बंद पडत आहे.

सदरचा लाईट सोर्स हा दुरुस्तीकरीता बायोमेडीकल विभागात दाखवला असता, त्याचे दुरुस्तीस प्रत्येक वेळेस रु.२५,०००/- पर्यंत खर्च येतो तेंव्हा बायोमेडीकल विभागाने नवीन लाईट सोर्स ३०० Watt घेण्याची शिफारस केलेली आहे. त्यामुळे सि.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२८/१०/२००९ चे मागणी पत्रकान्वये १ नग लाईट सोर्सची मागणी केलेली आहे. सदर लाईट सोर्स खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०/०१/२०१० निर्णय क्र.४४ अन्वये विहित पध्दतीने कोटेशन्स मागवुन खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.२,५०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार ११ कोटेशनधारकांकडून इकडील पत्र क्र.२३९४ ते २४०४ दि.०५/०२/२०१० अन्वये दि.२५/०२/२०१० अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, तसेच Aesculap कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. इम्पेरियल सर्जिकल, मुंबई यांना इकडील पत्र क्र.३१०२ दि.१६/०२/२०१० अन्वये बंद कोटेशन पाठविण्यास कळवले होते. त्यास अनुसरुन चार सिलबंद कोटेशन प्राप्त झाले होते, तर मे.कार्ल स्टोझ्रं, दिल्ली यांनी त्यांचे दि.०९/०३/२०१० रोजी ई-मेल व्दारे कोटेशन पाठविलेले होते.

सदर सिलबंद कोटेशन हे दि.२६/०३/२०१० रोजी मा. उप कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे -

- **Light Source 300 Watt - Qty. 2 Nos.**

| Name of Suppliers | AVM Healthcare, Delhi | Zenith Surgical, Mumbai | Imperial Surgical, Mumbai | Regency Lifesciences, Bangalore | Karl Storz, Delhi |
|---|---|---|---|---|---|
| **Make / Model** | Indian | BFW Maxenon Xi300 - Made in USA | Aesculap, Germany | Model : 03-I300xsb Make : Luxtelllc, USA | Karl Storz |
| **Rate Per in Rs.-** | 100905.00 | 399000.00 | 742957.65 | 299000.00 | 314916.00 |
| **Total Amt. in Rs.** | **201810.00** | **798000.00** | **1485915.30** | **598000.00** | **629832.00** |

तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरसाठी एक नग लाईट सोर्सची त्यांनी मागणी केलेली होती सदरचे लाईट सोर्ससाठी येणाऱ्या अंदाजे रु.२,५०,०००/- चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७/११/२००९ चे सभेत निर्णय क्र. ८२८ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तेंव्हा न्यूरो ऑपरेशन थिएटर व सि.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटरसाठी लागणारे प्रत्येकी एक नग लाईट सोर्स उपरोक्त कोटेशन धारकांकडून मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटी करुन खरेदी करता येईल.

सदरहू कोटेशनधारकांपैकी मे.ए.व्ही.एम.हेल्थकेअर,दिल्ली यांनी दिलेला लाईट सोर्स इंडियन असून त्यांनी ज्या रुग्णालयात पुरवठा केलेला आहे, त्यापैकी आदित्य बिर्ला हॉस्पिटल,पुणे येथे चौकशी केली असता त्यांचेकडे न्युरो ओ.टी.मध्ये व कार्डीयाक ओ.टी. मध्ये सदर लाईट सोर्स वापरत नाही . त्यामुळे त्यांचा विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे उर्वरित चार कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलवून निर्णय घेता येईल.

त्यानुसार उपरोक्त चार कोटेशन धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, त्यापैकी ०३ कोटेशन धारक आजचे सभेपुढे उपस्थित होते. तर मे. कार्ल स्टाअर्ज, नवी दिल्ली हे उपस्थित नसल्यामुळे त्यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा करुन सुट विचारण्यात आली होती. सर्वांनी देऊ केलेल्या सुटीचा तपशिल खालीलप्रमाणे-

- **Light Source 300 Watt - Qty. 2 Nos.**

| Name of Suppliers | AVM Healthcare, Delhi | Zenith Surgical, Mumbai | Imperial Surgical, Mumbai | Regency Lifesciences, Bangalore | Karl Storz, Delhi |
|---|---|---|---|---|---|
| **Make / Model** | Indian | BFW Maxenon Xi300 - Made in USA | Aesculap, Germany | Model : 03-I300xsb Make : Luxtelllc,USA | Karl Storz |
| **Rate Per in Rs.-** | 100905.00 | 399000.00 | 742957.65 | 299000.00 | 314916.00 |
| **Total Amt. in Rs.** | 201810.00 | 798000.00 | 1485915.30 | 598000.00 | 629832.00 |
| **Rate After Negotiation** | | | | | |
| **Rate Per in Rs.-** | | 387000.00 | 520070.36 | 284050.00 | **280000.00** |
| **Total Amt. in Rs.** | | 774000.00 | 1040140.71 | 568100.00 | **560000.00** |

**निर्णय क्र.५४९ यावर चर्चा होऊन मे. कार्ल स्टाअर्ज, नवी दिल्ली यांचे निम्नत्तम दर स्विकारण्यात येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ऑपरेशन थिएटर विभागासाठी कार्डीयाक इन्स्ट्रूमेंट खरेदीकामी प्राप्त निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात सन २००६ साली कार्डीयाक ऑपरेशन थिएटर हा विभाग कार्यान्वित करणेत आलेला आहे. त्यावेळेस सदर विभागात शस्त्रक्रियेसाठी लागणारे वेगवेगळ्या कंपनीचे इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्यात आलेली होती. तीच इन्स्ट्रुमेंट सध्या वापरात आहेत. परंतु रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ झाल्याने सध्या असलेली इन्स्ट्रुमेंट ही वापरुन खराब झालेली आहे, त्यामुळे सी. व्ही. टी. एस. ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२०/११/२००९ चे मागणी पत्रकान्वये लागणाऱ्या इन्स्ट्रुमेंटची तातडीने मागणी केलेली आहे. तेंव्हा सी. व्ही. टी. एस. ऑपरेशन थिएटर विभागाने मागणी केलेली इन्स्ट्रुमेंट हि खरेदी करणे गरजेचे आहे. गेली तीन वर्षाची शस्त्रक्रियेची आकडेवारी बघता शस्त्रक्रियेच्या संख्येत निश्चितच वाढ झालेली आहे.

सदर इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे रु. ८,९०,२३०/- येणार असुन सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन करता येईल असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०१.२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.२१७ अन्वये याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस, मुंबई, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्री ही दि.२३.०२.२०१० ते १०.०३.२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१२.०३.२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी, मुंबई कार्यालय व वेबसाईटवरुन घेतलेल्या अशा सर्व मिळून ०६ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

सदर सिलबंद निविदा ह्या दि.०३/०४/२०१० रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. सदर तुलनात्मक तक्ता श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक सर्जन डॉ. विद्युत कुमार सिन्हा व मानद कार्डीयाक सर्जन डॉ. वालिया यांना दाखवून घेण्यात आलेला आहे. डॉ. विद्युत कुमार सिन्हा यांनी M/s.Regency Life Sciences, Banglore व M/s.Critical Care System, Pune या दोघांनी निविदेमध्ये दिलेल्या इन्स्ट्रुमेंटचे नमूने समक्ष बोलवून व त्याचा वापर करुन निर्णय घेता येईल असे सांगितले होते. त्यानुसार M/s Critical Care System, Pune यांनी रुग्णालयामध्ये समक्ष इन्स्ट्रूमेंट आणून दाखवलेली आहेत तर M/s.Regency Life Sciences, Bangalore यांनी वेळोवेळी मागणी करुन देखील इन्स्ट्रुमेंट पाठविलेली नाहीत. त्यानूसार डॉ. विद्युत कुमार सिन्हा यांनी सर्व इन्स्ट्रूमेंट ही M/s.Critical Care System, Pune (Vasculan Germany) यांची घेण्याची शिफारस केलेली आहे. तर डॉ. वालिया यांनी वेगवेगळे इन्स्ट्रुमेंट हे वेगवेगळया पुरवठाधारकांकडून घेण्याची शिफारस केलेली आहे. दोघांचे शिफारशीनुसार येणारा खर्च खालील प्रमाणे -

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | एकूण रक्कम |
|---|---|---|
| | **डॉ. विद्युत कुमार सिन्हा** | |
| 1 | M/s.Critical Care System, Pune | **10,42,492.50** |
| | **डॉ. वालिया** | |
| 1 | M/s.Critical Care System, Pune | 171337.50 |
| 2 | M/s.Regency Life Sciences, Banglore | 701145.12 |
| 3 | M/s.Kalelkar Surgical, Mumbai | 15600.00 |
| 4 | M/s.B.L.Lifesciences Pvt. Ltd., Delhi | 24780.00 |
| 5 | M/s.Hindustan Surgical, Mumbai | 17472.00 |
| | **एकूण रक्कम रु.** | **9,30,334.62** |

उपरोक्त शिफारशीचा विचार करता डॉ. विद्युत कुमार सिन्हा यांनी शिफारस केलेले इन्स्ट्रुमेंट M/s.Critical Care System, Pune यांचेकडून खरेदी करावे असे नम्र मत आहे, कारण सदरचे इन्स्ट्रुमेंट डॉ. विद्युत कुमार सिन्हा यांनी वापरलेले आहेत.

उपरोक्त ५ निविदाधारकांपैकी M/s. Regency Life Sciences, Bangalore व M/s.Critical Care System, Pune या दोन निविदा धारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. सदरहू दान्ही निविदाधारक आजचे सभेपुढे समक्ष उपस्थित होते, त्यांनी आजचे सभेत देऊ केलेल्या सुटीचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | एकूण रक्कम रु. | सुटी नंतरची एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | M/s. Critical Care System, Pune | १०,४२,४९२.५० | ९,३८,२४३.२५ |
| २ | M/s. Regency Life Sciences, Bangalore | ७,०१,१४५.१२ | ६,६६,०८७.८६ |

मे. क्रिटीकल केअर सिस्टीम, पुणे यांनी आजचे सभेत १० टक्के सुट देऊन २ वर्षाचा वॉरंटी कालावधी देऊ केलेला आहे. तर मे. रिजेन्सी लाईफसायन्स, बैंगलोर यांनी ५ टक्के सुट दिलेली आहे.

**निर्णय क्र.५५० यावर चर्चा होऊन मे. क्रिटीकल केअर सिस्टीम, पुणे यांनी देऊ केलेल्या कंपनीचे इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्यात यावीत तर ज्या इन्स्ट्रुमेंटकरीता त्यांचे दर प्राप्त झालेले नाही (अ.नं. ८ व १५) ती इन्स्ट्रुमेंट कार्डीयाक सर्जन यांना दाखवून त्यांचे शिफारशीनुसार खरेदी करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३० श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता १०१० केव्हिए जनसेट खरेदी करणेकामी जनसेट उत्पादक कंपनी मे.कमिन्स,पुणे यांचेकडून आलेले पत्र व कोटेशन्सबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता जनसेट, ट्रान्सफॉर्मर व पॅनेल खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०७-११-२००९ चे सभेतील विषय क्र.४९ निर्णय क्र.८४७ अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व येणा-या अंदाजे रक्कम रुपये १,४२,७३,२७४.०० मात्र खर्चास मान्यता मिळाली होती. या कामांसाठी टेंडर मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. याकामी प्राप्त झालेले टेंडर उघडून टेंडरधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेसाठी मा.व्य.समितीचे दिनांक १८-०४-२०१० चे सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा.व्य.समितीचे दिनांक १८-०४-२०१० चे सभेतील निर्णयान्वये यापुढे संस्थानसाठी जनसेट खरेदी करावयाचा असल्यास त्यासाठी कमिन्स कंपनीशी थेट संपर्क साधून जनसेट खरेदी करण्याची पध्दत ठेवावी. तसेच ट्रान्सफॉर्मर- सबस्टेशनसाठी वेगळे टेंडर आणि पॅनेल व इतर अनुषंगिक कामासाठी वेगळे टेंडर असे दोन वेगवेगळे स्वतंत्र टेंडर्स मागविण्यात यावेत, असे ठरले.

त्यानुसार मे. कमिन्स, पुणे याचेकडून श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता १०१० केव्हिए जनसेट खरेदी करणेकामी संस्थान जावक क्रमांक :- एसएसएस- विद्युत- ७१६९ -२०१०-दि. १०-०५-२०१० नुसार कोटेशन मागविणेत आले. मे. कमिन्स, पुणे यांनी आता पत्र पाठविले असून त्यात त्यांनी पुढीलप्रमाणे लेखी कळविले आहे.

" श्री साईबाबा संस्थानने १०१० केव्हीए कमिन्स कं.च्या जनसेटसाठी कमिन्स कंपनीकडून कोटेशन मागणी केली होती. कमिन्स कंपनीचे संपूर्ण भारतात फक्त तीन सेल्स डीलर ( OEM) असून ते पुढिलप्रमाणे :- (१) मे. सुधिर जनसेट्स, नोईडा, उत्तर प्रदेश, (२) मे. पॉवरिका लि.,मुंबई , (३) मे. जॅकसन्स लि., दिल्ली. यापैकी महाराष्ट्राकरीता मे. पॉवरीका लि, मुंबई हे डिलर आहेत.

संस्थानसाठी लागणाऱ्या १०१० केव्हीए कमिन्स कं.च्या जनसेटसाठी कमिन्स कंपनीने या तिघांकडून कोटेशन्स मागितले व ती प्राप्त झाल्यानंतर त्यातील दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे, तो खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | मागणी | मे.सुधिर जनसेट, नोईडा | मे. पॉवरिका , मुंबई | मे. जॅकसन्स लि., दिल्ली |
|---|---|---|---|---|
| ०१) | १०१० केव्हीए जनसेट, एएमएफ पॅनेल, केबलींग, अर्थिंग फाऊंडेशन व इतर अनुशंगिक कामे | रु. १,०६,३४,९०३/- सर्व टॅक्सेस समाविष्ट | रु.१,००,०४,५०४/- सर्व टॅक्सेस समाविष्ट | रु.१,०६,१५,९५३/- सर्व टॅक्सेस समाविष्ट |

वरीलपैकी मे.पॉवरीका लि., मुंबई यांचे दर कमी असून मे.पॉवरीका यांचे मुख्य कार्यालय मुंबई येथे व ब्रेंच ऑफिस नासिकला आहे. मे.सुधिर जनसेट, यांचे मुख्य कार्यालय नोईडात असून मे. जॅकसन्स लि., यांचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे असल्याने त्यांचे महाराष्ट्र हे कार्यक्षेत्र नसल्याने त्यांचे दर जास्त आहेत. तरी श्री साईबाबा संस्थानने १०१० केव्हीए कमिन्स कं.च्या जनसेटसाठी मे.पॉवरीका लि., मुंबई यांना कार्यादेश द्यावा. तसेच कमिन्स ही विक्री व त्यापश्चात सर्विस देण्यास बांधील असून त्याची हमी देत आहोत. "

वरीलप्रमाणे मे. कमिन्स इंडिया लि., पुणे यांनी पत्र दिलेले असून याबाबत समक्ष चर्चेसाठी मे. कमिन्स इंडिया लि., पुणे व मे. पॉवरीका लि., नासिक यांचे प्रतिनिधींना चर्चेसाठी मा. व्यवस्थापन समितीपुढे बोलाविण्यात आलेले आहे.

**निर्णय क्र.५५१ आजच्या सभेत मे.कमिन्स इंडिया लि.,पुणे यांचे श्री.उमेश कल्याणी व मे.पॉवरीका लि.,नाशिक यांचे प्रतिनिधी श्री.मनिष गुप्ता हे चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी याबाबत सविस्तर माहिती सभेस देऊन जनसेट व त्यासाठी लागणाऱ्या एएमएफ पॅनेलच्या दराविषयी निगॉशिएशन करुन त्या दरात डिस्काऊंट दिला आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन,**

**(०१) मे.कमिन्स,पुणे यांनी लेखी कळविल्यानुसार त्यांचे अधिकृत OEM मे.पॉवरिका लि.,मुंबई यांचेकडून १०१० केव्हीए क्षमतेचा फक्त एक जनसेट व त्यासाठी लागणारा एक ए.एम.एफ.पॅनेल खरेदी करण्यात यावा.**

**(०२) तसेच त्यांचेकडून साईनगर येथील जुन्या २५० केव्हीए जनसेटला अकाऊस्टीक कॅनोपी बसवून घेऊन हा २५० केव्हीए जनसेट श्रीसाई प्रसादालयात शिफ्ट करुन घेण्यात यावा.**

(०३) **याकामी अ) १०१० केव्हीए जनसेट + एएमएफ पॅनेल = रुपये ७३,९४,०२२/- (ब) २५० केव्हीए अकाऊस्टीक वर्क + शिफ्टींग वर्क= रु.४,५०,०००/- मिळून, रु.७८,४४,०२२/- इतक्या एकत्रित एकुण रकमेचा कार्यादेश मे.पॉवरिका लि., मुंबई यांना देण्यात यावा,**

(०४) **या दोन्ही जनसेटसाठी करावी लागणारी अर्थिंगची कामे ही श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सबस्टेशनचे कामासाठी नेमणेत येणारे इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांचेकडून करुन घेण्यात यावी व इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांना द्यावयाच्या कार्यादेशात या वाढीव अर्थिंगच्या कामाचा समावेश करणेत यावा,**

(०५) **१०१० केव्हीए जनसेट तसेच जुन्या २५० केव्हीए जनसेट या दोन्ही जनसेटसाठी करावयाची सिव्हिल कामे (दोन्ही जनसेटसाठी स्वतंत्र फाऊंडेशनस, स्वतंत्र शेड, केबल ट्रेंच) संस्थानच्या बांधकाम विभागामार्फत सिव्हिल कॉन्ट्रॅक्टरकडून करुन घेण्यात यावी,**

(०६) **जनसेटसाठी लागणारी केबल व त्यासाठीचे लागणारे अनुषंगिक साहित्य (लग्ज, ग्लॅड वगैरे) कोटेशन मागवून खरेदी करणेत यावी,**

(०७) **उपरोक्त सर्व (अ.क्र. १ ते ६) कामांसाठी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३१** **कनकुरी साठवण तलाव येथील २५० केव्हिए जनसेट खरेदी करणेकामी जनसेट उत्पादक कंपनी मे.कमिन्स,पुणे यांचेकडून आलेले पत्र व कोटेशन्सबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्य.समितीचे दिनांक ०६-०३-२०१० चे सभेतील निर्णयान्वये श्री साईबाबा संस्थानच्या कनकुरी साठवण तलावावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी नविन २५० केव्हीए क्षमतेचा नामांकित कंपनीचा जनरेटर सेट त्वरीत खरेदी करण्यात यावा व त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व जनसेट खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, असे ठरले आहे.

परंतू मा.व्य.समितीचे दिनांक १८-०४-२०१० चे सभेतील निर्णयान्वये यापुढे संस्थानसाठी जनसेट खरेदी करावयाचा असल्यास त्यासाठी कमिन्स कंपनीशी थेट संपर्क साधून जनसेट खरेदी करण्याची पध्दत ठेवावी, असे ठरले.

त्यानुसार मे. कमिन्स, पुणे याचेकडून कनकुरी साठवण तलाव येथील २५० केव्हीए जनरेटरसेट खरेदी करणेकामी वरील संदर्भीय पत्रानुसार कोटेशन मागविणेत आले. त्यांनी आता पत्र पाठविले असून त्यात त्यांनी पुढीलप्रमाणे लेखी कळविले आहे.

श्री साईबाबा संस्थानने २५० केव्हीए कमिन्स कं.च्या जनसेटसाठी कमिन्स कंपनीकडून कोटेशन मागणी केली होती. कमिन्स कंपनीचे संपूर्ण भारतात फक्त तीन सेल्स डीलर ( OEM) असून ते पुढिलप्रमाणे :- (१) मे. सुधिर जनसेट्स, नोईडा, उत्तर प्रदेश, (२) मे. पॉवरिका लि.,मुंबई , (३) मे. जॅकसन्स लि., दिल्ली. यापैकी महाराष्ट्राकरीता मे. पॉवरीका लि, मुंबई हे डिलर आहेत.

संस्थानसाठी लागणाऱ्या २५० केव्हीए कमिन्स कं.च्या जनसेटसाठी कमिन्स कंपनीने या तिघांकडून कोटेशन्स मागितले व ती प्राप्त झाल्यानंतर त्यातील दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे, तो खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | मागणी | मे.सुधिर जनसेट, नोईडा | मे. पॉवरिका , मुंबई | मे. जॅकसन्स लि., दिल्ली |
|---|---|---|---|---|
| ०१) | २५० केव्हीए जनसेट, एएमएफ पॅनेल, केबलींग, अर्थिंग फाऊंडेशन व इतर अनुशंगिक कामे | रु. ४१,२८,१८८/- सर्व टॅक्सेस समाविष्ट | रु. ३८,७१,८५४/- सर्व टॅक्सेस समाविष्ट | रु.४०,८८,५०८/- सर्व टॅक्सेस समाविष्ट |

वरीलपैकी मे.पॉवरीका लि., मुंबई यांचे दर कमी असून मे.पॉवरीका यांचे मुख्य कार्यालय मुंबई येथे व ब्रँच ऑफिस नासिकला आहे . मे.सुधिर जनसेट, यांचे मुख्य कार्यालय नोईडात असून मे. जॅकसन्स लि., यांचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे असल्याने त्यांचे महाराष्ट्र हे कार्यक्षेत्र नसल्याने त्यांचे दर जास्त आहेत. तरी श्री साईबाबा संस्थानने २५० केव्हीए कमिन्स कं.च्या जनसेटसाठी मे.पॉवरीका लि., मुंबई यांना कार्यादेश द्यावा, तसेच कमिन्स ही विक्री व त्यापश्चात सर्विस देण्यास बांधील असून त्याची हमी देत आहोत.

वरीलप्रमाणे मे. कमिन्स इंडिया लि., पुणे यांनी पत्र दिलेले असून याबाबत समक्ष चर्चेसाठी मे. कमिन्स इंडिया लि., पुणे व मे. पॉवरीका लि., नासिक यांचे प्रतिनिधींना चर्चेसाठी मा. व्यवस्थापन समितीपुढे बोलाविण्यात आलेले आहे.

**निर्णय क्र.५५२** **आजच्या सभेत मे.कमिन्स इंडिया लि.,पुणे यांचे श्री.उमेश कल्याणी व मे.पॉवरीका लि.,नाशिक यांचे प्रतिनिधी श्री.मनिष गुप्ता हे चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी याबाबत सविस्तर माहिती सभेस देऊन जनसेट व त्यासाठी लागणाऱ्या एएमएफ पॅनेलच्या दराविषयी निगॉशिएशन करुन त्या दरात डिस्काऊंट दिला आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन,**

**(०१) मे.कमिन्स,पुणे यांनी लेखी कळविल्यानुसार त्यांचे अधिकृत OEM मे.पॉवरिका लि.,मुंबई यांचेकडून २५० केव्हीए क्षमतेचा फक्त एक जनसेट व त्यासाठी लागणारा एक ए.एम.एफ.पॅनेल खरेदी करण्यात यावा. जनसेट + ए.एम.एफ.पॅनेल खरेदीकामी रु.२७,०७,१४३/- इतक्या रकमेचा कार्यादेश मे.पॉवरीका लि., मुंबई यांना देण्यात यावा.**

**(०२) या जनसेटसाठी करावी लागणारी अर्थिंगची कामे ही श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सबस्टेशनचे कामासाठी नेमणेत येणारे इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांचेकडून करुन घेण्यात यावी व इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांना द्यावयाच्या कार्यादेशात या वाढीव अर्थिंगच्या कामाचा समावेश करणेत यावा,**

**(०३) २५० केव्हीए जनसेटसाठी करावयाची सिव्हिल कामे (जनसेटसाठी फाऊंडेशन, स्वतंत्र शेड, केबल ट्रेंच) संस्थानच्या बांधकाम विभागामार्फत सिव्हिल कॉन्ट्रॅक्टरकडून करुन घेण्यात यावी,**

**(०४) जनसेटसाठी लागणारी केबल व त्यासाठीचे लागणारे अनुषंगिक साहित्य (लग्ज, ग्लॅड वगैरे) कोटेशन मागवून खरेदी करणेत यावी,**

**(०५) उपरोक्त सर्व (अ.क्र. १ ते ४) कामांसाठी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३२ गुंतवणूकीबाबत**

**प्रस्ताव-** माहे जुलै ,२०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १४/०७/२०१० | ७,२९,३०,२७६.०० |
| ०२ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १६/०७/२०१० | ८,४५,९९,१२०.०० |
| ०३ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २३/०७/२०१० | ८,३९,२३,६६९.०० |
| ०४ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २३/०७/२०१० | २,५२,९२,०६५.०० |
| ०५ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २७/०७/२०१० | १,३५,००,०००.०० |
| ०६ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २९/०७/२०१० | ६८,००,०००.०० |
| ०७ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २९/०७/२०१० | १,३५,००,०००.०० |
| ०८ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ३१/०७/२०१० | ३५,००,०००.०० |
| ०९ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जुलै २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | **एकूण रक्कम -** | **३५,४०,४५,१३०.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ३५.४० कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) कॅनरा बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ११ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.३५.४० कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं. ०१ ते ०९ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ११ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.३५.४० कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.३३ उपदान रकमेच्या मर्यादेत वाढ करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानमधील एखादा कर्मचारी संस्थान सेवेतून सेवानिवृत्त झाल्यास, राजीनामा दिल्यास किंवा तो कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वीच अकस्मात मयत झाल्यास त्या कर्मचाऱ्याला त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंतची उपदानाची रक्कम The Payment of Gratuity Act १९७२ च्या कायद्यानुसार देण्यात येते.

एखाद्या कर्मचाऱ्याचे सेवानिवृत्त होण्यापूर्वीच अकस्मात निधन झाल्यास त्या कर्मचाऱ्याला त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंतची उपदानाची रक्कम मिळावी व त्याच्या वारसांना मदत व्हावी या हेतूने मा.व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक ४१८ दि.२२-२३/०९/२००१ अन्वये संस्थानच्या कायम कर्मचाऱ्यांसाठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युईटी योजना लागु करण्यात आलेली आहे. त्यानुसार एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे क्लेम दाखल करुन रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधीत कर्मचाऱ्यास आदा करण्यात येते.

सदर कायद्याअंतर्गत कर्मचाऱ्याला त्याचे शेवटचे वेतन व एकुण सेवाकालावधी विचारात घेऊन उपदानाची देय रक्कम आदा केली जाते. सध्या The Payment of Gratuity Act १९७२ या कायद्यानुसार उपदान रकमेची कमाल मर्यादा रु.३,५०,०००/-इतकी आहे. म्हणजे या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम उपदान म्हणुन आदा केली जात नाही. आता The Payment of Gratuity Act १९७२ मध्ये भारत सरकारने खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे.

Ministry of Law & Justice (Legislative Dept.) नवी दिल्ली दि.१८ मे, २०१० चे राजपत्र व श्रम आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील दि.२४ मे, २०१० च्या अधिसुचनेनुसार The Payment of Gratuity (Amendment) Act २०१० (No.१५ of २०१०) अंमलात आणलेला असुन त्याअन्वये दि.२४ मे, २०१० पासून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास उपदानाच्या रकमेची कमाल मर्यादा रु.३,५०,०००/-वरुन रु.१०,००,०००/-पर्यंत वाढविण्यात आालेली आहे. सोबत उपरोक्त राजपत्राची प्रत जोडलेली आहे.

उपदानाची रक्कम आदा करतांना कर्मचाऱ्याचे शेवटचे वेतन व एकुण सेवाकालावधी विचारात घेतला जातो. प्रत्येक वर्षाच्या सेवाकालावधीसाठी १५ दिवसाचे वेतन याप्रमाणे एकुण उपदानाची रक्कम आदा करण्यात येते. त्यामुळे उपदानाची कमाल मर्यादा रुपये ३,५०,०००/- वरून रुपये १०,००,०००/- जरी झाली असली तरी आज प्रत्यक्षपणे कोणत्याही कर्मचाऱ्यास रुपये १०,००,०००/- एवढी रक्कम देय होत नाही. संस्थानामध्ये आजरोजी रुपये ३,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम देय असणारे कर्मचारी फक्त ३७ एवढेच आहेत. त्यांनाही देय होणारी उपदानाची रक्कम रुपये १०,००,०००/- पेक्षा कमीच आहे.

सबब, उपरोक्तप्रमाणे The Payment of Gratuity Act १९७२ मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे कर्मचाऱ्यांना द्यावी लागाणारी उपदानाची कमाल मर्यादा रु.१०,००,०००/- पर्यंत वाढविण्यात आल्यामुळे दि.२४ मे, २०१० नंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना या कायद्यानुसार उपदान रक्कम आदा करावी लागणार आहे. आपले माहितीसाठी व मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५५४ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे The Payment of Gratuity Act १९७२ मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे कर्मचाऱ्यांना द्यावी लागणारी उपदान रकमेची कमाल मर्यादा रु.१०,००,०००/- पर्यंत वाढविण्यात आल्यामुळे दि.२४ मे, २०१० पासून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना या कायद्यानुसार उपदान रक्कम आदा करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.३४ युनियन बँक ऑफ इंडियाच्या विस्तारीत कक्षासाठी दिलेल्या जागेच्या करारनारम्याचे पूढील एक वर्षासाठी नुतनीकरण करणे बाबत**

**प्रस्ताव-** युनियन बँक ऑफ इंडिया ही संस्थानला चांगल्याप्रकारे बँकींग सेवा पुरवत आहे. बँकेचे संस्थानला नेहमीच सहकार्य असून, दक्षिणा पेटी मोजणी, देयकांचे धनादेश इत्यादी सेवा देण्यात तत्पर आहे. या सर्व सेवांचा विचार करुन बॅकेच्या शिर्डी येथील विस्तारीत कक्षासाठी संस्थानच्या घ्साईनाथ छायाङ इमारतीमध्ये एक वर्षासाठी ३६४.४६ चौ. फुट जागा भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे. त्यास शासनाने मंजूरी क्र. सासंवि-२००५/४०८/(६५)-का. सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १८ मे, २००६ अन्वये मान्यता दिलेली आहे. बँकेने त्यांच्या दिनांक २८ एप्रिल २०१० च्या पत्रानुसार सदर जागेस पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

यापूर्वी सन २००८-२००९ चे भाडे रुपये ११,२००/- मध्ये १०% वाढ करुन मासिक भाडे रुपये १२,३००/-प्रमाणे सन २००९-२०१० साठी नुतनीकरण करण्यात आले होते, त्याची मुदत ३१ मार्च २०१० रोजी संपलेली आहे. या भाड्यात १ एप्रिल २०१० च्या पुढे १०% वाढ करुन त्यांना सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी रुपये १३,५५०/- मासिक भाडे आकारावे असे मत आहे.

तरी युनियन बँकेच्या विस्तारीत कक्षासाठी संस्थानच्या घ्साईनाथ छायाङ इमारतीमध्ये देण्यात आलेल्या जागेस रुपये १३,५५०/- मासिक भाडे आकारणी करुन दिनांक ०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीसाठी करारनाम्याचे नुतनीकरण संस्थानच्या विधी विभागामार्फत करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५५ उपरोक्त प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती घेऊन फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.३५ चांदी व सोने नाण्यांच्या विक्री किंमतीचे बदलाबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रींची प्रतिमा असलेली सोन्याची ५ ग्रॅम, १० ग्रॅम वजनाची व चांदीची २० ग्रॅम वजनाची नाणी तसेच २.५ ग्रॅम सोन्याचे पेंडन्टस साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ नुसार येथुनपुढे सोने-चांदीच्या बाजाराभावात वेळोवेळी जसजशी वाढ अथवा घट होईल त्याप्रमाणात सोने-चांदीच्या नाण्यांच्या विक्री मुल्यात वाढ अथवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये, दिनांक १ जानेवारी, २०१० ते ३१ मे २०१० अखेर या कालावधीत सोने व चांदीचे बाजारभावात वाढ तथा घट (संदर्भः- दैनिक सकाळ ) झाल्याने मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात वेळोवेळी, सोने चांदी नाणी व पेडेंन्टसच्या विक्री मुल्यात बदल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रमाणे विक्री मुल्यात केलेल्या बदलाचे विवरण खालील प्रमाणे-

| **अ.नं.** | **दरात बदल केल्याचा दिनांक** | **सोने २.५ ग्रॅम** | **सोने ५ ग्रॅम** | **सोने १० ग्रॅम** | **चांदी २० ग्रॅम** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०१.०१.२०१० | ४४५०/- | ८८५०/- | १७५००/- | ७५०/- |
| ०२ | ०५.०५.२०१० | ४७००/- | ९१५०/- | १८१००/- | ८००/- |
| ०३ | ०८.०५.२०१० | ४८५०/- | ९५००/- | १८८००/- | ७५०/- |
| ०४ | १३.०५.२०१० | ५०००/- | ९७००/- | १९२००/- | ८००/- |
| ०५ | २७.०५.२०१० | ५१००/- | ९९००/- | १९६००/- | ८००/- |

तरी मा.व्यवस्थापन समितीचे आजचे सभेसमोर सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेडेंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक ०१ जानेवारी, २०१० ते ३१ मे, २०१० या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्योत्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीची नाणी व पेडेंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक ०१ जानेवारी, २०१० ते ३१ मे, २०१० या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/बांधकाम विभाग प्रमुख/अधिक्षक,द्वारावती)

---

**विषय नं.३६ भक्तांचे निवासी खोल्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष स्वरुपाची देणगी योजना नियमावालीबाबत.**

**प्रस्ताव-** संदर्भ :- ०१. दिनांक ०८ मे, २००५ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.२२३

०२. दिनांक ०७ जुलै, २००८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.५७४.

०३. दिनांक १८ एप्रिल, २०१० रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.३७२.

(अ) उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये भक्ताचे निवासी खोल्यांसाठी विशेष स्वरुपाची देणगी योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेसाठी देणगी स्वीकारतांना एका भक्ताकडून रु.४ लाख अथवा प्रत्येक भक्तांकडून प्रत्येकी १ लाखाचे पटीत भक्तनिवासस्थान इमारतीचे (व्दारावती) बांधकामा-साठी देणगी स्विकारण्यात यावी असे ठरविण्यात आलेले आहे. या योजनेअंतर्गत देणगी देणाऱ्या साईभक्तांच्या नावांच्या नेमप्लेटस् (Name Plate) खोल्यांना लावण्यात येतील, व अशा देणगीदार भक्तांना वर्षातून दोनदा, प्रत्येक वेळेस ०३ दिवस विनामूल्य निवासाची सोय संस्थानमार्फत उपलब्ध करुन दिली जाईल असा निर्णय झालेला आहे.

त्याअनुषंगाने, सदर योजनेअंतर्गत दि.३० मे, २००८ अखेर एकूण ११४६ भक्तांच्या नावाची यादी (३११ नवीनभक्तनिवास प्रतिक्षा यादीतील व ८३५ व्दारावतीसाठी देणगी देणारे) तयार करण्यात

आलेली आहे. आता व्दारावती भक्तनिवास इमारतीचे काम पूर्ण झाले असून, देणगीदार भक्तांच्या नावाच्या नेमप्लेटस् खोल्यांना लावण्याऐवजी भक्तांच्या नावांची यादी बांधकाम विभागामार्फत व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये लावण्यात आलेली असून, संबंधीत देणगीदार भक्तांना याबाबत कळविणे व ठरल्याप्रमाणे त्यांना सुविधा सुरुकरणे गरजेचे आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भ क्र.०३ अन्वये, भक्ताचे निवासी खोल्यांसाठी विशेष स्वरुपाची देणगी देणाऱ्या भक्तांना देण्यात येणाऱ्या विनामूल्य निवासाबाबतची नियमावली मंजूर करुन घेणेबाबतचा निर्णय झालेला आहे.

त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे नियमावली तयार करण्यात येत आहे.

०१. निर्णय क्र.३७२ अन्वये ठरलेप्रमाणे सुविधा देणे सहज सोईस्कर होणेसाठी, उपरोक्तप्रमाणे तयार करण्यात आलेल्या यादीतील सर्व देणगीदार भक्तांना भक्तनिवास प्रोजेक्ट कार्ड (Bhaktaniwas Project Card) पुरविण्यात येतील. भक्तांना रुम देतांना व्दारावती भक्तनिवास विभागप्रमुख हे सदर कार्ड पाहूनच रुम देतील.

०२. या योजनेअंतर्गत देणगी देणाऱ्या भक्तांना विनामूल्य निवासाची सोय देणेबाबतचा कालावधी १५ वर्षापर्यंत मर्यादित राहील.

०३. सदर योजनेअंतर्गत देणगी देतांना भक्तांनी एकसारखी रक्कम दिलेली नसून रु१ लाख ते रु४ लाख अशी वेगवेगळी दिलेली आहे. त्यामुळे निवासाबाबत सर्व देणगीदार भक्तांना सारखीच सुविधा न देता त्यांच्या देणगी रकमेनुसार सुविधा द्यावी, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे -

| अ.नं. | देणगी रक्कम | निवास व्यवस्था सुविधा(प्रतिवर्षाकरीता)<br>(एका वेळेस कमीत कमी ०१ दिवस व जास्तीत जास्त ०३ दिवस) |
|---|---|---|
| अ. | रु.१,००,०००/- पर्यत | १० दिवस |
| ब. | रु.१,००,००१/- ते रु.२,००,०००/- पर्यत | १५ दिवस |
| क. | रु.२,००,००१/- ते रु.३,००,०००/- पर्यत | २० दिवस |
| ड. | रु.३,००,००१/- ते रु.४,००,०००/- पर्यत | २५ दिवस |
| इ. | रु.४,००,००१/- व त्या पुढील | ३० दिवस |

०४. रुमसाठी भक्तांनी कमीत कमी १५ दिवस अगोदर लेखी कळवावे व शिर्डीत आल्यानंतर संस्थानच्या पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

अ. व्दारावती भक्तनिवास विभाग दुरध्वनी क्र. ०२४२३-२५९०४७

०५. भक्तनिवास प्रोजेक्टकार्डचा वापर फक्त देणगीदार भक्तांच्या कुटुंबीयासाठीच (स्वतः पत्नी, आई-वडील, मुलगा, मुलगी इत्यादी) मर्यादीत राहिल.

०६. भक्तनिवास प्रोजेक्ट कार्ड हरवल्यास/चोरी गेल्यास ते पुन्हा डुप्लीकेट मिळणार नाही, त्यामुळे ते संभाळण्याची संपूर्ण जबाबदारी भक्तावर राहील.

०७. ज्या त्या वर्षाची विनामुल्य निवासव्यवस्था ही त्या त्या वर्षातच घेणे बंधनकारक राहील. त्यासाठी संस्थानचे हिशोबाचे आर्थिक वर्ष (एप्रिल ते मार्च) असे ग्राहय धरण्यात येईल.

(ब) संदर्भ क्र.०१ अन्वये भक्तांच्या नावांच्या नेमप्लेटस रुमला लावणेबाबत निर्णय झालेला होता. तथापि, या योजनेअंतर्गत जमा होणाऱ्या रकमेचा ओघ पाहता मर्यादेपेक्षा जास्त रक्कम जमा झाल्यास अडचणी येतील, म्हणून दि.३१ मे, २००८ अखेर सदर योजना स्थगित ठेवावी किंवा कसे याबाबत दि.०७.०७.२००८ रोजीच्या सभेपुढे सदर विषय ठेवण्यात आलेला होता. उपरोक्त संदर्भ क्र.०२ च्या अन्वये, जमा झालेल्या रकमेसंदर्भातील देणगीदार भक्तांच्या नावांची यादी पुढील कार्यवाहीसाठी बांधकाम विभागाकडे पाठवावी व सदर योजनेअंर्तगत प्राप्त होणारी देणगी स्विकारणे स्थगित करण्याऐवजी संस्थानच्या भविष्य काळातील नियोजित प्रकल्पांसाठी एका खोलीसाठी रु ५ लाखाप्रमाणे देणगी स्विकारण्यात यावी. यामध्ये किमान रुपये १ लाखची टप्प्याटप्प्याने देणगी घेण्यात यावी सदर देणगीदार साईभक्तांची प्रतिक्षा यादी तयार करुन वेळोवेळी पुढील कार्यवाहीसाठी बांधकाम विभागाकडे कळविण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

त्याअनुषंगाने दि.०१ जून २००८ ते ३१ मार्च २०१० अखेर एकूण ४९६ भक्तांच्या नावांची प्रतिक्षा यादी तयार झालेली आहे. भविष्यातील नियोजित प्रकल्प सध्यातरी विचाराधीन नसल्याने. सदर

प्रतिक्षा यादीतील भक्तांच्या नावांचे बोर्ड बांधकाम विभागामार्फत तयार करुन व्दारावती इमारतीमध्ये स्वतंत्रपणे लावल्यास सदर यादीतील भक्तांनाही या योजनेला लाभ मिळेल असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त योजनेअंतर्गत देणगी देणाऱ्या भक्तांना देण्यात येणारी विनामूल्य निवासाच्या सुविधेचा कालावधी हा किती वर्षापर्यंत मर्यादित असावा, देणगीदार भक्तांना भक्तनिवास प्रोजेक्ट कार्ड देणेबाबत व दि.३१ मार्च २०१० अखेरच्या प्रतिक्षा यादीतील भक्तांच्या नावांची यादी व्दारावती इमारतीमध्ये लावून त्यांनाही वरीलप्रमाणे निवास सुविधा देणेबाबत योग्य तो निर्णय होणेकामी व उपरोक्त नियमावलीस मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.५५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांचे निवासी खोल्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष स्वरुपाची देणगी योजना नियमावालीस मान्यता देण्यात आली. तसेच दि.३१ मार्च २०१० अखेरच्या प्रतिक्षा यादीतील भक्तांच्या नावांची यादी व्दारावती इमारतीमध्ये लावण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी / बांधकाम विभाग प्रमुख/ अधिक्षक, द्वारावती )

---

**विषय न ३७ संस्थान निधीतून मौजे निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्रमांक ११ बंदिस्त करुन रस्ता विकसित करणे बाबत.**

**प्रस्ताव- (अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६९ नुसार खालीलप्रमाणे मान्यता मिळालेली आहे :

.. .. उपरोक्त परिच्छेदांत नमूद केल्यानुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्रमांक ११ (अहमदनगर-मनमाड राज्यमार्ग ते कालवा हेडपर्यन्त अंदाजे २ किमी) पाईप टाकून बंदीस्त करणेस व त्यावरुन १२ मीटर रुंदीचा अथवा जास्तीत जास्त उपलब्ध रुंदीचा रस्ता संस्थान निधीतून विकसित करणेस व त्याकामी विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

सदरहू निर्णयाचे अनुषंगाने मा. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन तसेच मा. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडेस विषयांकित चारी क्रमांक ११ वरुन संस्थान खर्चाने सुमारे ०२ किलोमीटर लांबीचा व १२ मीटर रुंदीचा (उपलब्धतेनुसार) रस्ता विकसित करणेस मान्यता मिळावी तसेच सदरहू जागा सार्वजनिक वापरासाठी विनामुल्य अथवा नाममात्र भाडेपट्टयाने मिळावी म्हणून विनंती प्रस्ताव सादर करण्यात आलेले होता.

याच अनुषंगाने मा. ना. श्री. अजितराव पवार, जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मा. अध्यक्षसो. यांनी वेळोवेळी समक्ष व विनंती पत्रव्यवहाराव्दारे पाठपुरावा केला होता. त्यास अनुसरुन, मा. जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २२ जून, २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित केली होती, त्या बैठकीस संस्थानतर्फे मा. अध्यक्षसो. हे ही हजर होते. सदरहू बैठकीत, मा. जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी विषयांकित चारी क्रमांक ११ वरुन संस्थान निधीतून रस्ता विकसित करणेस मान्यता देणेबाबत जलसंपदा विभागाचे अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहेत.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे, विषयांकित चारी क्रमांक ११ वरुन रस्ता विकसित करणे हे काम विशिष्ट तांत्रिक स्वरुपाचे असल्याने, जलसंपदा विभागाशी समन्वय साधून सदर रस्ता विकसित करणेसाठी बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. यापूर्वी शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातील प्रथम गटातील ११ रस्त्यांपैकी संस्थानमार्फत विकसित करावयाचे ०६ रस्त्यांसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ एप्रिल, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३७६ नुसार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून Pre- tender आणि Post- tender नंतरच्या सेवांसाठी नेमणूक करण्यात येऊन त्यांना याकामी सल्लागार शुल्क म्हणून २.५% (अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स) आदा करणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

**(क)** उपरोक्त विवेचनास अनुसरुन, विषयांकित चारी क्रमांक ११ वरुन रस्ता विकसित करणेकामी तयार करावयाचे बांधकाम आराखडे, अंदाजपत्रके तसेच Pre- tender आणि Post- tender नंतरच्या सेवांसाठी मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून पूर्वीचेच मंजूर सल्लागार शुल्क २.५% (अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स) नेमणूक करणेस मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, चारी क्रमांक ११ वरुन रस्ता विकसित करणेकामी तयार करावयाचे बांधकाम आराखडे, अंदाजपत्रके तसेच Pre- tender आणि Post- tender सेवांसाठी मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून पूर्वीचेच मंजूर सल्लागार शुल्क २.५% (अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स) यावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदर रस्ता विकसीत करणेसाठी पाटबंधारे खात्याशी समन्वय साधुन, तयार करणेत येणारे बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक याबाबत तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविण्याची कार्यवाही करणेत यावी. याकामी विहित पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन, सिलबंद निविदा मागविणे, रस्ता विकसीत करणे इ.साठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत येत असून याकामी विहीत पध्दतीने शासन मान्यता घेणेत यावी, दरम्यान दर नमुद केलेली कार्यवाही करणेस मान्यता देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमख)

---

**विषय नं.३८ श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळेतील Hematology चे तपासण्याचे सुधारित दर निश्चितीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय, प्रयोगशाळा विभागातील Hematology चे तपासण्यांचे सुधारीत दरांबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.०१.२०१० रोजीचे सभेत विषय नं.३० अन्वये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले.

सदर प्रस्तावावर श्री साईनाथ रुग्णालयाच्या पॅथोलॉजिस्ट, डॉ. इरा भारद्वाज व मा.उपकार्यकारी अधिकारी यांच्यात झालेल्या चर्चेप्रमाणे डॉ.इरा भारद्वाज यांनी दि.१९.०२.२०१० अन्वये सदर टेस्टचे दराबाबत श्री साईबाबा हॉस्पिटल, प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी व खाजगी लॅबमध्ये (डॉ.पऱ्हे, श्रीरामपूर) येथे सध्या आकारत असलेल्या दरांबाबत व तसेच श्री साईनाथ रुग्णालयात मागील तीन वर्षातील Hematology तपासण्यांची संख्या खालीलप्रमाणे-

०१) मागील तीन वर्षातील श्री साईनाथ रुग्णालयातील Hematology अंतर्गत केल्या जाणाऱ्या तपासण्यंचा अहवाल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपासण्या | वर्ष | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | 2007 | 2008 | 2009 | |
| 1 | CBC | 23003 | 22848 | 28639 | 74490 |
| 2 | Blood Group | 6733 | 6572 | 10146 | 23451 |
| 3 | Ps for MP/ Rapid MP | 2638 | 2396 | 3776 | 8783 |
| 4 | ESR | 4901 | 6875 | 7723 | 19499 |
| 5 | BT/ CT | 3961 | 6199 | 8097 | 18257 |
| 6 | P.Time/ INR | 474 | 498 | 522 | 1794 |
| 7 | PS for opinion | 447 | 456 | 924 | 1827 |
| 8 | AES | 25 | 30 | 31 | 86 |
| 9 | PTT | 15 | 01 | 10 | 26 |
| 10 | Sickling Test | 14 | 03 | 10 | 27 |
| 11 | Retic Count | 20 | 08 | 15 | 43 |
| | एकूण- | 422231 | 45859 | 59893 | 148283 |

०२) श्री साईबाबा हॉस्पिटल, प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी व खाजगी लॅबमध्ये (डॉ.पऱ्हे, श्रीरामपूर) येथे आकारले जाणारे दरांचा तुलनात्मक तक्ता आपले अवलोकनार्थ सादर.

| अ.नं. | तपासण्या | श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सध्या आकारत असलेले दर | प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी येथे आकारत असलेले दर | खाजगी लॅब (डॉ.पऱ्हे, श्रीरामपूर) यांचेकडे आकारत असलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | CBC | 35/- | 85/- | 100/- |
| 2 | Blood Group | 35/- | 40/- | 30/- |
| 3 | Ps for MP | 35/- | 55/- | 60/- |
| 4 | Rapid MP | 350/- | 150/- | 200/- |
| 5 | ESR | 10/- | 10/- | 20/- |
| 6 | BT/ CT | 45/- | 20/- | 50/- |
| 7 | P.T./ INR | 80/- | 110/- | 200/- |
| 8 | PS for opinion | 55/- | 50/- | 100/- |
| 9 | AEC | 45/- | 6/- | 80/- |
| 10 | PTTK | 185/- | 200/- | 300/- |
| 11 | Sickling Test | 55/- | 40/- | 100/- |
| 12 | Retic Count | 45/- | 40/- | 100/- |

- श्री साईनाथ रुग्णालयात सध्या Hematology अंतर्गत होणाऱ्या तपासण्या व दरांबाबतचा तक्ता-

| अ.नं. | तपासण्या | सुधारित (प्रस्तावीत) दर |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | CBC (HB, TLC, DLC, PCV & PLT COUNT) | HB - Rs 04/-TLC-DLC - Rs 05/- PLT- Rs 10/-PCV - Rs 10/- |
| 2 | Ps for OPINION (CBC+ SLIDE) | Rs 10/- |
| 3 | AEC (CBC+ SLIDE) | Rs 10/- |
| 4 | Rectic Count (CBC+ SLIDE) | Rs 10/- |
| 5 | Slick ling test (CBC+ SLIDE) | Rs 10/- |
| 6 | PS for MP<br>Rapid MP | Rs 05/-<br>Rs 100/- |
| 7 | PT/ INR | Rs 10/- |
| 8 | PTT | Rs 10/- |
| 9 | Blood Group | Rs 05/- |
| 10 | BT/CT | Rs 06/- |
| 11 | ESR | Rs 05/- |

उपरोक्त सध्याचे आकारत असलेले दर हे फार पुर्वीचे असून, खालील प्रस्तावीत केलेले दर हे सदर तपासण्यासाठी लागणारे सिरिंज, निडल व इतर लिक्वीड यांचा सध्या बाजारात असलेल्या किमतींचा व रुग्णालयातील इतर खर्चाचा विचार करुन आपले अवलोकनार्थ सादर करीत आहे.

अवलोकन होऊन नव्याने लागू करावयाचे सुधारित (प्रस्तावीत) दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | तपासण्या | सुधारित (प्रस्तावीत) दर |
|---|---|---|
| 1 | CBC (HB, TLC, DLC, PCV & PLT COUNT) | Rs 30/- |
| 2 | Ps for OPINION (CBC+ SLIDE) | Rs 30+20=50 |
| 3 | AEC | Rs 30+20=50 |
| 4 | Rectic Count | Rs 30+20=50 |
| 5 | Slick ling test | Rs 30+20=50 |
| 6 | PS for MP<br>Rapid MP | Rs 65/- |
| 7 | PT/ INR | Rs 50/- |
| 8 | PTT | Rs 50/- |
| 9 | Blood Group | Rs 20/- |
| 10 | BT/CT | Rs 10/- |
| 11 | ESR | Rs 10/- |

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील Hematology अंतर्गत येणाऱ्या तपासण्यांचे वरील प्रस्तावीत केल्याप्रमाणे सुधारित दराने आकारणी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५९ वरिल विषयाबाबत चर्चा होऊन खालीलप्रमाणे सुधारित दर मंजुर करण्यात आले.**

| अ.नं. | तपासण्या | श्री साईनाथ रुग्णालयात सध्या आकारत असलेले दर | श्री साईनाथ रुग्णालयात आकारावयाचे सुधारित दर |
|---|---|---|---|
| 1 | CBC (HB, TLC, DLC, PCV & PLT COUNT) | HB - Rs 04/-<br>TLC-DLC- Rs 05/-<br>PLT- Rs 10/-<br>PCV - Rs 10/- | HB - Rs 05/-<br>TLC-DLC - Rs 10/-<br>PLT- Rs 10/-<br>PCV - Rs 10/- |
| 2 | Ps for OPINION (CBC+ SLIDE) | Rs 10/- | Rs 40/- |
| 3 | AEC (CBC+ SLIDE) | Rs 10/- | Rs 30/- |
| 4 | Rectic Count | Rs 10/- | Rs 35/- |
| 5 | Slick ling test | --- | Rs 30/- |
| 6 | PS for MP<br>Rapid MP | Rs 05/-<br>Rs 100/- | Rs 20/-<br>Rs 100/- |
| 7 | PT/ INR | Rs 10/- | Rs 50/- |
| 8 | PTT | Rs 10/- | Rs 100/- |
| 9 | Blood Group | Rs 05/- | Rs 20/- |
| 10 | BT/CT | Rs 06/- | Rs 20/- |
| 11 | ESR | Rs 05/- | Rs 10/- |

**तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सध्या केसपेपरचे दर हे रु.१/- प्रति केसपेपर असे आहेत. त्यात सुधारणा करुन हे दर रु.१०/- प्रति केसपेपर असे करण्यात यावेत.**

**सदर केसपेपर काढलेनंतर पंधरा दिवसांच्या आत रुग्ण पुन्हा तपासणीसाठी आल्यास त्यासाठी रु.५/- इतके आकारण्यात यावेत. तसेच सदर केस पेपरवर एका वेळेस फक्त दोन दिवसांची औषधे देण्यात यावीत.**

**सदर निर्णयाची कार्यवाही दि.१५.०८.२०१० पासून करण्यात यावी.**

**तसेच श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालयाच्या प्रयोगशाळेतील तपासण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या केमिकल्स/ रियेजन्टसच्या वाढत्या किमतीचा विचार करुन, दोनही हॉस्पिटलच्या प्रयोगशातील तपासण्यांचे सुधारित दराचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय न.३९ संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बिलांचा परतावा मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे.

**(अ)**

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रदिप भालचंद्र धर्माधिकारी | मुलगी | Psychological Disorder | डॉ.सहस्त्रबुध्दे, श्रीरामपुर | ६७२.०० | ५३८.०० |
| २ | श्री. प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | आई व वडील | Diabetis & Blood Pressure | श्री साईनाथ हॉस्पिटल,शिर्डी | १७६०.०० | १७६०.०० |
| ३ | श्री. दिनकर हनुमंत डोखे, | स्वतः | Heart Disease | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १६०४.०० | १५९८.०० |
| ४ | श्री. नंदकिशोर चंद्रकांत जमधडे, | वडील | Hepatocellular Carcinoma | नामको चॅरिटेबल ट्रस्ट, नाशिक | २४८१.०० | २४८१.०० |
| ५ | श्री. वसंत शिवाजी चौधरी | वडील | Ichemic Heart Disease with LV Disfunction for Stress Test. | Nuscint Diagnostic Pvt.Ltd, Isotope Scan Centre, Nashik | ८०००.०० | ६४००.०० |
| ६ | श्री. सतिष गंगाधर बकरे | मुलगी | Maleria | श्री साईनाथ हॉस्पिटल,शिर्डी | १३३६.०० | १३३६.०० |
| ७ | श्री. किरण पेत्रस खरात, | आई | Ca Cervix | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी | २३७१९.०० | २३७१९.०० |
| ८ | श्री. अर्जुन वनसिंग रजपुत | पत्नी | Lymphangioma of Pancreas | साईबाबा हॉस्पिटल व के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई | ११६१५.०० | ११६१५.०० |
| ९ | सौ. कल्पना रघुनाथ मुसमाडे | आई | C.R.F. | श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल, शिर्डी | ७२५९.०० | ७२३७.०० |
| १० | श्री. श्रीनिवास दत्तोपंत नाईक | आई | Fracture of Hip Joint | श्री साईनाथ हॉस्पिटल,शिर्डी | १६९११.०० | १६७९३.०० |
| ११ | श्री. दत्तात्रय दगडु सालपुरे | मुलगा | Carcinoma of Blood | के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे | १३८६०२.०० | ६३६०२.०० |
| | | | | वजा ॲडव्हान्स रु. | ७५०००.०० | |
| | | | ॲड. वजा जाता शिल्लक रक्कम रु.- | | ६३६०२.०० | |
| १२ | श्री. रावस निलेश बाळकृष्ण | स्वतः | Pain in Abdomen | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | २३६३.०० | २३६३.०० |
| १३ | सौ. सुर्वे वैशाली वसंतराव | आई | Diabetis & Blood Pressure | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ७३४८.०० | ६८३६.०० |
| १४ | श्री. नंदकिशोर चंद्रकांत जमधडे | आई | Ovarian Cancer | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी | ६७१४.०० | ६,७१४.०० |
| १५ | श्री. अनिल नामदेव वाणी | वडील | Fracture of Tibiafibula | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | १०१८६३.०० | १००९८३.०० |
| १६ | श्री. रावसाहेब दामु त्रिभुवन | वडील | Gangrene with Cellulits Perineal Region with penis | फडके हॉस्पिटल, कोपरगांव | ३७९७६.०० | २८१८४.०० |
| १७ | श्री. मधुकर जयराम महाजन | स्वतः व मुलगी | Heart Disease | डॉ.दिलीप पाटील व जीवनज्योत चिल्ड्रन हॉस्पिटल, मुंबई | ७७५३.०० | ५६५०.०० |
| १८ | श्री. रावसाहेब प्रभाकर गाडेकर | वडील | Hypertension | मंगेश हॉस्पिटल, श्रीरामपुर | १७०००.०० | ११७७६.०० |
| १९ | डॉ. सी. एस. बोबडे | स्वतः | Arthirtis | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १८१९.०० | १८१९.०० |
| २० | डॉ. प्रणोती रुपेश जडगे | स्वतः | Allergic Rhinits & Pregnancy | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | ४४१२.०० | ४४१२.०० |
| २१ | श्री. विलास पंडित जोशी | स्वतः | Diabetis & Blood Pressure | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | १८१४.०० | १८१४.०० |
| २२ | श्री. पांडुरंग ए.बकरे | आई | Blood Pressure | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | १४५६.०० | १४५६.०० |
| २३ | डॉ. एन. एस. म्हस्के | स्वतः, पत्नी व मुलगा | Blood Pressure & Diabetis | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | ३२१४.०० | ३२१४.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण रक्कम रु | | ४०७६९१.०० | ३१२३००.०० |

**(ब)**

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.रमेश चांगदेव पुजारी | स्वत: | Acute Renal Failure | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १३४०११.०० | १३०५४६.०० |
| | | | | वजा ॲडव्हान्स रु. | | ५००००.०० |
| | | | ॲड. वजा जाता शिल्लक रक्कम रु.- | | | ८०५४६.०० |
| २ | श्री.प्रशांत महादु देवरे | आई | Heart Disease | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | १५६९.०० | १५३५.०० |
| ३ | श्री.सतिष गंगाधर बकरे | पत्नी | Polyarthiritis | दिनानाथ मंगेशकर, पुणे | ६७०५.०० | ६७०५.०० |
| ४ | श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर | वडील | Hernia & Plastic Surgery | सह्याद्री हॉस्पिटल, नाशिक | १४०९९०.०० | १२८३७०.०० |
| ५ | श्री.प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | आई | Diabeties & Blood Pressure | श्री साईनाथ हॉस्पिटल, शिर्डी | ३४७८.०० | ३४७८.०० |
| ६ | सौ.संगिता संजय थोरात | पती | Heart Disease | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | १७९१.०० | १७९१.०० |
| ७ | श्री.दिनकर हनुमंत डोखे | स्वत: | Heart Disease | साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | ३००.०० | ३००.०० |
| ८ | श्री.श्रावण माधव चौधरी | स्वत: व आई | Heart Disease & Diabeties | श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल, शिर्डी | ७९५.०० | ७९५.०० |
| ९ | श्री.राजेंद्र देवराम वैराळ | पत्नी | Right Carcinom of Breast | प्रवरा हॉस्पिटल, लोणी | १७४०.०० | १७४०.०० |
| १० | डॉ.सौ.प्रणोती रुपेश जडगे | आई | Arthritis | श्रीसाईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | ४८२.०० | ३३४.०० |
| ११ | डॉ.एन.एस.म्हस्के | स्वत: | Diabeties | श्रीसाईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | ८७८.०० | ८७८.०० |
| १२ | श्री.अर्जुनसिंग वनसिंग रजपुत | पत्नी | Allergic Rhinitis | श्री साईनाथ हॉस्पिटल, शिर्डी | ४८३.०० | ४८३.०० |
| १३ | श्री.विठ्ठल काशिनाथ महांकळे | मुलगा | Accidental Case | श्रीसाईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | २३१९९.०० | १९४११.०० |
| १४ | सौ.ॲग्नेस जॉर्ज देठे | मुलगा | Hydro Cephalaus with Spine Bifides with Maningomyclocele | आनंदऋषीजी हॉस्पिटल, अहमदनगर | ४८८२८.०० | ४८८२८.०० |
| १५. | डॉ.विजयकुमार भागचंद बाकलीवाल | आई | Arteries Blockage with IHD + DM | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | ८९७६८.०० | ८८२८९.०० |
| | | | एकूण रक्कम रु | | ४५५०१७.०० | ३८३४८३.०० |

**निर्णय क्र.५६० उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४० माहे एप्रिल-२०१० मध्ये Triple Lumen Catheter चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागात प्रत्येक कार्डीयाक शस्त्रक्रियेकरीता उपरोक्त Triple Lumen Catheter वापरण्यात येत असते. सदर सर्जिकल मटेरीयलकरीता सन २००९-१० या वर्षाकरीता मे. बी.एल. लाईफसायन्स, नवी दिल्ली यांना इकडील पत्र क्र.५३३९ दि. ०५/०५/२००९ अन्वये ६०० नगांचा प्रती नग रु.६७६/- प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे Triple Lumen Catheter १७० नगांचा पुरवठा केला होता, त्यानुसार सदरचे मटेरीयल कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागात वापरण्यास दिल्यानंतर त्यांना उपरोक्त मटेरीयल समाधानकारक वाटले नाही, त्यामुळे दि.०१/१०/२००९ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये BL कंपनीऐवजी उर्वरीत ४३० नग मे. महेश सर्जिकल, पुणे यांचेकडून प्रती नग रु.६७६/- याप्रमाणे Romson या कंपनीचे मटेरीयल खरेदी करण्यात आले होते.

मे. महेश सर्जिकल, पुणे यांनी ४३० नगांचा दि.२४/१०/२००९ रोजी पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा केला होता, परंतु सदरचा साठा दि. २९/०३/२०१० रोजी संपलेमुळे व सदरच्या मटेरीयलची कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागात आवश्यकता असल्यामुळे पुन्हा अतिरीक्त ४०० नगांचा खरेदीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. सदर मटेरीयल मा. व्यवस्थापन समिती सभेची मंजुरी मिळून उपलब्ध होण्यास कालावधी लागणार होता. सदरच्या मटेरीयलची रुग्णालयात दैनंदिन शस्त्रक्रियाकरीता तातडीने आवश्यकता होती, मे. बी. एल. लाईफसायन्स, नवी दिल्ली यांनी १७० नगांचा पुरवठा केल्यानंतर पुन्हा दि. २६/११/२००९ रोजी १०० नगांचा पुरवठा केला होता. परंतु त्यांचा उपरोक्त आयटमचा पुरवठा आदेश रद्द केलेला असल्यामुळे त्यातील १०० नग परत करणेसाठी बाजुला ठेवण्यात आले होते, परंतु दि.२९/०३/२०१० रोजी Triple Lumen चा साठा संपलेमुळे व

दैनंदिन वापरासाठी सदर मटेरीयलची आवश्यकता असल्यामुळे जसे जसे लागतील तसे तसे वापरण्यास देण्यात आले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| दिनांक | वापरण्यास दिलेले मटेरीयल (संख्या) |
|---|---|
| ०२/०४/२०१० | १० |
| ०३/०४/२०१० | २० |
| १२/०४/२०१० | २० |
| १६/०४/२०१० | २० |
| २२/०४/२०१० | २० |

त्यासाठी वार्षिक निविदेतील मंजुर दराने रु.६०,८४०/- मात्र खर्च आलेला आहे.

सदरची खरेदी ही माहे- एप्रिलमध्ये केलेली आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००६ निर्णय क्र. ३४८ नुसार वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु. १,००,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत, तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्र. ७५९ (२८-८) अन्वये वैद्यकिय संचालक यांनी त्यांचे अधिकारात स्थानिक मेडीकल स्टोअर्समधून तातडीची खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. परंतु सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांचे रु. १,००,०००/- चे तरतुदी व्यतिरीक्त करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 01 | B.L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | 2397 | 17/11/2009 | 60840.00 |
| | Total Amount in Rs.- | 60840.00 | | |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.६०,८४०/- (रु. साठ हजार आठशे चाळीस मात्र) चे खरेदीस व खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे माहे एप्रिल-२०१० मध्ये Triple Lumen Catheter चे तातडीने केलेल्या खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रुपये ६०,८४०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४१ सन २००९-१० या वर्षातील मंजूर दराने लॅब केमिकल /सर्जिकल साहित्य खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या लॅब केमीकल्स / सर्जिकल साहित्याकरीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठाधारकांनी पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या खालील लॅब केमीकल्स / सर्जिकल साहित्याचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही, रुग्णालयात पेशंटच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे औषधे, लॅब केमीकल्स व सर्जिकल साहित्याचा वापर देखील वाढलेला आहे. तसेच कार्डीयाक ऑपरेशन थिएटर मधील ऑपरेशनच्या संख्येत देखील वाढ झालेली आहे.

सन २०१०-११ या वर्षाकरीता वार्षिक औषधे खरेदीकामी जाहिरात देऊन दि.२४/०४/२०१० अखेर निविदा मागवण्यात आलेल्या आहेत, परंतू सदरची औषधे / लॅब केमीकल्स / सर्जीकल साहित्य उपलब्ध होईपर्यंत औषधांचा तुटवडा भासु नये व रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता तुर्तास तीन महिने पुरु शकेल इतका औषध साठा मागील मंजुर दराने खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Name of Supplier | P.O.No. / Date | Make | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | INTRODUCER NEEDLE | Critical Care Systems, Pune | 5349 – 05/05/09 | BL / LIFELINE | 1000 | 52.92 | 52920.00 |
| 2 | SLS CLIPS YELLOW QTY. IN BOX (1 BOX = 30 NOS.) | B.L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | 5339 – 05/05/09 | VITALITEC, FRANCE | 30 | 4212.00 | 126360.00 |
| 3 | SLS CLIPS BLUE QTY. IN BOX (1 BOX = 30 NOS.) | B.L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | 5339 – 05/05/09 | VITALITEC, FRANCE | 20 | 4212.00 | 84240.00 |
| 4 | TUBING SET ADULT | B.L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | 5339 – 05/05/09 | PERFX | 200 | 1820.00 | 364000.00 |
| 5 | ESTROGEN RECEPTOR ID 5 List No AM272-2M SIZE. 3ML | J.S.P. Surgicals, Nashik | 5365 – 05/05/09 | BIOGENEX | 01 | 10355.00 | 10355.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | DISTILLED D-IONISED WATER 1X 5LIT. | Lotus Diagnostics (P) Ltd., Navsari | 5378 – 05/05/09 | LOTUS | 75 | 105.00 | 7875.00 |
| 7 | REAGENT MODULE - EBG - (BLOOD GAS ANALYSER) | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai | 5431 – 05/05/09 | MEDICA | 3 | 22218.00 | 66654.00 |
| 8 | E.C.G.ELECTRODE | Sign Enterprises, Pune | 5424 – 05/05/09 | SWAROMED | 20000 | 3.0282 | 60564.00 |
| 9 | ABGEL/ GELFORM | Yoga Enterprises, Pune | 5443 – 05/05/09 | ECURE | 100 | 58.24 | 5824.00 |
| 10 | PLEURAL DRAINGE KIT (1 SET CONTAINS 3 BOTTLE) | Rahul Brothers, Mumbai | 5400 – 05/05/09 | POLY-MED | 25 | 520.00 | 13000.00 |
| 11 | ETHIBOND ½ CIRCLE TAPER CUT 5 GREEN 5 WHITE CODE W10B77 | Johnson & Johnson Limited, Mumbai | 5368 – 05/05/09 | J & J | 10 | 20938.00 | 209380.00 |
| | | | | | | **Total -** | 10,01,172.00 |

सदरचे लॅब केमीकल्स / सर्जिकल साहित्य खरेदीकामी पुरवठाधारकांचे वार्षिक मंजुर दरानुसार रु.१०,०१,१७२/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०५/२००९ निर्णय क्रमांक ३८१ (A) अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी लॅब केमीकल्स / सर्जिकल साहित्य वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.१०,०१,१७२/- चे खरेदीस व खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २००९-१० या वर्षातील मंजूर दराने लॅब केमिकल /सर्जिकल साहित्य वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.१०,०१,१७२/- चे खरेदीस व खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४२ मे .बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांचे ऑक्सीजन व नायट्रस गॅसची ऑर्डर मिळणेबाबतचे पत्र**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात वेगवेगळ्या सेंट्रल ऑक्सीजन व नायट्रस सिस्टिम असून सदर सिस्टिमचा ऑक्सीजन व नायट्रस गॅस हा सर्व वार्ड / विभागामध्ये रुग्णांच्या आवश्यकतेनुसार वापरण्यात येत असतो. सदरचे दोन्ही सिस्टिम करता लागणारा ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी दि.१०/०१/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात वेगवेगळ्या सेंट्रल ऑक्सीजन व नायट्रस सिस्टिम कार्यान्वीत असून सदर सिस्टिमकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. २४३८ ते २४४७ दि.०६/०२/२०१० अन्वये एकुण ११ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि.२६/०२/२०१० अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे नऊ कोटेशन प्राप्त झालेले होते.

1. M/s. Ahmednagar Industrial Gases Pvt. Ltd., Ahmednagar.
2. M/s. Balaji Trading Co., Sangamner.
3. M/s. Nikhil Medico Gases, Nashik.
4. M/s. Nitroxy Medichem, Loni.
5. M/s. P. Pahade Agencies, Yeola.
6. M/s. Pankaj Gases, Shrirampur.
7. M/s. Rahul Gases, Shrirampur.
8. M/s. Shradha Agencies, Ahmednagar.
9. M/s. Laxmi Gases, Sinnar.

वरीलप्रमाणे प्राप्त कोटेशन दि.०६/०३/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत समक्ष उघडण्यात आली होती. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, कोटेशन सादरकर्त्यांना दि. १८/०४/२०१० रोजीचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. चर्चा / वाटाघाटीअंती मे. अहमदनगर इंडस्ट्रीयल गॅसेस, अहमदनगर यांना ऑक्सीजन गॅस प्रती क्युबीक रु. १६.२८ व नायट्रस गॅस रु. ०.२१९० प्रती लिटर याप्रमाणे मंजुर होऊन इकडील पत्र क्र. ७०८२ दि. ०७/०५/२०१० अन्वये कार्यादेश देण्यात आलेला असून त्यांचेशी करारनामा देखील करुन घेण्यात आलेला आहे. त्यांनी दि. ०९/०५/२०१० पासून नियमित पुरवठा देखील चालु केलेला आहे.

मे. बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांनी दि. ०५/०५/२०१० चे पत्रान्वये (प्राप्त दि. १२/०५/२०१०) आम्ही संस्थानला गेली ९ वर्षापासून ऑक्सीजन व नायट्रस गॅसचा विनातक्रार व विनाखंडीत पुरवठा केलेला आहे. तरी आमच्या पुर्वी दिलेल्या सेवेचा विचार करुन आम्ही संस्थानला मंजुर असलेल्या दरानेच (ऑक्सीजन गॅस प्रती क्युबीक रु. १६.२८ व नायट्रस गॅस रु. ०.२१९० प्रती लिटर) पुरवठा करण्यास तयार आहोत, असे कळविले आहे. याबाबत त्यांनी मा. अध्यक्ष साहेब यांची दि. ०९/०५/२०१० रोजी समक्ष भेट घेतलेली असून मा. अध्यक्ष साहेब यांनी मे. बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर व मे. अहमदनगर इंडस्ट्रीयल गॅसेस, अहमदनगर यांना सम प्रमाणात आदेश विभागून देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यास सुचना केलेली आहे.

**निर्णय क्र.५६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक १८.०४.२०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार कार्यवाही करावी त्यात कोणताही बदल करण्यात येऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४३ जाहिरातीचे खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयासाठी सन २०१०-२०११ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे खरेदीकामी अंदाजे रु. २२,८६,८०,२२३/- चे खर्चास व सदरचे खरेदीकामी संस्थानचे विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यास तसेच संस्थानच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेस दि.१०/०१/२०१० चे मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यता मिळाली होती.

त्यानुसार संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत जा.नं.एसएसएस/पीआरओ/१४६८/२०१० दि. २२/०१/२०१० अन्वये जाहिरात देण्यात येवून निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. १५/०२/२०१० पर्यंत ठेवण्यात आलेली होती. परंतु दि. ०२/०२/२०१० रोजीच्या प्रशासनाकडून प्राप्त आदेशाप्रमाणे सदर निविदा प्रक्रीया तुर्तास स्थगित ठेवणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या होत्या. त्यानुसार सदरची निविदा प्रक्रिया स्थगित ठेवण्यात आली होती. दि. ३०/०३/२०१० रोजी पुन्हा सदर निविदाची प्रक्रिया चालु करणेबाबत सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे याकामी पुनःश्च जाहिरात देणेकामी रुग्णालयाचे दि. ३१/०३/२०१० रोजीचे मंजुर टिपणीन्वये जाहिरात यापुर्वी ज्या वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केलेली होती त्याच वर्तमान पत्रांमध्ये ०२ कॉलम x ११ सेंमी. या आकारमानात खालील वर्तमान पत्रात संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत दि. ३१/०३/२०१० चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.५५०५ दि. ०३/०४/२०१० अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर जाहिरातीत निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. २४/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. सदर जाहिरातीकामी अंदाजे रु. २,९७,५७२/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ. नं. | वर्तमानपत्राचे नाव | आवृत्ती | अपेक्षित येणारा खर्च रु. |
|---|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र टाईम्स | मुंबई | ५५,३५२.०० |
| ०२ | इंडीयन एक्सप्रेस | मुंबई | ९३,२८०.०० |
| ०३ | सकाळ | पुणे (टुडे) | ५७,२००.०० |
| ०४ | लोकमत | औरंगाबाद | २९,०४०.०० |
| ०५ | गुजरात समाचार | अहमदाबाद | ३६,३००.०० |
| ०६ | नवभारत | नागपुर | २६,४००.०० |
| | | **एकुण रु.** | **२९७,५७२.००** |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी आलेल्या अंदाजे रु. २,९७,५७२/- चे खर्चास जनसंपर्क विभागाने मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणेबाबत सुचविले आहे.

सदर जाहिरातीकामी झालेल्या खर्चाची बीले अदा केलेली असून सदरचे जाहिरातीकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,९७,५७२/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६४ उपरोक्त खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४४ सेल काऊंटर मशिनचे दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाच्या पॅथॉलॉजी लॅबमध्ये रूग्णांचे रक्त तपासणी करणेकामी इकडील कार्यादेश क्र. १२९०९ दि. ०८/११/२००५ अन्वये मे.एजीडी डायग्नॉस्टिक प्रा.लि.मुंबई या कंपनीचे ERMA PCE-२१० हे सेल काउंटर मशिन एकुण रू.४,००,०००/-इतक्या रकमेत पुर्वीचे जुने मशिन कंपनीस परत देउन नवीन मशिन खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिनचे दुरुस्ती व देखभाल करणेकरीता कंपनीकडे वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले असुन सदर कालावधीत दुरुस्तीकरीता आवश्यक असणाऱ्या कन्झ्युमेबल पार्ट व इतर स्पेअर पार्टस्ची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

दि. ०२/०६/२०१० रोजी मे.ए.जी.डी.बायोमेडीकल्स प्रा.लि.,मुंबई यांचे इंजिनीअर त्यांचे तातडीचे भेटीकरीता आले असता त्यांनी मशिनची तपासणी करुन त्यांचे सर्व्हिस रिपोर्ट क्र.१३९१ दि.

०२/०६/२०१० अन्वये मशीनचा CPU & Wave Board हा पार्ट खराब झाला असुन बदलणेची आवश्यकता असल्याचे सांगीतले आहे. तसेच सदरकामी त्यांनी त्यांचे पत्र क्र. Q-६८२८/B/२०१०-२०११दि. ०५/०६/२०१० अन्वये सर्व करांसहीत एकुण रु.६८,३४४/- (अक्षरी रु. अडुसष्ठ हजार तीनशे चौव्वेचाळीस मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर बोर्डकरीता कंपनी सहा महीन्यांची वॉरंटी देत आहे. सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. सदर मशिनचे स्पेअर पार्ट फक्त मे.ए.जी.डी. बायोमेडीकल्स प्रा.लि., मुंबई यांचेकडेच मिळतात. उपरोक्त सेल काउंटर मशीन विविध रक्त तपासण्यांसाठी नियमीत वापरावे लागत असल्याने तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे.

तरी सेल काउंटर मशिनचा CPU & Wave Board मे. ए. जी. डी. बायोमेडीकल्स प्रा. लि. मुंबई यांचेकडून बदलुण घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ६८,३४४/- चे खर्चास आणि सदर रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६५** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सेल काउंटर मशिनचा CPU & Wave Board मे. ए. जी. डी. बायोमेडीकल्स प्रा. लि. मुंबई यांचेकडून बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ६८,३४४/- चे खर्चास आणि सदर रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४५** **लॅप्रोस्कोपी सेटमधील Telecam Unit दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभागात मे.कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे लॅप्रोस्कोपी व युरोलॉजी इन्स्ट्रुमेंट सेट सन १९९९ साली खरेदी करण्यात आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर लॅप्रोस्कोपी सेट व युरोलॉजी इन्स्ट्रुमेंट सेटची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्ट बदलणेची आवश्यकता असल्यामुळे इन्स्ट्रुमेंट येथे दुरुस्त होउ शकत नसल्यास ते मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी यांचे भारतातील सध्याचे सर्व्हीस डीलर मे. चिमको बायोमेडीकल इंजीनिअरींग कं, मुंबई यांचेकडुन दुरुस्त करुन घेतले जातात. सदर इन्स्ट्रुमेंटचे स्पेअर पार्ट कंपनीचे भारतातील अधिकृत सर्व्हिस डीलर मे. चिमको बायोमेडीकल इंजिनीअरींग कं. मुंबई यांचेकडेच मिळतात.

सध्या उपरोक्त लॅप्रोस्कोपी सेटमधील Telecam Unit नादुरुस्त झाल्यामुळे व येथे दुरुस्त होणे शक्य नसल्यामुळे दुरुस्तीकरीता इकडील पत्र क्र. २२९ दि. ३०/०१/२०१० अन्वये मे. चिमको बायोमेडीकल इंजीनिअरींग कं, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले होते. कंपनीने Telecam Unit ची तपासणी करुन युनीटमधील Camera Head Cable व Bundy Flux हे पार्ट खराब झाल्याचे व बदलणेची आवश्यकता असल्याचे त्यांचे पत्र क्र.६१२८ दि.१५/०२/२०१० अन्वये कळविले आहे. तसेच सदर पार्ट बदलणेसाठी सर्व करांसहीत एकुण रु.७३,६८२/- (अक्षरी रु.त्र्याहात्तर हजार सहाशे ब्याऐंशी मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रकमेची कंपनीने अगाउ मागणी केलेली आहे.उपरोक्त दुरूस्तीसाठी कंपनी सहा महीन्यांची वॉरंटी देत आहे.

तरी मे. चिमको बायोमेडीकल इंजि. कं, मुंबई यांचेकडुन लॅप्रोस्कोपी सेटमधील Telecam Unit दुरुस्त करुन घेणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रु. ७३,६८२/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.५६६** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे. चिमको बायोमेडीकल इंजि. कं, मुंबई यांचेकडुन लॅप्रोस्कोपी सेटमधील Telecam Unit दुरुस्त करुन घेणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रु. ७३,६८२/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४६** **फेको मशिनचे Handpiece (Neosonix) बदलणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे ऑप्थॅल्मीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता सन २००६ मध्ये मे. ॲल्कॉन लॅबोरेटरीज प्रा. ली. मुंबई यांचेकडुन एक फेको इमल्सीफीकेशन मशीन एकुण २३,००,०००/-इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर मशीन ऑप्थॅल्मीक ओ. टी. विभागात नियमित वापरात असुन कंपनीने मशीन करीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १६/०५/२००७ रोजी संपला आहे. सध्या ०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीसाठी एकुण रू ८४,५००/- इतक्या रकमेत CMC करण्यात आलेले आहे. सदर कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्टस कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे. परंतु कन्झ्युमेबल ॲक्सेसरीज उदा. फेको हॅन्डपीस, अल्ट्रासाउंड प्रोब, एरिगेशन/ ॲस्पिरेशन हॅण्डपीस, कटर्स, सर्जिकल इन्स्ट्रुमेंटस, इ. किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे..

सध्या सदर मशीन व्यवस्थित काम देत नसल्याचे ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे पत्र क्र.९०१ दि. २४/०४/२०१० अन्वये कळविले होते. त्यानुसार कंपनी इंजिनिअरने मशीनची तपासणी केली असता त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट नं. PNV/१० दि.१०/०४/२०१० अन्वये मशीनचा Neosonix Handpiece हा पार्ट खराब झाल्यामुळे बदलण्यासाठी सागितले आहे. सदर Neosonix Handpiece वरती दि. ०८/०७/०६ ते १३/०३/१० पर्यत १३१ शस्त्रक्रिया करण्यात आले आहेत असे ऑप्थॅल्मीक ओ. टी विभागाने त्यांचे पत्र क्र.४८५ दि. ३/०५/२०१० अन्वये कळविले आहे. सदर Handpiece तातडीने बदलणे आवश्यक आहे. मे. ॲल्कॉन लॅबोरेटरीज प्रा. ली. मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. ALI/BLR/२००९/१०० दि.०४/०५/२०१० अन्वये नवीन Handpiece करीता रू १,६०,०००/- व जुना Handpiece बायबॅक करून रू. १,३०,०००/- इतक्या रकमेचे खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr. No. | Description | Product Code | Qty. | Rate per Incl. Taxes | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Handpiece, Neosonix Legacy | 8065740968 | 01 | 1,60,000/- | 1,60,000/- |
| 02 | Handpiece, Neosonix Legacy (Exchange) buyback | 8065740968 | 01 | 1,30,000/- | 1,30,000/- |

उपरोक्त पर्यायांपैकी Handpiece नवीन खरेदी करणेस जास्त खर्च येणार असुन नादुरुस्त Handpiece कोणत्याही प्रकारे वापरात येणार नाही. त्यामुळे नादुरुस्त Hadnpiece कंपनीकडे बायबॅक करुन नवीन Handpiece खरेदी करणे योग्य ठरेल असे मत आहे. त्याप्रमाणे जुना Handpiece बायबॅक करून नवीन Handpiece खरेदी करणेस सर्व करांसहीत एकुण रु १,३०,०००/- (अक्षरी रु. एक लाख तीस हजार मात्र) इतका खर्च येणार आहे. सदर रक्कम कंपनीस Handpiece बदलेनंतर अदा करावयाची आहे. सदर फेको मशीनचे स्पेअर पार्ट फक्त मे. ॲल्कॉन लॅबोरेटरीज प्रा. ली. मुंबई यांचेकडेच मिळतात. सदर हॅण्डपीससाठी कंपनी सहा महिन्याची वॉरंटी देत आहे.

तरी मे. ॲल्कॉन लॅबोरेटरीज प्रा. ली. मुंबई यांचेकडुन फेको मशीनचा जुना Handpiece बायबॅक करून नवीन Handpiece खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. १,३०,०००/- चे खर्चास मान्यता असावी

**निर्णय क्र.५६७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे. ॲल्कॉन लॅबोरेटरीज प्रा. ली. मुंबई यांचेकडुन फेको मशीनचा जुना Handpiece बायबॅक करून नवीन Handpiece खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. १,३०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४७ न्युमॅटीक ड्रील मशिनकरीता Jacob's Chuck With Key खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागात हाडांच्या शस्त्रक्रिया करताना वापरण्यासाठी एक न्युमॅटीक ड्रील मशीन मे. सिन्थेस मेडीकल प्रा.लि.,नवी दिल्ली यांचेकडुन खरेदी करण्यात आले आहे. सदर ड्रील मशीनकरीता कंपनीने दिलेला वॉरंटी कालावधी संपला असून सध्या मशीनची दुरूस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागाकडून येथेच केली जाते आहे. परंतु दुरूस्तीसाठी स्पेअरपार्टची आवश्यकता असल्यास मशीन पुरवठाधारक कंपनीकडे पाठवून दुरूस्त करून घेतले जाते.

सध्या सदर ड्रील मशिनचा Jacob's Chuck नादुरुस्त झाल्यामुळे व येथे दुरुस्त होणे शक्य नसल्याने मे. सिन्थेस मेडीकल प्रा. लि., नवी दिल्ली यांचेकडे दुरुस्तीकरीता पाठविणेत आले होते. कंपनीनें सदर Jacob's Chuck दुरुस्त होउ शकत नसल्याने परत पाठविला असुन नवीन Jacob's Chuck with key करीता सर्व करांसहीत एकुण रु. ३६,०००/- (अक्षरी रु. छत्तीस हजार मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. तसेच सदर रकमेपैकी ५०% रक्कम रु. १८,०००/- ची कंपनीने आगाउ मागणी केली आहे. सदर न्युमॅटीक ड्रील मशीनचे स्पेअर पार्ट फक्त मे.सिन्थेस मेडीकल प्रा.लि.,नवी दिल्ली यांचेकडेच मिळतात. ऑर्थो ओ. टी. विभागात एकच न्युमॅटीक ड्रील मशीन असुन नियमीत वापरले जात असल्यामुळे नेहमी अद्यावत ठेवणे गरजेचे असल्याने उपरोक्त Jacob's Chuck with key खरेदी करणेस हरकत नाही असे मत आहे.

तरी मे.सिन्थेस मेडीकल प्रा.लि.,नवी दिल्ली यांचेकडुन न्युमॅटीक ड्रील मशीनकरीता Jacob's Chuck with key खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ३६,०००/- चे खर्चास आणि सदर रकमेपैकी ५०% रक्कम रु. १८,०००/-कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५६८ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे.सिन्थेस मेडीकल प्रा.लि.,नवी दिल्ली यांचेकडुन न्युमॅटीक ड्रील मशीनकरीता Jacob's Chuck with key खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ३६,०००/- चे खर्चास आणि सदर रकमेपैकी ५०% रक्कम रु. १८,०००/-कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं ४८ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पूर्वीचे कॅन्टीनधारक श्री सुनिल त्रिपाठी, सदरगुरु हरिहर महाराज सहकारी संस्था मर्यादित यांचे विनंती अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** दि. ०३/०६/२०१० रोजीच्या पत्राद्वारे सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था अहमदनगर यांनी विनंती केली आहे की, साईबाबा हॉस्पिटलमधील कॅन्टीन आमचे संस्थेद्वारे दि. १८ एप्रिल २००९ ते दि. १८ एप्रिल २०१० या एक वर्षासाठी आम्ही ४६,०००/- प्रतिमाह दराने घेतले होते. २ एप्रिल २०१० पासून ते आजपर्यंत आम्ही आपले सुचनेनुसार रूग्णांची गैरसोय होवु नये म्हणुन आपले विनंतीस मान देवुन कॅन्टीन चालु ठेवलेली आहे व नविन निवीदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत उपहारगृह आम्ही चालु ठेवावे असे आपण कळविलेले आहे. महोदय, १८ एप्रिल २०१० नंतरच्या कालावधीसाठी आपण आम्हास २० ते २५ हजार रूपये प्रति महिना भाडे आकारावे ही विनंती. सर्व वस्तुंचे दर वाढल्यामुळे आम्ही आपणास ४६,०००/- रू भाडे देवु शकत नाही. तरी आमच्या विनंतीचा विचार करावा ही नम्र विनंती. अशा स्वरूपाचा अर्ज कार्यकारी अधिकारी यांचे नावे दिलेला आहे.

श्री सुनिल त्रिपाठी, सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था, अहमदनगर यांना श्री साईबाबा हॉस्पिटलचे कॅन्टीन दि. १८/०४/२००९ ते दि. १७/०४/२०१० या १२ महिन्याच्या कालावधीकरीता भाडेतत्वावर मासिक भाडे रक्कम रू. ४६०००/- प्रतिमाह याप्रमाणे देणेत आले होते. सदरचे कॅन्टीन चालकाची मुदत दि. १७/०४/२०१० पासुन संपुष्ठात आलेली होती. त्यामुळे श्री साईबाबा रूग्णालयात भाडे तत्वावर १२ महिने कालावधीकरीता कॅन्टीन चालविणेस देणेकामी दि. २५/०३/२०१० रोजी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहीरातीस अनुसरून ०२ निविदा प्राप्त झाल्या.

परंतु आलेल्या निविदा नियमानुसार उघडणेकामी कमीतकमी ०३ निविदा तरी आवश्यक असतात. यामुळे नव्याने कॅन्टीन चालकाची नेमणुक करणेकामी फेरनिविदा मागविणेचे ठरले व नव्याने कॅन्टीनचालकाची नेमणुक होईपर्यंत सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था, अहमदनगर कॅन्टीनचालक श्री सुनिल त्रिपाठी यांना त्यांचे पुर्वीचेचे करारनाम्याचे अटीशर्तीचे अनुसरून आहे त्याच मासिक परवाना शुल्क आकारून परवानगी देणेत आलेली आहे.

फेरनिविदा मागविणेकामी दि. ०३/०५/२०१० रोजी लोकमत या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेत आली. जाहीरातीस अनुसरून दि. २२/०५/२०१० रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती समोर सादर केलेल्या श्री साईबाबा रूग्णालयातील कॅन्टीन भाडे तत्वावर चालविण्यास देणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबातच्या विषयावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रूग्णालयामधे येणारे रूग्ण व त्यांचे नातेवाईकांकरीता जेवण, नाष्टा, चहा कॉफी इ. ची व्यवस्था व्हावी याकरीता कॅन्टीन सुरू करणेत आलेले आहे. सदर कॅन्टीनचे भाडेद्वारे नफा कमविणे हा उद्देश नसुन रूग्ण व त्यांचे नातेवाईकांना चांगल्या दर्जाचे जेवणाची व नाष्ट्याची व्यवस्था व्हावी हा हेतु आहे. सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था, अहमदनगर यांचे दर उच्चतम आहे परंतु त्यांना यापुर्वी कॅन्टीन चालविणेस दिले असता त्यांचा अनुभव व दर्जा योग्य नसल्याचे वैद्यकीय संचालक यांनी समक्ष सांगितले. सबब येवले प्रदीप रमेश, शिर्डी यांची द्वितीय निम्नत्तम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.

सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था अहमदनगर यांनी प्रतिमाह रू. २५०००/- भाडे देणेचे मान्य केले होते व श्री येवले प्रदिप रमेश, शिर्डी यांनी रू. १८०००/- प्रतिमाह भाडे देणेचे मान्य केले होते. सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्थान अहमदनगर यांना दि. १७/०६/२०१० पासुन कॅन्टीनचे काम बंद करणेबाबत कळविलेले आहे व श्री प्रदिप रमेश येवले यांना दि. १८/०६/२०१० पासून कॅन्टीन सुरू करणेबाबत कार्यादेश देणेत आलेले आहे.

दि. २२/०६/२०१० रोजी अखेर सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था अहमदनगर श्री सुनिल त्रिपाठी यांचे दि. १८/०४/२००९ ते दि. १७/०४/२०१० या कालावधीतील डिपॉझीट रू. १,१५,०००/- व संस्थानकडील देय रक्कम रू. ३३,४००/- वर्ग करून रू. १४,०००/- देय होतात. परंतु करारानंतरचे माहे मे २०१० व माहे जुन २०१० या वाढीव कालावधीतील त्यांचे पुर्वीचे करारनाम्यातील अटी शर्तीस अनुसरून भाडे रू. ४६,०००/- प्रतिमाह दराने भाडे रू. ९२,०००/- + रू. ५७०८/- लाईट बिल = एकुण ९७७०८ येणे असुन देय रक्कम रू. १४,०००/- वजा जाता रू. ८३७०८/- येणे बाकी आहे.

तरी सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था अहमदनगर या संस्थेकडून दि. १८/०४/२०१० ते आजपर्यंतचे दोन महिन्याचे वाढीव कालावधिमधील भाडे करारनाम्याचे अटीशर्तीचे अनुसरून रू. ४६,०००/- प्रतिमाह भाडे वसुल करावे किंवा त्यांचे विनंती अर्ज नुसार भाडे वसुल करावे या बाबत निर्णय व्हावा.

**निर्णय क्र.५६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था अहमदनगर या संस्थेकडून दि. १८/०४/२०१० ते आजपर्यंतचे दोन महिन्याचे वाढीव कालावधीमधील भाडे श्री येवले प्रदिप रमेश, शिर्डी यांना देऊ केलेल्या भाड्याप्रमाणे रुपये १८,०००/- प्रतिमहा प्रमाणे भाडे वसूल करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४९ श्री व्दारकामाई मंदिरात तसेच इतरत्र स्टेनलेस स्टीलचे Walker Railing करुन घेणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.विश्वस्त, श्री.बाबळे साहेब, श्री.खांबेकर साहेब, डॉ.श्री.गोंदकर साहेब व यांनी मंदिर परीसरामध्ये स्टील रेलींग तयार करुन बसवायचे असल्याने प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. त्यापैकी व्दारकामाई प्रवेशव्दार गेट पासून पाय-यांपर्यंत स्टीलचे वॉकर रेलींग तयार करुन बसवावे असे सुचविले व ऐनवेळी होणा-या गर्दीचे नियोजनाकरीता स्टील वॉकर रेलींग हे एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी नेण्यास सोयीस्कर व बहुउपयोगी असल्याने व इतरत्रही वापरण्यास लागणार असल्याने सदरील रेलींग आपणाकडे उपलब्ध असावेत असे सुचविले आहे.

त्यानुसार वॉकर रेलींग हे बाहेरील बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घेणेकामी खालीलप्रमाणे प्रत्येक एका रेलींगसाठी मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील पाईप,<br>साईज :- ५० mm x १४ Swg | ५५ फुट. | रु. १९०.००<br>(प्रति फुट) | १०,४५०.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील पाईप,<br>साईज :- २५ mm x १४ Swg | १२० फुट. | रु. ११०.००<br>(प्रति फुट) | १३,२००.०० |
| ०३) | बॉटम पाईप,<br>साईज :- ४० mm x १०mm | ७० फुट. | रु. १४९.००<br>(प्रति फुट) | १०,४३०.०० |
| | | | एकुण :-<br>वॅट १२.५% | ३४,०८०.००<br>०४,२६०.०० |
| | | | रक्कम :-<br>+ ४०% मजुरी | ३८,३४०.००<br>१५,३३६.०० |
| | | | एकुण रक्कम :- | ५३,६७६.०० |

उपरोक्तप्रमाणे श्री व्दारकामाई मंदिरात तसेच इतरत्र Stainless Steel चे Walker Railing बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम प्रत्येकी रुपये ५३,६७६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी अशा प्रकारचे ९ रेलींगसाठी रक्कम रुपये ४,८१,०८४/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७० प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री व्दारकामाई मंदिरात तसेच इतरत्र Stainless Steel चे Walker Railing बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन्स मागवून तयार करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम प्रत्येकी रुपये ५३,६७६/- प्रमाणे ९ वॉकरसाठी रु.४,८१,०८४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५० व्दारावती इमारतीमध्ये एक जादा फॅन बसविण्याचे काम करण्यास कंत्राटदाराने नकार दिल्याने फेर निविदा मागविणे बाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती इमारतीमध्ये प्रत्येक रुममध्ये एक सिलिंग फॅन बसवून देण्यात आलेला आहे. मा.उपाध्यक्ष, श्री.कोल्हे साहेब यांचा नविन व्दारावती इमारतीकडे राऊंड झाला असता रुम साईज मोठी असल्याने एका फॅनची हवा पुरेशी मिळत नसल्याने अजून एक फॅन प्रत्येक रुममध्ये बसवून देण्याचे सुचित केल्यानुसार मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०९-०८-२००९ सभेतील विषय क्र.४१ निर्णय क्र.६९७ अन्वये मान्यता घेऊन फॅन बसविणेबाबत विद्युत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. फॅन बसविणेकामी आलेल्या निविदाधारकांची नांवे पुढीलप्रमाणे :-

०१). मे.स्वरांजली इलेक्ट्रिकल्स, नाशिक
०२). मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन, नाशिक
०३). मे.भाग्योदय सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, मनमाड
०४). मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक
०५). मे.श्री साई श्रध्दा इलेक्ट्रिकल्स, नाशिक

उपरोक्तप्रमाणे निविदाधारकांपैकी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक नाशिक यांचे निम्नतम मान्य करण्यात येऊन त्यांना जा.नं.एसएसएस / विद्युत / २६३९ / २०१० दिनांक ०८-०२-२०१० अन्वये व्दारावती इमारतीमध्ये एक जादा फॅन बसविणेकामी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मे.एम.डी.एस. कंपनी, नाशिक यांनी अद्यापपर्यंत कामास सुरुवात केलेली नाही. मे.एम.डी.एस. कंपनी, नाशिक यांनी दिनांक १०-०३-२०१० रोजी शिर्डीत येऊन सिलींग फॅनचा सॅम्पल दाखविला असता तो व्दारावती इमारतीत बसविलेल्या फॅनला मॅच होणारा नसल्याने त्यांना व्दारावती इमारतीत बसविलेल्या फॅनसारखे फॅन आणावे लागतील. त्यावर त्यांनी व्दारावती इमारतीतील

फॅनसारखे फॅन आणणे परवडणारे नसून मला तोटा होईल व हे काम करणे शक्य वाटत नाही, असे वक्तव्य केले. त्यांना काम पूर्ण करण्यासाठी याबाबत स्मरणपत्रे पाठवून वेळोवेळी दूरध्वनीवरुन विचारणा करण्यात आलेली आहे. त्यांना काम करण्यास दिलेली मुदत दिनांक ०७ मे २०१० रोजी संपलेली आहे. मे.एम.डी.एस. कंपनी, नाशिक हे काम करणेस इच्छूक नाहीत असे वाटते.

तरी सदरील काम करण्यासाठी मे.एम.डी.एस. कंपनी, नाशिक यांची अनामत रक्कम जप्त करुन फेर निविदा मागविणेबाबत प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७१** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे व्दारावती इमारतीमध्ये एक जादा फॅन बसविण्याचे काम करण्यास मे.एम.डी.एस. कंपनी, नाशिकयांनी नकार दिल्याने त्यांची अनामत रक्कम जप्त करुन याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१** **व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या इलेक्ट्रीकलच्या वाढीव कामाबाबत**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास इमारतीचे बांधकामाचे काम (विद्युत, पाणीपुरवठा विषयक कामासहित) मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांना बांधकाम विभागामार्फत देण्यात आलेले होते. त्यानुसार मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांनी काम पूर्ण केलेले असून विद्युत विषयक कामाचे अंतिम बील तपासणीकरीता विद्युत विभागाकडे सादर केलेले आहे. त्यानंतर सदरचे बील आर्कीटेक्ट, मे.काबरे चौधरी, नाशिक यांनी चेक करुन बीलावर लेखी स्वाक्षरी केलेली आहे. सदरचे बील मा.आर्कीटेक्ट यांनी बील चेक केले असता टेंडरपेक्षा काही प्रमाणात वाढीव काम झालेले असून त्यासंदर्भात त्यांनी हे जादा काम कशामुळे करावे लागले, त्याचा तपशीलवार अहवाल सादर केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

**अ). तळमजला + तीन मजले :-**

०१). व्दारावती इमारतीच्या मेन प्रवेशव्दारासमोरील हॉलमध्ये व काऊंटर भागामध्ये पियानो टाईप स्विचेस आणि लाकडी बोर्डच्या ऐवजी मॉडयुलर स्विचेस आणि बॉक्सेस बसविण्यात आलेले आहे.

०२). पाणीपुरवठा विभागाने मागणी केल्यामुळे पंप ऑपरेट करण्यासाठी वेगळा पॅनेल तयार करावा लागला.

०३). व्दारावती इमारतीमध्ये एकुण ०४ पॅसेंजर लिफ्ट बसविण्यात आलेल्या असून सदर लिफ्टचे मशिन टेरेसवरील रुममध्ये बसविण्यात आलेले आहे. लिफ्ट कंपनीच्या मागणीनुसार प्रत्येक लिफ्टकरीता तळमजल्यावरील मेन पॅनेल पासून टेरेसवरील मशिनकरीता वेगळी केबल, एम.सी.बी. व मेनस्वीच वापरावे लागले.

०४). मेन प्रवेशव्दार लॉबीमध्ये प्रकाशव्यवस्थेकरीता साध्या फिटींग ऐवजी सस्पेंडेड टाईप डेकोरेटीव्ह फिटींग बसविण्यात आलेल्या आहेत.

०५). व्दारावती इमारतीच्या मेनप्रवेशव्दारावरती असलेल्या व्दारावती भक्तनिवास या बोर्डवर प्रकाशव्यवस्थे करीता ७० वॅटचे मेटल हॅलाईड फिटींग बसविण्यात आलेल्या आहेत.

०६). तळमजला + तीन मजल्याच्या मूळ टेंडरमध्ये बॉक्स टाईप ४० वॅट टयुब फिटींग (वायडींग चोकसह) रुममध्ये तसेच पॅसेजमध्ये बसविण्याचे ठरविलेले होते. परंतू यांचा वीज वापर हा जास्त असल्याने एनर्जी सेव्हींगच्या दृष्टीने सध्या उपलब्ध असलेल्या T५ २८ वॅट टयुबमुळे ५० % वीजेची बचत होत असल्याने सदरच्या फिटींग रुममध्ये तसेच पॅसेजमध्ये वापरण्यात आलेल्या आहेत.

०७). तळमजला + तीन मजल्याच्या मूळ टेंडरमध्ये बाथरुम, टॉयलेट, बेसिनवरील आरसा तसेच रुममधील पॅसेजकरीता ४० वॅटचे बल्ब होते. परंतू एनर्जी सेव्हींगच्या दृष्टीने सध्या T५ १४ वॅट टयुब बसविल्यास ६०% वीजेची बचत होत असल्याने सदरच्या फिटींग बसविण्यात आलेल्या आहेत.

०८). तळमजला + तीन मजल्याच्या मूळ टेंडरमध्ये चारही मजल्याच्या तीन भागामध्ये पॅसेज लाईट पॉईंट बंद चालू करणेकरीता त्या त्या भागातील अॅटेंडटला जवळ म्हणून स्टोअर रुमच्या बाहेरील बाजूस स्वीच बोर्ड दिलेले आहे. त्यामुळे प्रत्येक पॅसेजमधील प्रत्येक लाईट पॉईंटचे अंतर ६ मीटरपेक्षा जास्त आहे. शासनाच्या सन २००९-१० मधील सीएसआर नुसार ६ मीटरपेक्षा जास्त अंतर असल्यास पुढील प्रत्येक मीटरकरीता पॉईंट रेटच्या १० % किंमत देण्याचे सांगितलेले आहे.

०९). तळमजला + तीन मजल्याच्या तीनही भागातील अंडाकृती आकाराच्या पॅसेजमध्ये सौंदर्यात्मक दृष्टया ४ फूटी टयुब ऐवजी डेकोरेटिव्ह टाईप राऊंड फिटींग वापरण्यात आलेल्या आहेत. टयुब फिटींगपेक्षा सदरच्या वापरलेल्या राऊंड फिटींगमुळे ५०% वीजेची बचत होते.

१०). जनरेटर रुममध्ये असलेल्या व्दारावती इमारतीच्या मेन पॅनलचे डिझाईन तळमजला + तीन मजल्याचा विचार करुन बनविलेले होते. परंतू चौथा मजला वाढला आणि वाढलेल्या चौथ्या मजल्यावरील रुम ए.सी.करण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे व्दारावतीच्या मेन पॅनेलवरील लोड वाढला. आणि त्याच कारणामुळे मेन पॅनेलमध्ये बदल करावा लागून जादा क्षमतेचे

मेनस्वीच तसेच चौथ्या मजल्याकरीता मेन स्वीच व त्याकरीता लागणारे मटेरीअल वापरण्यात आले.

११). व्दारावती इमारतीच्या रुममधून भक्त दर्शनाकरीता व इतर कामाकरीता बाहेर गेल्यास रुममधील चालू असलेला लाईटींग व पॉवर सप्लाय बंद करण्याकरीता दरवाज्याच्या बाहेरच्या बाजूस साधा मेनस्वीच बसविण्याचे ठरलेले होते. परंतू सदरच्या मेनस्वीच पेक्षा सध्या उपलब्ध असलेले डबल पोल एम.सी.बी.बसविण्यात आलेले आहे.

१२). पंपरुम पॅनेलपासून हौदामधील पंपापर्यंत ६ स्क्वेअर एम.एम. ऐवजी २.५ स्क्वेअर एम.एम. केबल प्रत्यक्ष वापरण्यात आलेली आहे.

तसेच सदर टेंडरमधील अटीनुसार एखादा आयटेम जर जादा लागणार असेल तर त्याकरीता टेंडरमध्ये असलेल्या क्वॉंटीटी पेक्षा सव्वापट क्वॉंटीटी टेंडरमधील मंजूर दराने व त्यापुढील Excess Quantities शासनमान्य सी.एस.आर.नुसार देण्याचे नमूद केलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

०१). धर्मशाळा जनरेटर रुममधील केबल ट्रेंच वरती तसेच व्दारावती इमारतीच्या तीनही भागातील तळमजल्यावरील पॅनेल रुममधील केबल स्ट्रेंचवरती सुरक्षिततेकरीता तसेच पॅनेल मेन्टेनन्स करणेकरीता चेकर प्लेट ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे टेंडरमधील Iron Work च्या क्वॉंटीटी पेक्षा जादा क्वॉंटीटी लागलेली आहेत.

०२). व्दारावती इमारतीच्या रुममधील पॉवर सप्लाय करीता व लाईटींग सप्लायकरीता वेगवेगळ्या डि.बी.बसविण्यात आलेल्या आहेत. सदरच्या पॉवर डि.बी.मध्ये मेन सप्लायकरीता ६३ ॲम्पीअरच्या RCCB वापरण्यात आलेला आहे. त्यामुळे टेंडरपेक्षा सदरच्या RCCB ची संख्या वाढलेली आहे.

०३). व्दारावती इमारतीच्या तळमजला + तीन मजल्याच्या मूळ टेंडरमध्ये रुममधील लाईटींग सप्लाय, पॉवर सप्लाय तसेच पॅसेजमधील लाईटींग सप्लायकरीता एकच डि.बी.बसविण्याचे ठरलेले होते. परंतू सदरचा सप्लाय सुरक्षिततेच्या दृष्टीने व मेन्टेनन्सच्या दृष्टीने वेगवेगळा असल्याने रुममधील लाईटींग सप्लाय, पॉवर सप्लाय व पॅसेजमधील लाईटींगकरीता वेगवेगळया डि.बी.बसविण्यात आलेल्या असल्याने टेंडरपेक्षा डि.बी.ची संख्या वाढलेली आहे.

०४). व्दारावती इमारतीच्या रुममध्ये तसेच बाथरुममध्ये साध्या पॉवर प्लग तसेच ए.सी.प्लग ऐवजी २० A चे मेटल बॉक्स वापरण्यात आलेले असल्याने टेंडरपेक्षा सदरच्या २० A च्या मेटल बॉक्सची संख्या वाढलेली आहे.

०५). व्दारावती इमारतीच्या रुममध्ये असलेले प्रत्येक स्वीच बोर्डकरीता तसेच पॉवर पॉईंटकरीता मास्टर स्वीचपासून स्वतंत्र २.५ Sq.mm ची मेन वायर वापरण्यात आलेली असल्याने सदरच्या मेन्सची संख्या वाढलेली आहे.

०६). व्दारावती इमारतीच्या पॅसेजमधील लाईटींग जनरेटर रुममधून कंट्रोल करण्याकरीता ३.५ x २५ Sq.mm ची केबल वापरण्यात आलेली आहे. जनरेटर रुम पासून व्दारावती इमारतीच्या तीनही भागामधील पॅसेज पॅनेलकरीता स्वतंत्र केबल टाकलेली असल्याने केबल वाढलेली आहे.

०७). व्दारावती इमारतीच्या रुममधील लाईटींग जनरेटर रुममधून कंट्रोल करण्याकरीता ३.५ x ९५ Sq.mm ची केबल वापरण्यात आलेली आहे. जनरेटर रुम पासून व्दारावती इमारतीच्या तीनही भागामधील तळमजल्यावरील पॅनेलकरीता स्वतंत्र केबल टाकलेली असल्याने केबल वाढलेली आहे.

०८). व्दारावती इमारतीच्या तळमजल्यावरील पॅनेलकरीता तसेच प्रत्येक मजल्यावरील पॅनेलकरीता तसेच जनरेटर रुममधील मेन पॅनेलकरीता कॉपर स्ट्रीप वापरण्यात आलेली आहे. तसेच लाईटींग अरेस्टरकरीता सदरची कॉपर स्ट्रीप वापरण्यात आलेली आहे. व्दारावती इमारतीच्या ४ थ्या मजल्यामुळे वाढलेली उंची तसेच मार्गामध्ये बदल झाल्याने टेंडरमध्ये असलेल्या क्वॉटीटीपेक्षा जादा कॉपर स्ट्रीप लागलेली आहे.

०९). व्दारावती इमारतीमधील असलेल्या चारही पॅसेंजर लिफ्टच्या मशिनकरीता अर्थिंग पॉईंटपासून स्वतंत्र कॉपर वायरची आवश्यकता असल्याचे लिफ्ट कंपनीने कळविल्यानुसार तळमजल्यावरील अर्थिंग पासून टेरेसवरील लिफ्ट मशिनकरीता स्वतंत्र कॉपर वायर वापरण्यात आलेली. लिफ्ट करीता वापरण्यात आलेल्या कॉपर वायरच्या क्वॉंटीटीचा टेंडरमध्ये समावेश नसल्याने सदरची कॉपर वायर जादा लागलेली आहे.

१०). व्दारावती इमारतीच्या रुमकरीता असलेल्या पॉवर डि.बी.ची संख्या वाढल्यामुळे त्या-त्या मजल्यावरील पॉवर पॅनेलपासून डि.बी.पर्यंत आवश्यक असलेली २ x ६ Sq.mm च्या मेन वायरची क्वॉंटीटी वाढलेली आहे.

व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या तळमजला + तीन मजल्याकरीता इलेक्ट्रीकल कामाच्या टेंडरची मंजूर रक्कम रु. ९७,७४,८६९/- इतकी आहे. त्याप्रमाणे टेंडरमधील आयटेम प्रमाणे एकुण काम रु. १,०१,०८,५५१/- इतके झालेले असून Excess Quantities आयटेम रु. ३,३३,६८२/- (रु.

१,०१,०८,५५१/- वजा रु.९७,७४,८६९/- ) इतक्या रकमेचे झालेले आहे. याव्यतिरिक्त एनर्जी सेव्हींग करावयाच्या फिटींगकरीता, सुशोभिकरणाच्या दृष्टीने व चौथ्या मजल्यामुळे मेन पॅनेलमध्ये तसेच यंत्रणेमध्ये काही बदल करावे लागले. तसेच केबलची क्षमता सुद्धा वाढवावी लागली. यामुळे रु.२४,११,२१९/- इतक्या रकमेचा वाढीव खर्च झालेला आहे.

**ब). चौथा मजला :-**

०१). मा.आर्कीटेक्ट यांनी टेंडरमध्ये गरम पाण्याकरीता सोलर सिस्टिमचा समावेश केलेला आहे. परंतू पावसाळयात व थंडीच्या दिवसात सोलर सिस्टिमच्या इलेक्ट्रीकल बॅकअपकरीता केबलचा समावेश तसेच पॅनेलचा समावेश टेंडरमध्ये करण्याचे आर्किटेक्ट यांचेकडून राहून गेले होते. सदरचे काम गरजेचे असल्याने सोलर सिस्टिम इलेक्ट्रीकल बॅकअपकरीता पॅनेल, केबल व इतर मटेरीअलची आवश्यकता होती.

०२). सध्या प्रत्येक ठिकाणचा वीजवापर मापन गरजेचे झाले असून व्दारावती इमारतीमधील प्रत्येक मजल्याकरीता तसेच प्रत्येक भागाकरीता प्रत्यक्ष वीजेचा वापर किती झाला याची टेंडरमध्ये असलेल्या पॅनेलमध्ये सोय नव्हती. एनर्जी ऑडीटच्या दृष्टीने तसेच व्दारावती इमारतीकरीता एकुण वीजेचा वापर किती होतो. याकरीता असलेल्या पॅनलमध्ये एनर्जी मीटर बसविण्यात आलेले आहे. तसेच एनर्जी मीटरकरीता इतर आवश्यक असलेले साहित्य वापरण्यात आलेले आहे. प्रत्येक मजल्यावर असलेली पॅनलवरील Volt Meter तसेच Ammeter चे प्रत्येक फेजवरती असलेले रिडींग पाहणेकरीता तसेच पॅनलमधील MCCB ऑपरेट करणे सोईचे व्हावे याकरीता रोटरी ऑपरेटींग हँडल बनविण्यात आलेले आहे.

०३). रुममधील बाथरुमकरीता टेंडरमध्ये १०० वॅट बल्कहेड फिटींग घेण्यात आलेली होती. परंतू एनर्जी सेव्हींगच्या दृष्टीने १४ वॅट T-५ क्रॉम्प्टॅन मेक फिटींग बाथरुममध्ये तसेच वॉश बेसीन, बाल्कनी आणि रुममधील पॅसेजमध्ये बसविण्याचे ठरले.

०४). मेन इमारतीच्या प्रवेशव्दारासमोरील मेन हॉल तसेच तळमजला + तीन मजल्यावरील अंडाकृती पॅसेजमध्ये डेकोरेटीव्ह राऊंड फिटींग बसविण्यात आलेल्या आहे. चारही मजले सौंदर्यात्मक दृष्टीने एकसारखे तसेच दिसण्याच्या दृष्टीने एकसारखे असावे याकरीता वरील अंडाकृती पॅसेजमध्ये सदरच्या फिटींग बसविण्यात आलेल्या आहे.

०५). धर्मशाळा परीसराच्या मेन गेटजवळ, बगीचामध्ये तसेच व्दारावती इमारतीच्या व कॅन्टीन इमारतीच्या दरम्यान असलेल्या पार्कींगमध्ये रात्रीचे वेळी प्रकाशव्यवस्था कमी असल्याने हायमास्ट पोल उभे करण्याचे ठरले. सदर कामाकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८-०३-२००९ रोजी झालेल्या सभेत मान्यता घेतलेली आहे.

मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांनी सादर केलेल्या चौथ्या मजल्याच्या अंतिम बीलामध्ये रुपये १६,४९,२५९/- इतक्या रकमेचे वाढीव काम झालेले आहे. यामधील हायमास्ट लॅम्पच्या पोलकरीता रुपये ५,०४,१६८/- इतक्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८-०३-२००९ चे सभेत विषय क्र.७४ निर्णय क्र.२४३ अन्वये मान्यता मिळालेली आहे. ही हायमास्टची रक्कम वजा जाता राहिलेल्या रक्कम रुपये ११,४५,०९१/- इतक्या रकमेचे वाढीव काम झालेले आहे.

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त वाढीव कामास व खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७२ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांनी सादर केलेल्या उपरोक्त अ व ब मध्ये नमुद केलेल्या तळमजला + तीन मजल्याच्या तसेच चौथ्या मजल्याच्या अंतिम बीलातील एक्सेस क्वॉन्टिटी, वाढीव जादा कामास व त्यापोटी आलेल्या जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५२ २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणे बाबत**

**प्रस्ताव-** अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत २.५ मेगावॅट पवनचक्की प्रकल्प मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी दिनांक १४ ऑगस्ट २००७ रोजी दुपारी १६.०० वाजता प्रकल्प चालू करून कार्यान्वित केलेला आहे.

प्रकल्प चालू झाल्यानंतर ( दि. १४-०८-२००७ पासून ) माहे ऑगस्ट २००७ ते मार्च २००८ या सुरुवातीच्या ७.५ महिन्याच्या कालावधीत खालीलप्रमाणे वीजउत्पादन झालेले असून त्याबदली मिळालेली रक्कम खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Month | | Kwh reading | less R. Power | Net Kwh | Rate | Amount | less R.P. Charges | Net Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | August | 2007 | 197,200.00 | 600.00 | 196,600.00 | 3.50 | 688,100.00 | 75.00 | 688,025.00 |
| 2 | Septe | 2007 | 334,800.00 | 1,100.00 | 333,700.00 | 3.50 | 1,167,950.00 | 125.00 | 1,167,825.00 |
| 3 | October | 2007 | 293,800.00 | 800.00 | 293,000.00 | 3.50 | 1,025,500.00 | 100.00 | 1,025,400.00 |
| 4 | Nove | 2007 | 219,100.00 | 1,600.00 | 217,500.00 | 3.50 | 761,250.00 | 100.00 | 761,150.00 |
| 5 | Dece | 2007 | 192,800.00 | 2,400.00 | 190,400.00 | 3.50 | 666,400.00 | 50.00 | 666,350.00 |
| 6 | January | 2008 | 214,600.00 | 1,900.00 | 212,700.00 | 3.50 | 744,450.00 | 100.00 | 744,350.00 |
| 7 | February | 2008 | 258,900.00 | 1,600.00 | 257,300.00 | 3.50 | 900,550.00 | 100.00 | 900,450.00 |
| 8 | March | 2008 | 245,400.00 | 2,200.00 | 243,200.00 | 3.50 | 851,200.00 | 150.00 | 851,050.00 |
| Total | | | 1,956,600.00 | 12,200.00 | 1,944,400.00 | | 6,805,400.00 | 800.00 | **6,804,600.00** |

**माहे एप्रिल २००८ ते मार्च २००९ या आर्थिक वर्षात मिळालेली रक्कम खालीलप्रमाणे :-**

| Sr.No. | Month | | Kwh reading | less R.Power | Net Kwh | Rate | Amount | less R.P. Charges | Net Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | April | 2008 | 480,900 | 1,400 | 479,500 | 3.50 | 1,678,250 | 150.00 | 1,678,100 |
| 2 | May | 2008 | 525,700 | 400 | 525,300 | 3.50 | 1,838,550 | 175.00 | 1,838,375 |
| 3 | June | 2008 | 874,400 | 500 | 873,900 | 3.50 | 3,058,650 | 50.00 | 3,058,600 |
| 4 | July | 2008 | 825,400 | 590 | 824,810 | 3.50 | 2,886,835 | 110.00 | 2,886,725 |
| 5 | August | 2008 | 487,400 | 1,100 | 486,300 | 3.65 | 1,774,995 | 100.00 | 1,774,895 |
| 6 | September | 2008 | 432,900 | 1,700 | 431,200 | 3.65 | 1,573,880 | 52.00 | 1,573,828 |
| 7 | October | 2008 | 264,800 | 1,600 | 263,200 | 3.65 | 960,680 | 53.50 | 960,627 |
| 8 | November | 2008 | 284,800 | 1,700 | 283,100 | 3.65 | 1,033,315 | 79.00 | 1,033,236 |
| 9 | December | 2008 | 199,300 | 1,500 | 197,800 | 3.65 | 721,970 | 26.00 | 721,944 |
| 10 | January | 2009 | 212,100 | 2,200 | 209,900 | 3.65 | 766,135 | 78.75 | 766,056 |
| 11 | February | 2009 | 216,600 | 2,000 | 214,600 | 3.65 | 783,290 | 52.00 | 783,238 |
| 12 | March | 2009 | 382,700 | 1,600 | 381,100 | 3.65 | 1,391,015 | 131.00 | 1,390,884 |
| Total | | | 5,187,000 | 16,290 | 5,170,710 | | 18,467,565 | 1,057.25 | **18,466,508** |

**माहे एप्रिल २००९ ते मार्च २०१० या आर्थिक वर्षात मिळालेली रक्कम खालीलप्रमाणे :-**

| Sr.No. | Month | | Kwh reading | less R Power | Net Kwh | Rate | Amount | less R.P. Charges | Net Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | April | 2009 | 561,800 | 700 | 561,100 | 3.65 | 2,048,015 | 131.00 | 2,047,884 |
| 2 | May | 2009 | 567,900 | 1,000 | 566,900 | 3.65 | 2,069,185 | 184.00 | 2,069,001 |
| 3 | June | 2009 | 463,300 | 800 | 462,500 | 3.65 | 1,688,125 | 131.00 | 1,687,994 |
| 4 | July | 2,009 | 1,047,900 | 200 | 1,047,700 | 3.65 | 3,824,105 | 79.00 | 3,824,026 |
| 5 | August | 2,009 | 533,000 | 900 | 532,100 | 3.80 | 2,021,980 | 193.00 | 2,021,787 |
| 6 | September | 2,009 | 306,600 | 1,200 | 305,400 | 3.80 | 1,160,520 | 79.00 | 1,160,441 |
| 7 | October | 2,009 | 355,967 | 1,334 | 354,633 | 3.80 | 1,347,605 | 79.00 | 1,347,526 |
| 8 | November | 2,009 | 162,572 | 1,466 | 161,106 | 3.80 | 612,203 | 78.00 | 612,125 |
| 9 | December | 2,009 | 210,190 | 2,480 | 207,710 | 3.80 | 789,298 | 12.00 | 789,286 |
| 10 | January | 2,010 | 160,773 | 2,215 | 158,558 | 3.80 | 602,520 | 24.48 | 602,496 |
| 11 | February | 2,010 | 213,386 | 1,657 | 211,729 | 3.80 | 804,570 | 18.75 | 804,551 |
| 12 | March | 2,010 | 310,602 | 1,134 | 309,468 | 3.80 | 1,175,978 | 28.25 | 1,175,950 |
| Total | | | 4,893,990 | 15,086 | 4,878,904 | | 18,144,105 | 1,037.48 | **18,143,068** |

एकुण = रु. ६८,०४,६००/- + रु. १,८४,६६,५०८/- + रु. १,८१,४३,०६८/- = रु. ४,३४,१४,१७६/- ( रु. चार कोटी चौतीस लाख चौदा हजार एकशे शहात्तर मात्र )

उपरोक्तप्रमाणे या पवनचक्की प्रकल्पापासून संस्थानला ३१.५ महिन्यात आतापर्यंत रु. ४,३४,१४,१७६/- इतके उत्पन्न प्राप्त झाले असून मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी माहे एप्रिल २०१० ते मार्च २०११ या आर्थिक वर्षात ऑपरेशन - मेन्टेनन्स कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी (कॉंप्रेसिव्ह ए. एम. सी.) रु. २७,३१,७०४.८० इतकी रक्कम कळविली आहे.

मे.सुझलॉन एनर्जी लि.पुणे यांनी टेंडरमध्ये रु.२८,४६,०००.०० इतकी ऑपरेशन - मेन्टेनन्स कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्ची रक्कम नमूद केलेली होती. परंतू मे.सुझलॉन एनर्जी लि.पुणे यांनी आता त्यापेक्षा कमी रक्कम माहे एप्रिल २०१० ते मार्च २०११ अखेर त्यांनी रु. २७,३१,७०४.८० इतकी रक्कम ऑपरेशन - मेन्टेनन्स कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी (कॉंप्रेसिव्ह ए. एम. सी.) कळविली आहे. तरी मे.सुझलॉन एनर्जी लि.पुणे यांना माहे एप्रिल २०१० ते मार्च २०११ या कालावधीकरीता ऑपरेशन - मेन्टेनन्स कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी (कॉंप्रेसिव्ह ए. एम. सी.) रु. २७,३१,७०४.८० ( रु.सत्तावीस लाख एकतीस हजार सातशे चार पैसे ऐंशी मात्र) इतकी रक्कम आदा करावी लागणार आहे. प्रस्तावावर विचार होऊन मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७३ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे.सुझलॉन एनर्जी लि.पुणे यांना माहे एप्रिल २०१० ते मार्च २०११ या कालावधीकरीता ऑपरेशन- मेन्टेनन्स कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी (कॉंप्रेसिव्ह ए. एम. सी.) रु. २७,३१,७०४.८० इतकी रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५३ वाहन पार्किंग शेड, कार वॉशिंग प्लॅन्ट तसेच वाहन विभाग कार्यालयाचे वायरिंग काम करणे बाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकरीता सध्याची असलेली जागा ही साईआश्रम प्रकल्पात येत असल्यामुळे वाहन विभागाची वहाने पार्कींगकरीता शेड, कार वॉशर प्लँट व कार्यालय हे गौरीशेड व गांडुळ शेतीचे जागेत स्थलांतर करण्याचे काम चालू आहे. नविन ठिकाणी होणा-या वाहन पार्कींग शेडकरीता व कार वॉशर प्लँट तसेच कार्यालयाकरीता स्टाफ क्वार्टर पासून नविन अंडरग्राऊंड केबल टाकावी लागणार आहे.

तसेच नव्याने वायरींग काम करुन दयावे लागणार आहे. याठिकाणी कराव्या लागणा-या वायरींग कामाचा व येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | NCSR | Point wiring for light / fan / bell with ISI mark 3 x 1.5 Sq.mm. Copper PVC insulated FR grade wire 1.1KV in rigid PVC conduit heavy guage (HMS)25mm dia.with I.S.I. mark | 50 Nos. | 0,350.00 | 0,17,500.00 |
| 02) | NCSR | Point wiring in PVC trunking (casing-capping) with 1.5 Sq.mm. FR grade copper wire | 25 Nos. | 0,350.00 | 0,08,750.00 |
| 03) | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. | 50 Mtr. | 0,044.10 | 0,02,205.00 |
| 04) | 7-1-15 | Supplying & erecting PVC armoured cable 4 core 10 sq.mm. aluminium conductor | 150 Mtr. | 0,141.75 | 0,21,262.50 |
| 05) | 7-1-22 | Supplying & erecting PVC armoured cable 4 core 25 sq.mm. aluminium conductor | 200 Mtr. | 0,229.95 | 0,45,990.00 |
| 06) | 7-6-5 | Supplying & laying (including excavation) 15cm dia RCC Hume pipe | 150 Mtr. | 0,439.95 | 0,65,992.50 |
| 07) | 9-1-2 | Supplying & erecting Copper earth plate size 30 x 30 x 0.6cms. complete with all materials. | 02 Nos. | 2,525.00 | 0,05,050.00 |
| 08) | 1-9-14 | Point wiring for plug on concealed type light-fan switchboard | 09 Nos. | 0,340.20 | 0,03,061.80 |
| 09) | 5-3-2 | Supplying erecting & making SPMCB 6A to 32A, C-series (for motor / power) in provided distribution board. | 036 Nos. | 0,171.15 | 0,06,161.40 |
| 10) | 5-6-14 | Supplying, fixing and commissioning RCCB+MCB, electro magnetic type capacity of 63A | 03 Nos. | 3,381.00 | 0,10,143.00 |
| 11) | NON CSR | Supplying and erecting tripple pole iron clad / metal clad Stanley make main switch 63A | 04 Nos. | 1,400.00 | 0,05,600.00 |
| 12) | 2-6-3 | Supplying and erecting crompton make high speed ceiling fan of 1200mm sweep. | 10 Nos. | 1,323.00 | 0,13,230.00 |
| 13) | NON CSR | Supplying and erecting mains with 3 x 2.5 Sq.mm. FR stranded / Solid copper PVC insulated wire | 100 Mtr. | 0,060.00 | 0,06,000.00 |
| 14) | 2-1-47 | Supplying and erecting compact fluo.lamps 65 W. | 30 Nos. | 0,640.50 | 0,19,215.00 |
| 15) | NON CSR | Supplying erecting and fixing Bajaj make street light fitting. | 20 Nos. | 6,700.00 | 1,34,000.00 |
| 16) | NON CSR | Providing required size of cement concrete chamber. | 06 Nos. | 1,860.00 | 0,11,160.00 |
| 17) | 9-2-4 | Supplying & erecting Annealed bare copper wire of high purity of different sizes. | 10 Kg. | 0,565.95 | 0,05,659.50 |
| 18) | 5-4-10 | Supplying & erecting triple pole and neutral distribution board. | 03 Nos. | 4,814.25 | 0,14,442.75 |
| | | | | Total. | 3,95,423.45 |
| | | | | + Contigency 5% | 0,19,771.17 |
| | | | | Total Amount :- | 4,15,194.62 |
| | | | | **Round up :-** | **4,15,195.00** |

उपरोक्तप्रमाणे वाहन पार्कींग शेडकरीता, कार वॉशर प्लँट तसेच कार्यालयाकरीता स्टाफ क्वार्टर पासून नविन अंडरग्राऊंड केबल टाकणे तसेच नव्याने वायरींगचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,१५,१९५/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७४ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे वाहन पार्कींग शेडकरीता, कार वॉशर प्लँट तसेच कार्यालयाकरीता स्टाफ क्वार्टर पासून नविन अंडरग्राऊंड केबल टाकणे तसेच नव्याने वायरींगचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,१५,१९५/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५४ इलेक्ट्रीक मोटारींचे रिवायडिंग करणेकरीता खरेदी करावयाच्या मटेरिअलचे वार्षिक दर मंजूर करणे बाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाकडे संस्थान परिसराकरीता पाणी पुरवठा करणेसाठी व विविध इमारतींचे टाक्या हौद भरणेसाठी ठिकठिकाणी इले.मोटारी बसविण्यात आलेल्या आहेत. पाणी पुरवठा विभागांतर्गत अंदाजे १५० मोटारींचे रिवायडींग व मेन्टेनंस करणेचे काम करण्यात येते. तसेच प्रसादालय विभाग, बगीचा विभाग, आय.टी.आय विभाग, हॉस्पिटल विभाग अशा इतर विभागाकडील इले.मोटारींचे रिवायडींग सुध्दा पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे. सदरच्या मोटारींचे रिवायडींग करणेकरीता त्यासाठी आवश्यक मटेरियल खरेदी करण्यात येवून मोटारींचे रिवायडींग करण्यात येते.

प्रत्येक वेळी वेगवेगळया साईजची वाईडिंग वायर असलेली मोटार वायडींग व मेन्टेनंस करण्यासाठी येते. त्यामुळे पुर्ण वर्षाची वार्षिक खरेदी करता येत नाही. विशिष्ट गेजची वायडींग वायर खरेदी केल्यास तसेच तिचा वापर न झाल्यास ती वायर तशीच शिल्लक राहते. तसेच प्रत्येक वेळी मंजुरी घेणे, कोटेशन मागविणे, आलेल्या कोटेशनवर कार्यवाही करणे व नंतर ऑर्डर देणे यामध्ये

बराच कालावधी निघून जातो. प्रसादालय विभागातील व पाणी पुरवठा विभागातील काम बंद ठेवता येत नाही. यामुळे कामात अडथळे निर्माण होतात.

याकरीता मोटारींचे वायडींग करीता आवश्यक असलेले मटेरियल खरेदी करणेसाठी संबंधीत दुकानदारांकडून मटेरियलचे वार्षिक भाव घेवून त्यांना स्टँडिंग ऑर्डर दिल्यास प्रत्येक वेळी मंजुरी घेवून मटेरियल खरेदी करणेसाठी वेळ जाणार नाही व कामात अडथळे येणार नाही. यावर्षी याकरीता येणारा खर्च पाणी पुरवठा विभाग मशिनरी दुरुस्ती देखभाल खर्च सन २०१०-२०११ चे बजेटमध्ये रु.८०,०००/- मधून करता येईल.

मागील वर्षी सन २००९-२०१० करीता मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०८-०३-२००९ चे सभेत विषय नं.४२, निर्णय क्रं.२११ अन्वये मान्यता घेवून रिवायडींग मटेरियल एक वर्षाकरीता पुरविणेसाठी कोटेशन मागविण्यास व निम्नतर कोटेशन धारकास ऑर्डर देवून मटेरियलची खरेदी करण्यात आलेली आहे.

तरी यावर्षी सन २०१०-२०११ करीता इले.मोटारींचे रिवायडींगसाठी लागणारे मटेरियल पुरविणेसाठी एक वर्षासाठी कोटेशन बोलविण्यास व न्युनतम कोटेशन धारकास मटेरियल पुरविणेस वार्षिक ऑर्डर देणेसाठी मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.५७५ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.५५ नवीन शववाहिका खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वाहन क्रं.एमएच-१७/टी-७१३१ शववाहीकचा वापर श्री साईबाबा / श्री.साईनाथ रूग्णालयातील डेडबॉडी घेवुन जाणे, नगर-मनमाडरोड वरील अपघातातील डेडबॉडी घेवुन जाणे, पोलीस स्टेशनचे मागणीनुसार, बेवारस डेडबॉडी घेवुन जाणे करीता होत आहे.

सदर शववाहीका वाहन शिर्डी परिसरात एकच असलेने त्यास नेहमी मागणी असते. राज्य-परराज्यातुन येणारे साईभक्तांचे निधन झालेस त्यांची डेडबॉडी सोडविणे कामी शववाहीका पाठविलेस परत येणेस पाच-सहा दिवसांचा कालावधी लागतो, त्यामुळे श्री साईबाबा / श्री साईनाथ रुग्णालयातील डेडबॉडी सोडविणे करीता वाहन उपलब्ध करुन देता येत नाही, तसेच सध्या वापरात असलेली शववाहीका सन २००६ मध्ये खरेदी करण्यात आलेली असून तीचा आतापर्यंत १,८०,००० कि.मी. वापर झाालेला असून तीचे वरील देखभाल दुरूस्तीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. नवीन शववाहीका खरेदी केल्यास दुरचे प्रवासा करीता वापर करण्यात येईल व परिसरातील डेडबॉडी सोडविणे करीता सध्याची शववाहीका वापरता येईल.

नवीन शववाहीका करीता टाटा कंपनीचे ४०७ मॉडेलची चेसी खरेदी करून नामांकित बॉडीबिल्डर यांचेकडून आपणास आवश्यक अशी शववाहीका बॉडीबाधंणी करून घेता येईल याकामी अंदाजे रू.११,००,०००/- (अक्षरी रक्कम रू. अकरा लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी नवीन शववाहीका खरेदी करणेस व यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७६ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे नवीन शववाहीका करीता टाटा कंपनीचे ४०७ मॉडेलची चेसी खरेदी करून नामांकित बॉडीबिल्डर यांचेकडून आपणास आवश्यक अशी शववाहीका बॉडीबाधंणी करून घेणेस व याकामी येणारे अंदाजे रू.११,००,०००/-चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.५६ भाडोत्री क्रेनचे बीलास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे उत्सव तसेच सुट्टयामध्ये शिर्डीत साईभक्तांचे गर्दीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. नगर-मनमाडरोडवर वाहनांची गर्दी होत असल्याने वाहतूकीस मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत असल्याने वाहतूकीचे नियोजन करणेसाठी अडथळा निर्माण करणारी वाहने उचलण्यासाठी क्रेन पुरविणे कामी ओम गुरूदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव यांचेकडून भाडोत्री क्रेन घेण्यात आलेला आहे व त्यासाठी कोटेशन मधील रू.१,१००/- (प्रति दिन) दर मान्य करण्यात आलेला आहे. दि.०८/०३/२००९ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.२३५ अन्वये माहे जुलै-२००९ पर्यंत भाडोत्री क्रेनचे बिला पोटी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. त्यापुढे माहे मे-२०१० पर्यंत आवश्यकतेनुसार, भाडयाने क्रेन घेण्यात आलेला आहे.

दि.१६/०८/२००८ चे पुरवठा आदेशाची मुदत संपलेनंतर जा.नं. १०७१९, दि.२९/०९/२००९ व जा.नं. १४३४७, दि.२४/११/२००९ चे आदेशाने मुदतवाढ देण्यात आलेली होती.

त्यानुसार, ओम गुरूदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव यांचेकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी तातडीने क्रेन बोलाविण्यात येऊन शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांचे ताब्यात देण्यात आलेला होता.

दि.१२/०४/२०१० चे पत्राने, ओम गुरूदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव यांनी माहे फेब्रुवारी-२०१० पासुन सदर क्रेन करीता प्रति दिन रू.१,१००/- ऐवजी रू.२,०००/- मात्र मिळणे बाबत विनंती केली होती. त्यावर दि.१३/०५/२०१० चे मंजूर टिपणीनुसार, ओम गुरूदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव यांना प्रति दिनी रू.१,५००/- प्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार, ओम गुरूदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव यांचेकडून आवश्यकतेनुसार, भाडयाने लावलेल्या क्रेनसाठी माहे ऑगस्ट-२००९ ते माहे मे -२०१० पर्यंत खालील प्रमाणे रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | महिना | रक्कम (रू.) |
|---|---|---|
| ०१ | ऑगस्ट-२००९ | १३,२००/- |
| ०२ | सप्टेंबर-२००९ | १४,३००/- |
| ०३ | ऑक्टोबर-२००९ | १४,३००/- |
| ०४ | नोव्हेंबर-२००९ | ११,०००/- |
| ०५ | डिसेंबर-२००९ | २४,२००/- |
| ०६ | जानेवारी-२०१० | १८,७००/- |
| ०७ | फेब्रुवारी-२०१० | ३१,२००/- |
| ०८ | मार्च-२०१० | २४,०००/- |
| ०९ | एप्रिल-२०१० | १०,५००/- |
| १० | मे-२०१० | १०,५००/- |
| | एकुण रक्कम | १,७१,९००/- |

दि.२३/०५/२०१० पासुन सदरचा भाडोत्री क्रेन बंद करण्यात आलेला आहे. पोलीसांचे मदतीसाठी संस्थानने खरेदी केलेला लाईट व्हेईकल क्रेन पोलीस निरीक्षक, शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी यांचे ताब्यात देण्यात येत आहे.

तरी माहे ऑगस्ट-२००९ ते माहे मे-२०१० या कालावधीत भाडोत्री क्रेनचे बीलापोटी अदा करण्यात आलेल्या रू.१,७१,९००/- (अक्षरी रक्कम रू. एक लाख ऐकाहत्तर हजार नउशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.५७७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे माहे ऑगस्ट-२००९ ते माहे मे-२०१० या कालावधीत भाडोत्री क्रेनचे बीलापोटी अदा करण्यात आलेल्या रू.१,७१,९००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.५७ संस्थान वाहनांकरीता टायर्स खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर्स खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार/ वापर | सध्याचे टायर एकूण वापर | आवश्यक टायर साईज | कंपनी | टायर नग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एमएच-१७/ एक्स-४ | महिंद्रा स्कॉर्पिओ/ कार्यालयीन | ७०,१२५ कि.मी. | २३५-७०R-१६ टयुबलेस | ब्रिजस्टोन | ०५ |
| २. | एमएच-१७/ व्ही-९९७७ | टोयोटा ईनोव्हा/ कार्यालयीन | ४४,५२८ कि.मी. | २०५-६५R-१५ टयुबलेस | ब्रिजस्टोन | ०५ |
| ३. | एमएच-१७/ टी-७१०१ | टाटा४०७/ रूग्णवाहीका | ४२,२९४ कि.मी. | ७-५०-१६ | आपोलो (अमर डिलक्स) | ०५ |
| ४. | एमएच-१७/ टी-७१०९ | टाटा बस / नगरसुल बस | १,२२,७९८ कि.मी. (तीन वेळेस रिमोल्डींग) | १०-००-२० | आपोलो (सुपर रिब) | ०४ |
| ५. | एमएच-१७/ टी-७११० | टाटा बस / नगरसुल बस | १,२३,६५७ कि.मी. (तीन वेळेस रिमोल्डींग) | १०-००-२० | आपोलो (सुपर रिब) | ०४ |
| ६. | एमएच-१७/ टी-७१११ | महिंद्रा मॅक्स/ मालवाहतुक | ५५,२९४ कि.मी. | ७-००-R१५ | जे.के. | ०४ |
| ७. | एमएच-१७/ टी-७११२ | महिंद्रा मॅक्स/ मालवाहतुक | ३८,११४ कि.मी. | ७-००-R१५ | जे.के. | ०४ |
| | | | | | **एकुण टायर्स-** | **३१** |

वरील प्रमाणे सात वाहनांकरीता ३१ टायर्स, टयुब, फ्लॅपसह खरेदी कामी रू.२,९०,०००/- (अक्षरी रक्कम रू.दोन लाख नव्वद हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

महिंद्रा स्कॉर्पिओ व टोयोटा ईनोव्हा या वाहनांकरीता ब्रिजस्टोन कंपनीचे, टाटा ४०७ व बसेस करीता अपोलो कंपनीचे तसेच महिंद्रा मॅक्स कंपनीचे वाहनांकरीता जे.के. कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन टायर्स खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे ३१ टायर्स, टयुब, फ्लॅपसह खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रू.२,९०,०००/- (अक्षरी रक्कम रू.दोन लाख नव्वद हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७८ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे महिंद्रा स्कॉर्पिओ व टोयोटा ईनोव्हा या वाहनांकरीता ब्रिजस्टोन कंपनीचे, टाटा ४०७ व बसेस करीता अपोलो कंपनीचे तसेच महिंद्रा मॅक्स कंपनीचे वाहनांकरीता जे.के. कंपनीचे असे एकूण ३१ टायर्स, टयुब, फ्लॅपसह अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.२,९०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.५८ व्दारावती (धर्मशाळा) बागेत वातावरण निर्मितीसाठी गार्डन स्पिकर बसविणे बाबत**

**प्रस्ताव-** धर्मशाळा येथे सुमारे ८०० फुट पुर्व-पश्चिम व ३००फुट उत्तर-दक्षीण या जागेत बाग तयार केली आहे. बाग सायंकाळी ५ ते रात्रौ १० वाजेपर्यंत सर्वांकरीता खुली असते.त्यामुळे द्वारावती इमारतीत निवासाकरीता उतरलेल्या साईभक्तांची,ग्रामस्थांची तसेच तेथून जवळच असलेल्या रूग्णालयातील रूग्णांचे नातेवाईक यांची कारंजा,बाग बघण्यासाठी व लहान मुलांना खेळविण्यासाठी मोठी गर्दी असते.सदर बागेत गार्डन स्पिकर बसवुन स्पिकरवरून दररोज सायंकाळी५ ते रात्रौ १० वाजेपर्यंत प्रसीध्द गायकांची भक्तीगीते,भावगीते,बालगीते तसेच नाटयगीतांच्या सीडी/कॅसेट व यंत्रणेद्वारे मंजूळ आवाजात प्रसारीत करण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे बागेत प्रसन्न वातावरणाची निर्मीती होवून आलेल्या भक्तांचे व ग्रामस्थांचे मनोरंजन होइल व साई संस्थानच्या नाव लौकीकात भर पडेल .

यासाठी पुर्वी प्रायोगीक तत्वावर बागेच्या पश्चिम बाजुने सुमारे २००X३०० फुट इतक्या जागेत आहुजा कंपनीचे ०८ नग गार्डन स्पिकर बसवुन चालु केली आहे. आता उर्वरीत बागेत गार्डन स्पिकर बसविलेस एकाच वेळेस संपुर्ण विशाल बागेत आलेल्या सर्वांना गीते ऐकण्याचा आनंद होईल.

यासाठी उर्वरीत बागेत गार्डन स्पिकर बसविणेसाठी खालीलप्रमाणे मटेरीयल आवश्यक आहे.

| अ.नं. | मटेरीयल तपशील | कंपनी | नग | प्रत्येकी दर | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | गार्डन स्पिकर मॉ.नं.**GS6401T** | आहुजा | २५ | ४,५००/- | १,१२,५००/- |
| ०२ | गार्डन स्पिकरमधील लुज स्पिकर | आहुजा | ३० | ५०/- | १५००/- |
| ०३ | १.५ स्क्वे.एम.एम कॉपर अर्माड केबल | पॉलीकॅब/ अल्ट्रा | ५००मीटर | ६०/-प्र.मि. | ३०,०००/- |
| | | | | **एकुण -** | **१,४४,०००/-** |

तरी कृपया वरीलप्रमाणे २५ नग स्पिकर व केबल खरेदि विभागामार्फत कोटेशन मागवून खरेदिस सुमारे १,४४,०००/- चे पुर्णांकीत १,५०,०००/-(अक्षरी रूपये एक लाख पन्नास हजार) चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.५७९ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे व्दारावती (धर्मशाळा) बागेत वातावरण निर्मितीसाठी गार्डन स्पिकर २५ नग व केबल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- ध्वनीक्षेपन विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.५९ भक्तनिवासस्थान येथील कारंजा दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** न.भक्त निवासस्थान येथे उतरलेल्या साई भक्तांच्या मनोरंजनासाठी दि.०९/०६/२००० रोजी संस्थानने ५,६८,०००/-रू.खर्च करून कलकत्ता येथिल प्रीमीयर फाउंटन या कंपनीचा म्युझीकल कारंजा खरेदि केलेला आहे.

कारंजा खरेदीझाल्यापासून दररोज सुमारे ०५तास कारंजा कार्यान्वीत असतो,संस्थान मार्फत आवश्यक तेव्हा कंपनीचे किरकोळ स्पेअर पार्ट बोलावून ध्वनिक्षेपण विभागामार्फत मेन्टनन्स करून कारंजा कार्यान्वीत ठेवलेला आहे. परंतू अलिकडे म्युझीकच्या तालाप्रमाणे कारंजा हौदातील पाणी नोझल मार्फत उडण्याची गती मंदावली आहे. सबब पुर्वीप्रमाणे कारंजा पुर्ण क्षमतेने चालत नाही, याकरीता दहा वर्षानंतर एकदा कंपनीतर्फे जनरल मेन्टनन्स करून घेणे योग्य होईल.

याकरीता कंपनीच्या प्रतिनीधींमार्फत दि.१०/०४/२०१०रोजी पहाणी करून कारंजा दुरूस्तीसाठी आवश्यक पार्टचे कोटेशन कलकत्ता येथुन कंपनीतर्फे पाठविले आहे.

| अ.नं. | मटेरीयल वर्णन | नग | प्रत्येकी दर | एकुण दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | १ १/२ सॉलोनाइड व्हॉल्व्ह कंप्लीट मटेरीयल वीथ ओ रिंग | ०६ | १५,४००/- | ९२,४००/- |
| ०२ | सॉलोनाइड व्हॉल्व्हसाठी कॉइल | ०६ | ३,३००/- | १९,८००/- |
| ०३ | ३mm बॉल जॉइंट नोझल्स | २५ | ४६५/- | ११,६२५/- |
| ०४ | एफएफसी कंट्रोलर | ०१ | ६०,०००/- | ६०,०००/- |
| | | | **एकुण -** | **१,८३,८२५/-** |
| | | | +टॅक्स १२.५% | २२,९७८/- |
| | | | **एकुण -** | **२,०६,८०३/-** |

म्युझीकल कारंजा व त्याचे मटेरीयल निर्माते व विक्रते प्रिमीयर फाउंटन हे एकमेव असल्याने त्यांनी दिलेल्या कोटेशनप्रमाणे रू.२,०६,८०३/-(अक्षरी रूपये दोन लाख सहा हजार आठशे तीन) इतका खर्च येत आहे. सदर मटेरीयल कंपनीतर्फे खरेदी व फिटींग करून कारंजा पुर्ववत चालु करवून घेता येईल. तरी कृपया मटेरीयल खरेदी व फिटींगकामी येणा-या खर्चास मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.५८० यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवासस्थान येथील कारंजा दुरुस्त करुन चालू करण्यापेक्षा या ठिकाणी नवीन कारंजा बसविता येईल किंवा कसे याबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी पहाणी करावी असे ठरले.** (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.६० व्दारावती इमारतीतील टी.व्हीं. करीता टाटा स्काय कनेक्शन घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती इमारतीतील व्हीआयपी रूममध्ये उतरलेल्या साईभक्तांना टीव्हीवर बातम्या व इतर चॅनल पहाता यावे यासाठी दि.०६/०३/२०१० रोजी झालेल्या मा.व्य.समितीच्या सभेत २६ इंची एल.सी.डी. टीव्ही ८० नग खरेदिस मान्यता मिळालेली आहे.

वरील टिव्हींना टाटा स्कायचे कनेक्शन घेन्यासाठी टाटा स्काय डीश कंपणीचे ऑथराइज्ड डीस्ट्रीब्युटर अमर टेक्नोक्राफ्ट श्री अमरजीत सींह यांचे कडुन खालीलप्रमाणे कोटेशन आलेले आहे.

१. सुमारे १५ डीश, MDU कनेक्शन बॉक्स १० नग, STU बॉक्स ८० नग व रीमोट ८० नग तसेच डीश ते प्रत्येक टीव्हीपर्यंत RG६ केबल फिटींगसाठी १६००/-रू.प्रति कनेक्शन भरावे लागतील.

२. सुपरहीट या नावाचे सर्वात कमी फी असलेले पॅकेज घेतल्यास ६० चॅनलसाठी दर कनेक्शनला दर महिण्यासाठी १६०/-रूपये प्रमाणे फि भरावी लागेल.

३. प्रत्यक्ष पैसे भरणार त्यावेळेस कंपनीतर्फे दोन अथवा तीन महिणे फ्री कनेक्शन देण्याची योजना उपलब्ध असेल त्याप्रमाणे योजना आपणास लागु होइल.

यापुर्वी अतिथी गृहाच्या रुमसाठी याच डीस्ट्रीब्युटर कडुन टाटा स्काय डिशचे कनेक्शन घेतले असुन ते व्यवस्थीत बिना तक्रार चालु आहे.आता व्दारावतीच्या ८० रुम कनेक्शनसाठी पुढील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | मटेरियल वणर्न व फी | दर | एकुन |
|---|---|---|---|
| १ | अ.न. १प्रमाणे यंत्रणा व मटेरियल | १६०० X ८० | १,२८०००/- |
| २ | अ.नं.०२ प्रमाणे एक वर्षाची फी | दर टिव्ही<br>१ ६० X ८० = १२८००/- एका महिन्याची फि<br>१२८०० X १२ =१,५३,६००/- एका वर्षाची फि | १,५३,६००/- |
| | | एकुण = | २,८१,६००/ - |

वरील प्रमाणे श्री अमर टेक्नो क्राफ्ट अ.नगर यांचेकडे रु. २,८१,६००/- भरावे लागणार आहेत. डिशचे कनेक्शन प्रत्यक्ष ज्या तारखेपासुन व महिण्यापासुन चालु होइल तेथुन १वर्षासाठी राहील, १२ महिण्याची फी कमी अथवा जास्त होईल त्याप्रमाणे दरवर्षी भरावी लागणार आहे.

तरी कृपया वरील प्रमाणे सदरच्या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या रू.२,८१,६००/- (अक्षरी रूपये दोन लाख एक्याऐंशी हजार सहाशे) खर्चास मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.५८१ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे व्दारावती इमारतीतील टी.व्हीं करीता टाटा स्काय कनेक्शन घेणेस व याकामी येणारे रक्कम रुपये २,८१,६००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.६१ श्रींचे जुना लाकडी सागवानी रथाचा लिलाव करुन विक्री करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे प्रमुख तीन उत्सव व इतर स्थानिक उत्सावामध्ये श्रींचे रथाची गावातून मिरवणूक काढण्यात येते, त्यावेळी रथामध्ये श्रींचा फोटो व पादुका दर्शनासाठी ठेवण्यात येतात. सध्या संस्थानकडे दोन सागवानी लाकडी रथ आहेत पैकी साईभक्त श्री रमेश जी. संहेटा, मुंबई यांनी दि.१७/०६/२००४ रोजी रुपये ५१,०००/- किमंतीचा लाकडी सागवानी रथ स्वखर्चाने श्रींना देणगीदाखल अर्पण केलेला आहे. सदरचा लाकडी रथ मिरवणूकीसाठी वापरण्यात येतो.

याच नविन रथात नुकतीच साईभक्त श्री. जी.एस.मोहमद रफिक, प्रेसिडेंट जिल्हा पंचायत मु.पो.वेल्लारी यांनी देणगीदाखल चांदी बसवून दिलेली आहे. तसेच याच नविन रथाचे चांदीकामावर साईभक्त श्री बी.विजयकुमार, हैद्राबाद हे सोन्याचा मुलामा देणगी दाखल बसवून देत आहेत त्यास मान्यता मिळालेली असून लवकरच हे काम सुरु होणार आहे.

साईभक्त श्री सितारात धानु, मुंबई यांनी दि.२०/०८/१९८९ रोजी रुपये ६१,०००/- किमंतीचा लाकडी सागवानी रथ स्वखर्चाने तयार करुन श्रींना देणगीदाखल अर्पण केलेला आहे. सध्या हा रथ मिरवणूकीत वापरत नाही. सदर रथाची FUR / TO१५ अन्वये रजिष्टरमध्ये नोंद करण्यात आलेली आहे. सदरचा रथ बरेच दिवसापासून मिरवणूकीसाठी वापरात आणला जात नाही. तरी या जुन्या सागवानी लाकडी रथाची श्रींचे गुरुपौर्णिमा २०१० उत्सवाचे मुहूर्तावर लिलावाने विक्री करण्यात यावी असे नम्र मत आहे. रथाचे लिलावाची किंमत लाखाच्या पुढे जाईल असे वाटते. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीं चे जुन्या लाकडी सागवानी रथाचा संस्थान मार्फत श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२०१० मध्ये लिलाव करण्यात येणार असलेबाबत देशातील साईमंदीरांना इ-मेल द्वारे कळविण्यात यावे, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक मंदीर)

---

**विषय नं.६२ समाधी मंदिरातील सोने कामाबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त श्री बी. विजयकुमार, हैद्राबाद यांनी साईबाबा संस्थानत मोठ्याप्रमाणात देणगी दिलेली आहे. तसेच त्यांनी सोन्याच्या पादुका व समाधी मंदिर कळस व चार गोपूराना सोन्याचा मुतमा दिलेला आहे. तसेच श्रींचे समाधी चौथ-याच्या खालील भिंतीच्या तिन्ही बाजूत सोन्याचा मुलामा देणगी दाखल दिलेला आहे.

समाधी मंदिरामध्ये सध्या असलेले चांदीचे खांबाना व श्रींचे मुर्तीचे वरती १ ल्या माळयावरील असलेल्या लोखंडी ग्रीलला व पाठीमागील भिंतीचे वरील बाजूला असलेले लोखंडी ग्रीलला सोन्याचा लेप (वज्रलेप) देणगीदाखल करवून देणेबाबत साईभक्त श्री. बी. विजयकुमार, हैद्राबाद यांनी दि.२२.०१.२०१० रोजीचे पत्रान्वये इच्छा प्रदर्शित केलेली आहे. सदरचे सुवर्ण काम करणेसाठी त्यांनी संस्थान समितीकडे परवानगी मागीतलेली आहे. यासाठी लागणारे सोने व मजुरीसह येणार खर्च श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद स्वतः करणार असून देणगीदाखल देणार आहेत. चादींचे दोन खांब, पहिल्या माळ्यावरील (समाधी वरील) ग्रील पुढील व मागील ग्रील यांना सोन्याचा मुलामा दिल्याने प्रत्येक उत्सवात रंगकाम करण्याची आवश्यकता राहणार नाही व ते सोन्याचे आहे असे दिसेल. शिवाय गंजणार नाही तसेच चकाकी कायम राहील. करीता सदरचे काम करवून घेणेस हरकत नाही असे नम्र मत आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८३ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे समाधी मंदीरामध्ये सध्या असलेल्या चांदीच्या खाबांना व श्रींचे मुर्तीचे वर पहिल्या माळयावर असलेल्या लोखंडी ग्रील तसेच पाठीमागे भिंतीचे वरील बाजूस असलेल्या लोखंडी ग्रीलला सोन्याचा लेप (वज्रलेप) साईभक्त श्री.बी.विजयकुमार,हैद्राबाद यांचेकडून करुन घेण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षकमंदीर विभाग)

---

**विषय नं.६३ अतिथींचे सत्कारप्रसंगी भेट देण्यात येणाऱ्या मार्बल मुर्त्या खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देशातुन तसेच विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ति येतात. दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढत आहेत. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष सो, उपाध्यक्ष सो, विश्वस्त अथवा कार्यकारी अधिकारी सो यांचे सुचनेनुसार शॉल, श्रीफळ व प्रसंगी मार्बलमूर्ती देण्यात येते.

माहे एप्रील-२००९ ते मार्च-२०१० यावर्षासाठी अतिथींचे सत्कारकामी साई चैतन्य स्टोअर्स ॲन्ड कलर लॅब, शिरडी यांना मार्बलमुर्ती पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्यांचेकडून माहे मार्च २०१० अखेर एकूण-३ नं मूर्ती ०३ नग, ४ नं मूर्ती ७४ नग, व एकुण ५ नं मूर्ती ४९ नग अशा एकूण १२६ नग पावडर मार्बलमुर्त्या खरेदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच इतर अतिमहत्वाच्या मान्यवरांसाठी ओरीजनल मार्बल मुर्त्या १० नग अशा एकूण १३६ नग मुर्त्या खर्ची पडलेल्या आहेत. त्या वेळोवेळी वरिष्ठांच्या सूचनेनुसार मान्यवरांना सप्रेमभेट म्हणून देण्यात आलेल्या आहेत. त्याकामी एकूण रुपये १,१०,६४०/- (अक्षरी रुपये एक लाख दहा हजार सहाशे चाळीस रुपये मात्र ) इतका खर्च झालेला आहे.

तरी पुढील आर्थिक वर्ष सन-२०१०-११ यासाठी अंदाजे रुपये १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र ) खर्च अपेक्षित आहे. करीता स्थानिक पावडर मार्बलमुर्ती पुरवठा धारकांकडून बंद निवीदा (कोटेशन दरपत्रके) मागविण्यात आले आहेत.

पावडर मार्बल मुर्ती पुरवठा धारकांकडून प्राप्त झालेल्या कोटेशन्सची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं | पुरवठा धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | सुरेशकुमार जैन ॲन्ड कंपनी, शिरडी |
| ०२ | साई चैतन्य स्टोअर्स ॲन्ड कलर लॅब, शिरडी |
| ०३ | दिपक ट्रेडर्स, (द्वारकामाई रोड), शिरडी |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्रं | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | ३ नं. मार्बल मुर्ती पावडर | ४ नं. मार्बल मुर्ती पावडर | ५ नं. मार्बल मुर्ती पावडर |
|---|---|---|---|---|
| ०१ | सुरेशकुमार जैन ॲन्ड कंपनी, शिरडी | १२५/- | २०८/- | ६२४/- |
| ०२ | साई चैतन्य स्टोअर्स ॲन्ड कलर लॅब, शिरडी | ११०/- | १७०/- | ५५०/- |
| ०३ | दिपक ट्रेडर्स, (द्वारकामाई रोड), शिरडी | १२५/- | १९०/- | ६००/- |

**निर्णय क्र.५८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कोटेशन्सची पडताळणी करुन आतिथींचे सत्कारप्रसंगी भेट देण्यात येणाऱ्या मार्बल मुर्त्या खरेदी करणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

**याचवेळी एप्रील-२००९ ते मार्च-२०१० या कालावधीत खरेदी करण्यात आलेल्या मार्बल मुर्त्या ज्या अतिथींना भेट म्हणून देण्यात आल्या त्याची माहिती पूढील सभेपूढे सादर करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.६४ समाधी मंदिरातील समाधीचे भोवती व पादुकांचे भोवतीने लावलेल्या सोन्याच्या पत्र्याचा कव्हर संपूर्णपणे काढून घेणेबाबत**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरात श्रींचे समाधी भोवती व पादुकांचे भोवतीने असलेल्या कठाड्यावर यापुर्वी चांदीची पट्टी देणगी दाखल स्वरुपात बसविण्यात आली आहे. मंदिरात ज्यावेळी सोनेकाम करण्यात आले त्यावेळी या चांदीच्या पट्टी वरती स्वतंत्ररित्या सोन्याचा नक्षीदार पातळ पत्रा बसविण्यात आलेला आहे. हा सोन्याचा पत्राही देणगी दाखल बसविण्यात आलेली आहे.

परंतू हा सोन्याचा पत्रा त्यावेळी घाईघाईने बसविण्यात आल्याने तो व्यवस्थीतरित्या बसविलेला नाही व या सोन्याच्या पत्र्याचा गेज कमी असल्याने, तो सहजासहजी कापतो, चिरतो व मजबूत फिटींग नसल्याने कोपरेबाहेर आल्याचे दिसते. त्यावर कापडी टेप लावून सध्या बंद करण्यात आलेले आहेत परंतू समाधी स्नानाचे वेळी कापडी टेप ओला होवून निघून जातो. समाधी मंदिरात भाविकांची सतत गर्दी असते. तसेच समाधी भोवती फक्त गर्दीचे कालावधीतच काचेचे पार्टेशन लावणेत येते. इतर वेळी भाविक समाधीवर डोके ठेवून दर्शन घेतात. सदरचा सोन्याचा पत्रा हा कमकुवत असल्याने त्याठिकाणाहून कोणालाही काढणे फारसे कठीण नाही. कारण असे निर्दशनास आले आहे की, काही भक्त श्रींचे समाधीचे दर्शन घेतांना समाधीवरील वस्त्राचे खालून हात घालून समाधीला स्पर्श करतात. त्यावेळी त्यांचे हाताला हा सोन्याचा पत्रा लागतो. परिणामी हार अथवा फुलांच्या दो-या मध्ये अडकूनही हा सोन्याचा पत्रा फाटून तुकडा बाहेर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच बाबांच्या समाधीचा सोन्याचा पत्रा प्रसाद म्हणून कोणीही काढून घेवून जाऊ शकतो, त्यामुळे पत्रा चोरीला जाण्याची शक्यता आहे.

तरी समाधी भोवती असलेला व पादुकांचे कठाड्याभोवती असलेला सोन्याचा कव्हर संपूर्णपणे काढून घेण्यात यावा असे नम्र मत आहे. त्याखाली चांदीची नक्षीकाम केलेली चांदीची पट्टी बसविण्यात आलेली आहे, ती कायम स्वरुपी ठेवण्यात येईल. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.५८५ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे समाधी भोवती असलेला व पादुकांचे कठाड्याभोवती असलेला सोन्याचा कव्हर संपूर्णपणे काढून घेण्यात येऊन, त्याखाली चांदीची नक्षीकाम केलेली चांदीची पट्टी बसविण्यात आलेली आहे, ती कायम स्वरुपी ठेवण्यात यावी, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

---

**विषय नं.६५ श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षिततेसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या अत्याधुनिक साहित्याची तपासणी करणेसाठी कन्सलटंटची नेमणूक करणे बाबत.**

**प्रस्ताव-** दि.२२.०९.२००७ रोजीचे मा.व्य.मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.७७२ अन्वये श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षिततेकरीता सुरक्षा साहित्य खरेदी करणेसाठी कन्सल्टंट म्हणून मे. ट्रायकलर कन्सल्टंन्स मुंबई यांची नियुक्ती करण्यात येऊन डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणेसाठी त्यांना प्रोफेशनल फि म्हणून रु.३,५०,०००/- मात्र व त्यावरील सर्व्हिस टॅक्स,एज्युकेशन सेस तसेच प्रत्यक्ष प्रवास, राहणे, जेवण,इत्यादीचा खर्च देणेबाबत मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार त्यांनी प्रथम टप्यातील सविस्तर अहवाल तयार करुन, निविदा प्रक्रीयेनुसार मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन या निविदाधारकास सुरक्षा साहित्य पुरवठा करणेसाठीची वर्क ऑर्डर तयार करणे या पर्यंतची कामे पुर्ण केलेली आहेत.

दि.०६.०३.२०१० रोजी झालेल्या मा.व्य.मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.२८३ अन्वये मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.नोईडा या निविदाधारकाची सुरक्षा साहित्य पुरविणेकामी निवड झालेली असुन त्यांना सुरक्षा साहित्य रु.४,०२,२५,२०३.४३ रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यातआलेला आहे.

सदरील पुरवठा आदेशामध्ये उभारणी,तपासणी तसेच सुरक्षा साहित्याची दोन वर्षाची वॉरंटी, देखभाल त्याचबरोबर कर्मचाऱ्यांना प्रशक्षिण देणे इत्यादी बाबी पुरवठादाराकडे सोपविण्यात आलेल्या आहेत. मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन, प्रा.लि.नोईडा यांचेकडून खरेदी करण्यात येणारे सुरक्षा साहित्यांचा दर्जा, कार्यक्षमता, इत्यादी बाबी पुरवठा आदेशा प्रमाणे आहेत किंवा नाही हे तपासून घेणे अत्यावश्यक असल्यामुळे त्यासाठी कन्सल्टंट नेमणे गरजेचे आहे.

सदरचे सुरक्षा साहित्य खरेदी करणेकामी प्राथमिक कारणासाठी याआधी मे.ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि.मुंबई, यांनी केलेल्या कामाचा अनुभव चांगला असुन सदरील काम त्यांनी व्यस्थितरित्या पार पाडलेले आहे.

त्यापुढे दि.१५ एप्रिल २०१० चे पत्रान्वये मे.ट्रायकलर कन्सल्टंट यांनी या कामाची १) स्टेज नं.०२:- मशिनरी उभारणी अंमलबजावणी २) स्टेज नं.०३:- प्रशिक्षण ३) स्टेज नं.०४:- संरक्षण परिक्षण इत्यादी कामांसाठी रु.२८ लाख ७५ हजार मात्र तसेच त्यावरील सर्व्हिस टॅक्स व एज्युकेशन सेस वेगळा त्याचबरोबर कार्यकाळातील प्रवास, निवास, जेवन इत्यादीसाठी वेळोवेळी येणारा खर्च वेगळा द्यावा लागेल असे कळविले आहे.

तथापी सुरक्षा साहित्याची उभारणी,दोन वर्षाची वॉरंटी,देखभाल तसेच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे या जबाबदाऱ्या मे.व्हेन्टेंज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.नोईडा या निविदाधारका कडेच पुरवठा आदेशानुसार सोपविल्या असल्याने आता फक्त खरेदी करण्यात येणाऱ्या सुरक्षा साहित्यांचा दर्जा,त्याची कार्यक्षमता, इत्यादी बाबी पुरवठा आदेशानुसार आहेत किंवा नाही हे तपासून घेणे अत्यावश्यक आहे त्यामुळे पुरवठा होणाऱ्या सुरक्षा साहित्याचा दर्जा तपासून घेण्यासाठी फक्त कन्सल्टंटची नेमणुक करावी लागणार आहे.

श्रींचे मंदिर व परिसराचे सुरक्षिततेसाठी खरेदी करावयाच्या अत्याधुनिक साहित्यांचे खरेदी प्रक्रियेमधील प्राथमिक काम मे.ट्रायकलर कन्सल्टंटयांनी केले असल्याने त्यांना आजचे सभेपुढे हजर राहणे बाबत सुचित केलेले आहे.

तरी मे.ट्रायकलर कन्सल्टंट यांचेशी समक्ष चर्चा करुन पुरवठा होणाऱ्या सुरक्षा साहित्यांचा दर्जा तपासणेसाठी त्यांची कन्सल्टंट म्हणून नियुक्ती करणेबाबत निर्णय होणेस मान्यता असावी.

आजचे सभेत मे.ट्रायकलर कन्सल्टंट यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांचेशी समक्ष चर्चा/ वाटाघाटी केली असता त्यांनी सदरहू काम रुपये १० लाख या एकत्रित रकमेत करुन देणेचे मान्य केले.

**निर्णय क्र.५८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षिततेसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या अत्याधुनिक साहित्याची तपासणी करणेसाठी रुपये १० लाख अधिक नियमाप्रमाणे सर्व्हिस टॅक्स, एज्युकेशन सेस इ. रकमेत कन्सलटंट म्हणून मे.ट्रायकलर कन्सल्टंट, मुंबई यांची पाच वर्षाकरीता नेमणूक करण्यात यावी. उपरोक्तकामी त्यांचे प्रतिनिधी शिर्डी येथे येतील त्या-त्या वेळी त्यांची निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत करण्यात यावी. कन्सल्टंट म्हणून त्यांनी खालीलप्रमाणे कामे करावीत.**

**०१) पुरवठादार मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन, प्रा.लि.नोईडा यांचेकडून खरेदी करण्यात येणारे सुरक्षा साहित्य, सी.सी. टी.व्ही, कॅमेरे व त्यासाठी लागणारी वायरिंग, बॅग-स्कॅनर, एच.एच.एम.डी, डी.एफ.एम.डी. इत्यादी सर्व साहित्याची तपासणी करणे.**

**०२) सदर साहित्यांची मार्गदर्शनानुसार उभारणी करुन यंत्रणा कार्यान्वीत करणे.**

**०३) कन्सल्टंट म्हणून नियुक्ती केलेपासून पुढील पाच वर्षासाठी वेळोवेळी शिर्डी येथे येऊन देखरेख व सुपरविझन करणे.**

**०४) केलेल्या कामाचा त्या त्या वेळी अहवाल संस्थानला सादर करणे.**

**०५) पुरवठादार मे. व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्यूशन प्रा.लि., नोईडा यांचेकडून संस्थान कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणावर सुपरव्हिजन करणे, असे ठरले.**

(कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६६** **भाजी कापण्याचे मशिन देणगी स्विकारणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रीमती पुष्पा भजनदास हिन्दुजा द्वारा- दौलतभाई माखीजा, मुंबई हे दि.२८/०५/२०१० रोजी श्री साईबाबांचे दर्शनासाठी आलेले असतांना प्रसादालयामध्ये भोजन घेण्यासाठी आलेले होते. प्रसाद भोजन घेतल्यानंतर प्रसादालय कार्यालयात समक्ष येऊन प्रसाद भोजन तयार करणेकामी उपयुक्त असलेले मशिन देणगी देण्याची इच्छा व्यक्त केली होती.

सध्या प्रसादालयामध्ये विश्वकर्मा मशिन टुल्स, राजकोट निर्मीत ३०० किलो प्रती ताशी भाजी कापण्याचे मशिन चालू आहे. मात्र गर्दीचे प्रमाणात सदर मशिनची क्षमता कमी असल्याने जादा क्षमतेचे मशिन उपलब्ध आहे काय याबाबत सदर मशिन उत्पादक यांचेकडे चौकशी केली असता त्यांचेकडून सांगण्यात आले की, ताशी १००० किलो भाजी कापण्याचे मशिन तयार असून टॅक्ससह १,०९,२५०/- खर्च येईल असे सांगितले. त्यानुसार सदर देणगीदार भक्त व मशिन उत्पादक यांनी किंमतीबाबत चर्चा करुन रु.९७,०००/- किंमत निश्चीत केली.

देणगीदार भक्तांचे इच्छेनुसार सदर १००० किलो भाजी कापण्याचे मशिन विश्वकर्मा मशिन टुल्स, राजकोट यांना मशिन पाठविणेस सांगणेत आलेले होते. त्यानुसार मशिन उत्पादक यांनी उपरोक्त मशिन पाठविलेले असुन लेखाशाखेत पा.नं. ७१०१ दि. ८/०६/२०१० ने देणगी पावती केलेली आहे. व प्रसादालय मशिनरी डेडस्टॉक रजि.पा.नं. ३९ वर नोंद घेतलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे भाजीपाल्याचे मशिन देणगी म्हणून स्विकारणेस कार्योत्तर मान्यता असावी

**निर्णय क्र.५८७ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.६७ श्री साई प्रसादालय सुरक्षितता उपाय योजनेकरीता सेफ्टी ॲपरेटस खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाचे दैनंदिन कामकाज विना अपघात होणेकरीता दिनांक १०/०२/२०१० रोजीचे टिपणीव्दारे करावयाचे वेगवेगळया सुरक्षेच्या उपाययोजनेस मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानूसार खरेदी विभागामार्फत बिदींग ॲपरेटस् सेफ्टी गॉगल्स, ग्लोव्हज हे साहित्य खरेदी करणेसाठी कळविणेत आलेले होते. परंतु खरेदी विभागाने दिनांक ०४/०३/२०१० रोजीचे पत्रान्वये सेफ्टी ॲपरेटस् खरेदीसाठी अपेक्षित खर्चास श्री साई प्रसादालयाने मंजूरी घेणेविषयी सुचित केलेले आहे. त्यानुसार खर्चाचा अंदाज घेणेसाठी विविध पुरवठादार यांचेकडून ई-मेलव्दारे माहीती घेतलेली आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं | तपशील | कंपनी व साईज | उपयोग | नग | अंदाजे एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ब्रिदिंग ॲपरेटस | 1. Scott make PROPAK branded Self Contained<br>2. Breathing Apparatus Set. Class II approved BA set with carbon composite cylinder | 1.गॅस सिलेंडर, गॅस पाईपलाईन, गोदाम इ. ठिकाणी आग लागल्यास तात्काळ अग्निशमन कर्मचा-यास आग विझवितांना श्वसनास पुरेसा ऑक्सिजन मिळणेसाठी<br>2. इतर आपात्कालीन वेळेसाठी | 01 | 97,000/- (सर्व करासह) |
| 2 | सेफ्टी गॉगल्स | 1. Safety Goggles Multipurpose<br>2. Company:- JK Enterprises, Mumbai. | 1.वेल्डींगचे काम करणेसाठी,<br>2. सोलर प्रकल्पाच्या ठिकाणी दुरुस्तीसाठी कामे करणेसाठी, | 12 | 1,500/- |
| 3 | सेफ्टी ग्लोव्हज | 1. Safety Gloge, Full Size<br>2.Samrat Industries, Nagdevi, Mumbai.<br>3.Tata, Bata, etc. | 1. बॉयलर व सोलर स्टीम लाईनचे दुरुस्तीचे काम.<br>2. LPG चे मेन्टेंनन्सचे काम.<br>3. वेल्डींग व इतर मेन्टेनंन्स कामे करणेसाठी. | 12 जोडी | 3,600/- |
| | | | | | **1,02,100/-** |

उपरोक्तप्रमाणे सेफ्टी ॲपरेटस् खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये १,०२,१००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख दोन हजार शंभर मात्र) खर्च येणार आहे. सदर साहित्य विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी विभागामार्फत खरेदीस व त्याकामी येणा-या रु.१,०२,१००/- चे खर्चाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८८ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रीसाई प्रसादालय येथे सेफ्टी ॲपरेटस् खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागवून करणेस व याकामी येणा-या रक्कम रुपये १,०२,१००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**विषय नं.६८ संस्थान प्रकाशित चरित्रे मोफत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

श्री शिरडी साईबाबा मंदिर,कॅनडा श्रीमती सिमी चोप्रा यांचे दि.१० फेब्रुवारी २०१० चे इमेल पत्रान्वये श्री शिरडी साईबाबा मंदिर,कॅनडाच्या व्यवस्थापिका श्रीमती सिमी चोप्रा यांनी संस्थानव्दारा प्रकाशित वेगवेगळया भाषेतील खालीलप्रमाणे चरित्रांची मागणी केली आहे. खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

**List of Sansthan Publication Books Price list.**

| Sr. No | Name of the Books | Language | Qty | Book Print Price | 20%Discount Rate Price | Total Rs |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Shri Sai Satcharitra | Hindi | 100 | 40.00 | 32.00 | 3,200/- |
| 02 | Shri Sai Satcharitra | English | 1000 | 35.00 | 28.00 | 28,000/- |
| 03 | Shri Sai Satcharitra | Kannad | 100 | 35.00 | 28.00 | 2,800/- |
| 04 | Shri Sai Satcharitra | Telugu | 100 | 40.00 | 32.00 | 3,200/- |
| 05 | Shri Sai Satcharitra | Tamil | 100 | 50.00 | 40.00 | 4,000/- |
| 06 | Shri Saicharitra | Bengali | 100 | 56.00 | 45.00 | 4,500/- |
| 07 | Shri Saicharitra | Punjabi | 100 | 96.00 | 78.00 | 7,800/- |
| 08 | Shri Saicharitra | Gujrathi | 100 | 50.00 | 40.00 | 4,000/- |
| | | | | | Total Rs. | 57,500/- |

उपरोक्त प्रमाणे चरित्रे संस्थान मार्फत मोफत द्यावीत असे मा.अध्यक्ष साहेब यांनी दि. ११.०४.२०१० रोजी निर्देश दिले आहे.

सबब वरीलप्रमाणे चरित्रे संभावना खाती खर्ची टाकणेस व त्याची होणारी रक्कम रु. ५७,५००/- मात्र खर्ची टाकणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे चरित्र, श्री शिरडी साईबाबा मंदिर,कॅनडा श्रीमती सिमी चोप्रा यांना मोफत देण्यात यावीत. मात्र कुरिअर खर्च त्यांनी करावा असे त्यांना कळविण्यात यावे. सदर चरित्रांची होणारी रक्कम रुपये ५७,५००/- मात्र संभावना खाती खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**विषय नं.६९** **श्री साईलीला नियतकालिकांचे पाकीटे छपाई करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मुंबई कार्यालय यांचे जा. क्र.१५७४/१० चे दि.१७ मे २०१० चे पत्रानुसार संस्थान प्रकाशित श्री साईलीला (मराठी) व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) नियतकालीकांचे अंक टपालाद्वारे पाकिटातून पाठविणेसाठी लागणा-या छापील पाकीटांचा स्टॉक अल्प प्रमाणात एवढाच साठा शिल्लक असल्याने सन.२०१०-२०११ करीता आवश्यक असणारी श्री साईलीला (मराठी) व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) नियतकालीकांचे अंक टपालाद्वारे पाकिटातून पाठविणेसाठी लागणा-या छापील पाकीटे छपाई करुन घेणे आवश्यक असल्याचे संपादक विभाग मुंबई कार्यालय यांनी कळविले आहे.

श्री साईलीला अंक टपालाने पाठविणेसाठी छापील पाकीटे मुंबई कार्यालयाकडील दि.१७.०५.२०१० चे पत्रानूसार श्री साईलीला (मराठी) ८०,००० नग व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) १,२०,००० नग असे एकूण २,००,००० नग पाकीटे छापून घेणे गरजेचे आहे. सदरची पाकीटे मुंबई येथील संस्थान अधिकृत प्रेसधारकांकडून दरपत्रक मागवून करुन घेणे आहे.

तरी श्री साईलीला (मराठी) ८०,००० नग व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) १,२०,००० नग असे एकूण २,००,००० नग अंदाजे प्रती पाकीट दर रुपये ०१.०० पैसे प्रमाणे येणा-या एकूण रुपये २,००,०००/- चे अपेक्षित खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९०** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईलीला (मराठी) ८०,००० नग व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) १,२०,००० नग असे एकूण २,००,००० नग अंदाजे प्रती पाकीट दर रुपये ०१.०० पैसे प्रमाणे येणा-या एकूण रुपये २,००,०००/- चे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.७०** **संस्थान निर्मित ऑडीओ/व्हीडीओ सी.डी. /डीव्हीडी निर्मिती खर्चाचे कामास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मे. सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून संस्थान निर्मित ऑडीओ/व्हीडीओ सी.डी./ डीव्हीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती /अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित ऑडीओ/व्हीडीओ सी.डी./डीव्हीडी चे उत्पादन करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

संस्थान निर्मित खालील साहित्यांचा स्टॉक अल्प प्रमाणात असल्याने मे.सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचे सी.डी./व्हीसीडी/डीव्हीडी निर्मिती करणेसाठी दरपत्रक मागविण्यात येऊन त्यांनी दि.०१.०६.२०१० चे फॅक्स पत्राने दर कळविले आहे.

| अ.नं | तपशिल | निर्मिती संख्या | दरपत्रकातील सर्व करासह दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित सार (हिंदी दोहावली) (३ सीडीचा संच) | ५००० संच | ६१.२२ | ३,०६,१००/- | ९०/- |
| ०२ | श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडिओ. सी.डी.(एमपी ३) (१ नग सी.डी.) | २०,००० नग | १५.७५ | ३,१५,०००/- | ३०/- |
| ०३ | श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डी.व्हीडी. (एका नगाची सी.डी.) | १०,००० नग | ४३.०५ | ४,३०,५००/- | १००/- |
| ०४ | साईबाबा दी ग्रेट संत ऑफ शिर्डी (सीडी रोम) | ५००० नग | २३.६३ | १,१८,१५०/- | ५०/- |
| ०५ | गुरुपाठाचे अभंग ऑडीओ सी.डी.(२ सी.डी.चा संच) | ५००० संच | ३३.०८ | १,६५,४००/- | ५०/- |
| | | | **एकूण रुपये** | **१३,३५,१५०/-** | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे संस्थान निर्मिती ऑडीओ/व्हीडीओ सी.डी./डीव्हीडी निर्मिती करणेकामी एकूण रु. १३,३५,१५०/- मात्रचा मे सोनी डीएडीस मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना निर्मिती कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. त्याचे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९१** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय न.७१** **पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह कमी करणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, व सदस्य,मा.कार्यकारी अधिकारी व मा. प्रशासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या मान्यता प्राप्त आदेशानुसार संस्थानअंतर्गत ज्या ज्या खात्याचे संबंधीत संपर्कातील अधिका-यांना तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंना त्यांचे शिर्डी भेटीअंती जनसंपर्क कार्यालयामार्फत यात उच्चपदस्थ शासकीय अधिकारी, सिने कलावंत, नामांकित लेखक, आंतरराष्ट्रीय खेळाडू, विविध दुरचित्र वाहिन्यांचे, वृत्तपत्रांचे प्रतिनिधी तसेच हिवाळी अधिवेशनातील विधीमंडळ सदस्य, चावडी शताब्दी महोत्सवानिमित्त साईभक्त संमेलनात मान्यवरांना भेट म्हणून खालील दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/फोटो व दैनंदिनी/दिनदर्शिका, सी.डी प्रकाशने विभागाकडून माहे एप्रिल २००९ ते माहे मार्च २०१० या कालावधीत मोफत देण्यात आलेले आहेत.

**(अ) पुस्तके-**

| कोड नं. | पुस्तकाचे नाव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं. १ | श्री साई सच्चरीत्र | मराठी | ३६ | ६५.४० | २३५४.४० |
| पी यु बी.नं. २ | श्री साई सच्चरीत्र | हिंदी | २९० | २९.२० | ८४६८.०० |
| पी यु बी.नं..३ | श्री साई सच्चरीत्र | इंग्रजी | २९७ | २४.४२ | ७२५२.७४ |
| पी यु बी.नं.४ | श्री साई सच्चरीत्र | गुजराथी | १ | ३२.१५ | ३२.१५ |
| पी यु बी.नं. ५ | श्री साई सच्चरीत्र | कन्नड | १ | २५.३५ | २५.३५ |
| पी यु बी.नं.७ | श्री साई सच्चरीत्र | तामीळ | १ | ३५.६० | ३५.६० |
| पी यु बी.नं. १४ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | मराठी | ४ | २.२० | ८.८० |
| पी यु बी.नं. १६ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | गुजराथी | ४० | २.२५ | ९०.०० |
| पी यु बी.नं. १८ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | तेलगु | ३८ | ६.६९ | २५४.२२ |
| पी यु बी.नं. १९ | श्री साई स्तवन मंजरी | मराठी | २५५ | १.६८ | ४२८.४० |
| पी यु बी.नं. २० | श्री साई स्तवन मंजरी | हिंदी | १ | २.४५ | २.४५ |
| पी यु बी.नं. ३४ | मुलांचे साईबाबा | तेलगु | १ | ५.८० | ५.८० |
| पी यु बी.नं. ४० | चित्रावली | मराठी /इंग्रजी | १ | ५.०० | ५.०० |
| पी यु बी.नं. ४३ | श्री साई सतचरित्र स्टोरी | मराठी | २ | ७७.०० | १५४.०० |
| पी यु बी.नं. ४६ | श्री साई चरित्र | ऊर्दु | १ | ३९.०० | ३९.०० |
| पी यु बी.नं. ४७ | श्री साई स्तवन मंजरी झरीन | कन्नड | १ | २.५५ | २.५५ |
| पी यु बी.नं. ४९ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | इंग्रजी | ३०० | १०.९९ | ३२९७.०० |
| पी यु बी.नं. ५६ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | हिंदी | ११७ | ६.७८ | ७९३.२६ |
| पी यु बी.नं. ६० | शिकवण व तत्वज्ञान | मराठी | ११ | ९.८३ | १०८.१३ |
| पी यु बी.नं..६२ | श्री साई चरित्र | बंगाली | ५ | ३८.५० | १९२.५० |
| पी यु बी.नं. ६६ | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | १ | ५५.८९ | ५५.८९ |
| पी यु बी.नं. ६७ | दोहावली | हिंदी | ५ | ५९.६१ | २९८.०५ |
| पी यु बी.नं.७१ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | बंगाली | १ | १२.५० | १२.५० |
| पी यु बी.नं.७३ | एक फकीर की पाठशाला | हिंदी | १ | ३६.८० | ३६.८० |
| पी यु बी.नं. ७४ | श्री साई समर्थ चरित्र | इंग्रजी | ८ | ९२.०० | ७३६.०० |
| पी यु बी.नं.७७ | श्री साई सतचरित्र स्टोरी | पंजाबी | ५६ | ७०.१७ | ३९२९.५२ |
| पी यु बी.नं.७९ | दैनंदिन साईबोध | गुजराथी | ५६ | ६०.६० | ३३९३.६० |
| पी यु बी.नं. ८० | शिकवण व तत्वज्ञान | गुजराथी | ५६ | १३.३३ | ७४६.४८ |
| पी यु बी.नं..८१ | अवतार व कार्य | गुजराथी | ५६ | १३.८० | ७७२.८० |
| पी यु बी.नं..८२ | शिलधी | गुजराथी | ५६ | ९.५० | ५३२.०० |
| पी यु बी.नं.८३ | श्री साई सतचरित्र स्टोरी | गुजराथी | ५६ | ८१.९० | ४५८६.४० |
| | | | | **एकूण रु.** | **३८६४९.३९** |

**(ब) फोटो-**

| पी यु बी नं. | फोटोचे नांव | आकार | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं. १०१ | दगडावर बसलेले बाबा (B/W) | १४x२० | १ | १.९४ | १.९४ |
| पी यु बी.नं.१०५ | द्वारकामाईत बसलेले बाबा रंगीत | १४x२० | १ | २.१५ | २.१५ |
| पी यु बी.नं.११३ | समाधी फोटो रंगीत | १४x२० | १ | २.६६ | २.६६ |
| पी यु बी.नं. १३१ | समाधी फोटो रंगीत | २०x२८ | १ | ५.४३ | ५.४३ |
| | | | | **एकूण रु.** | **१२.१८** |

**(क) कॅसेट/सी.डी.**

| पी यु बी नं. | कॅसेट/सी.डी चे नांव | प्रकार | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं.२०८ | साई मंदिरातील आरत्या | Vcd | १ | २२.२० | २२.२० |
| पी यु बी.नं.२०९ | शिर्डी दर्शन | Vcd | ७ | १५.१८ | १०६.२६ |
| पी यु बी.नं.२१२ | श्री साई चरित्र | मराठी Acd | १० | ७०.५० | ७०५.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं.२१३ | श्री साई चरित्र दोहावली | हिंदी Acd | १० | ५७.५० | ५७५.०० |
| पी यु बी.नं.२१५ | श्री साई की आरतियाँ | मराठी Acd | ३ | १५०.०० | ४५०.०० |
| | | | | **एकूण रु.** | **१८५८.४६** |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्र.१९१ नुसार खालील प्रमाणे दैनंदिनी व दिनदर्शिका २०१० चे अंदाजे नगास संभावना खाते खर्ची टाकणेस मान्यता मिळालेली आहे.

| अ. नं | तपशील | दैनंदिनी संख्या | दिनदर्शीका १ पानी (लहान) प्रती किंमत रु.५/- | दिनदर्शीका १ पानी (मोठे) प्रती किंमत रु.१०/- | दिनदर्शीका ६ पानी प्रती किंमत रु.२५/- | श्री साईबाबा थ्रीडी दिनदर्शिका प्रती किंमत रु.३००/- | श्री साईबाबा दिनदर्शिका ८ पानी प्रती किंमत रु.२००/- | श्री साईबाबा थ्रीडी टेबल दिनदर्शिका प्रती किमंत रु.१५०/- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्थानचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, व सदस्य, मा.कार्यकारी अधिकारी व मा. प्रशासकीय अधिकारी तसेच हिवाळी अधिवेशनातील विधीमंडळ सदस्य, साईभक्त संमेलनात तसेच इतर अतीमहत्त्वाच्या मान्यवरांना भेट | एकूण | ३२७५ | २७२५ | २००० | १९७६ | १९५ | २५ |

उपरोक्तप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका २०१० संभावना खाते खर्ची टाकणेस मान्यता मिळालेली आहे. प्रत्यक्ष खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| पी यु बी.नं. | डायरी /कॅलेंडर २०१० | वर्ष | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं. ३०६ | श्री साई डायरी | २०१० | २८१८ | ४८.५० | १३६६७३.०० |
| पी यु बी.नं.४१५ | श्री साईबाबा कॅलेंडर ८ पानी | २०१० | १७ | १८५ | ३१४५.०० |
| पी यु बी.नं. ४१६ | श्री साईबाबा थ्री डी कॅलेंडर | २०१० | ४५ | २८५ | १२८२५.०० |
| पी यु बी.नं.४१७ | श्री साईबाबा थ्री डी टेबल कॅलेंडर | २०१० | २४ | १४५ | ३४८०.०० |
| पी यु बी.नं.४१८ | श्री साईबाबा कॅलेंडर १ पानी लहान | २०१० | २१२९ | ४ | ८५१६.०० |
| पी यु बी.नं.४१९ | श्री साईबाबा कलेंडर १ पानी मोठे | २०१० | १७३८ | ९ | १५६४२.०० |
| पी यु बी.नं.४२० | श्री साईबाबा कलेंडर ६ पानी | २०१० | १४५८ | २१ | ३०६१८.०० |
| | | | | **एकूण रु.** | **२१०८९९.००** |

| | |
|---|---|
| एकुण मोफत दिलेल्या पुस्तकांची रक्कम | **३८६४९.३९** |
| एकुण मोफत दिलेल्या फोटोची रक्कम | **१२.१८** |
| एकुण मोफत दिलेल्या सी डी कॅसेट रक्कम | **१८५८.४६** |
| एकुण मोफत दिलेल्या डायरी/कॅलेंडर रक्कम | **२१०८९९.००** |
| एकूण संभावना रक्कम | **२५१४१९.०३** |

उपरोक्तप्रमाणे प्रत्यक्षात माहे एप्रिल २००९ ते माहे मार्च २०१० या कालावधीत वेळोवेळी संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो, सी.डी. व डायरी/कॅलेंडर पोस्टेज स्टॉकमधून भेट म्हणून देण्यात आलेली असून, त्यासाठी पुर्णांकित रक्कम रु.२,५१,४१९/- इतका खर्च आला आहे. तरी त्यास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्रत्यक्षात माहे एप्रिल २००९ ते माहे मार्च २०१० या कालावधीत वेळोवेळी संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो, सी.डी. व डायरी/कॅलेंडर पोस्टेज स्टॉकमधून भेट म्हणून देण्यात आलेली असून, त्यासाठी आलेल्या रक्कम रु.२,५१,४१९/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.७२ नवीन भक्तनिवासस्थान इमारतीत कृषी माहिती केंद्रासाठी लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०५/२००९ रोजीचा सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.३३, निर्णय क्रं.४९६ अनुसरुन संस्थानचे जा.नं.एसएसएस/वशी-०२/ ८३७८/२००९ दि.०६/०७/२००९ अन्वये दि.०६/०७/२००९ ते दि.०५/०६/२०१० अखेर ११ महिने मुदतीसाठी अे -विंग गाळा नं.१८ बाहेरील बाजुचा लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर डिपॉझिट रक्कम रुपये- ४,०२०/- (अक्षरी रुपये- चार हजार, वीस ) मात्र व मासिक परवाना फी रुपये-६७०/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन वापरांस दिलेला आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना देण्यात आलेल्या जागेचा ११ महिने कालावधीचा करारनामा करण्यात आलेला असून गाळयाची मुदत दि.०५/०६/२०१० रोजी संपुष्टात येत आहेत.

पुढील कालावधीसाठी म्हणजे दि.०६/०६/२०१० ते दि.०५/०५/२०११ अखेर ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळावी, अशी विनंती दि.८/०४/२०१० चे अर्जाने केलेली आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना वापरांस देण्यात आलेल्या गाळयांचा परवानगीचा कालावधी दि.०५/०६/२०१० रोजी संपुष्टात येत असल्याने कृषि माहिती केंद्राकडून शिरडी परिसरातील गांवामध्ये शेतकरी मेळावे, माती व पाणी नमुने तपासणी व इतर कृषि विषयक माहिती घेतली जातात. तसेच विद्यापीठाची विविध प्रकाशने शेतकरी / भक्तांसाठी स्टॉलव्दारे विक्री करुन चांगली सुविधा प्राप्त होते. याबाबतचा विचार करता त्यांना प्रस्तुत ठिकाणी स्टॉल चालविणेसाठी लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने कालावधीसाठी दि. ०६/०६/२०१० ते दि.०५/०५/२०११ पावेतो मुदतवाढ देता येईल. याकामी त्यांच्या मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ म्हणजे ( पुर्वीचे मासिक परवाना फी रुपये-६७० मध्ये १०% वाढ +६७ = ७३७/- ( अक्षरी रुपये- सातशे सद्तीस ) मात्र इतकी रक्कम तसेच विद्युत बील वेगळे आकारुन महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना नविन भक्तनिवासस्थान ( ५०० रुम ) इमारतीमध्ये देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देता येईल.

**निर्णय क्र.५९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना वापरांस देण्यात आलेल्या गाळयांचा वापर कृषि माहिती केंद्राकडून शिरडी परिसरातील गांवामध्ये शेतकरी मेळावे, माती व पाणी नमुने तपासणी व इतर कृषि विषयक माहिती देणे यासाठी होत असल्याने, तसेच विद्यापीठाची विविध प्रकाशने शेतकरी / भक्तांसाठी स्टॉलव्दारे विक्री करुन चांगली सुविधा प्राप्त होते. याचा विचार करता, त्यांना प्रस्तुत ठिकाणी स्टॉल चालविणेसाठी लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर त्यांचे सध्याचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि. ०६/०६/२०१० ते दि.०५/०५/२०११ पावेतो त्यांना मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरलें.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.७३** **नवीन भक्तनिवासस्थान इमारतीमधील गाळे वापरास देणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. १०/०१/२०१० रोजीचा विषय नं. ९१ निर्णय क्र. ९१ अन्वये नविन भक्तनिवासस्थान इमारतीमधील आतिल बाजुचे ५ गाळे श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.सोसायटी यांना लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर चालविणेस मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्याप्रमाणे जा.क्र. एसएसएस वशी ०२/५७१६/२०१० दि. ०९/०४/२०१० रोजीचे पत्राने दि. १/०६/२००९ ते ३१/०५/२०१० अखेर १२ महीने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. ०६/०३/२०१० रोजीचे आयत्या वेळचा विषय नं. २० निर्णय क्र. ३५५ अन्वये सदर उपरोक्त गाळयांचा वापर लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर ११ महिने कालावधी साठी जाहीर लिलाव करणेचे ठरले होते.

उपरोक्त ठरांवास अनुसरुन नविन भक्तनिवास इमारती मधील उपरोक्त गाळयांचा दि. १८/०२/२०१० रोजी लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर जाहीर लिलावाने निश्चित करणेत आला होता. ततपुर्वी अे - विंग बाहेरील बाजू च्या गाळयांचा दि. ०१/०३/२०१० ते ३१/०१/२०११ याकालावधी साठी लिलाव करण्यात आला होता. त्या लिलावात गाळा घेतलेल्या ५ गाळा धारकांनी त्यांना परवडत नसल्याने गाळे खाली करुन दिले होते. त्यामुळे सोसायटीचे ५ गाळयांसोबतच या व बाहेरील ५ अशा १० गाळयांचा जाहिर लिलाव करण्याबाबत दि. १३/०५/२०१० च्या दै. लोकमत वृत्तपत्रात जाहिरात लिलाव निश्चित करणेत आला होता. तथापी सोसायटीला दिलेल्या गाळयांचा लिलाव करण्यात येवू नये असे मा. राधाकृष्ण विखे सो. विधी व न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे फोन वरुन कळविले प्रमाणे दि. २४/०५/२०१० रोजीचे कार्यालयीन टिपणी वरिल मंजूरी प्रमाणे श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. सोसायटीच्या ताब्यात असलेल्या ५ गाळयांचा लिलाव दि.२७/०५/२०१० रोजी स्थगीत / रद्द केला आहे.

दि. २७/०५/२०१० रोजी लिलावाची तयारी करण्यात आली होती. लिलावात ९ लोकांनी भाग घेण्यासाठी पैसे (डिपॉझिट)भरलेले आहेत . दि.२७/०५/२०१० रोजी पहिल्या गाळयाची लिलाव प्रक्रीया सुरु होण्या पुर्वी गावातील लोकांनी मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत झालेल्या निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. सोसायटीच्या ताब्यात असलेल्या ५ गाळयांचा लिलाव करण्याबाबत मागणी केली. जर या ५ गाळयांचा लिलाव करणार नसाल तर इतरही ५ गाळयांचा लिलाव रद्द करण्यात यावा अशी तोंडी मागणी व विनंती त्यांनी केली त्यानंतर सदर सर्व गाळयांचा लिलाव स्थगीत / रद्द करणेत आला आहे.

लिलावात बोली बोलण्यासाठी ज्या ९ लोकांनी संस्थानकडे रक्कम जमा केली आहे. ती रक्कम त्यांना परत करण्यात येत आहे.

श्री साईसंस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी त्यांनी दि.०६/०५/२०१० रोजीचे पत्राने त्यांना भक्तनिवासस्थान ५०० रुम इमारतीचे आतील बाजुस वापरांस दिलेल्या ५ गाळयांचे लिव्ह

अँन्ड लायसन्स तत्वावर दिलेली परवानगी पुढील पाच वर्षासाठी मुदतवाढ देणेत यावी अशी विनंती केलेली आहे. मात्र दि.२७/०५/२०१० रोजीचे लिलावामध्ये सदर ५ गाळयासह नविन भक्तनिवास इमारतीचे बाहेरील बाजुचे ५ गाळे असे एकुण १० गाळयांचा लिलाव निश्‍चित करणेत आलेनंतर उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सदरचे दिवशी लिलाव झालेला नाही.

उपरोक्त प्रमाणे दि. २७/०५/२०१० रोजी लिलाव स्थगीत करण्यात आलेले भक्तनिवास इमारतीचे बाहेरील बाजूचे ५ गाळे सध्या परिस्थीतीत रिकामे आहेत. तसेच इमारतीच्या आतील बाजूचे ५ गाळे संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप सोसायटीला लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर चालविण्यास दिलेले आहेत त्याची मुदत दि. ३१/०५/२०१० रोजी संपलेली आहे.

तरी संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप सोसायटीला मागील वर्षाच्या अटी शर्ती प्रमाणेच पुढील ११ महिन्यासाठी लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन चालविण्यास देणे अथवा उपरोक्त सर्व ५ + ५ = १० गाळ्यांचा लिलाव करणे किंवा कसे यावर निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.५९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवास इमारतीचे बाहेरील उत्तर बाजूचे ०५ गाळयांचा संस्थानचे कामासाठी वापर करावा, तसेच इमारतीचे आतील बाजूचे सध्या श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप सोसायटीच्या ताब्यात असलेल्या ०५ गाळयांचा ११ महिणे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर वापरास देणेसाठी जाहिर लिलाव करावा. त्याचबरोबर सदरची कार्यवाही होईपर्यंत श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप सोसायटीकडून ०५ गाळयांची मुदत संपलेल्या तारखेपासून मागील मान्य दराने परवाना फी वसूल करण्यात यावी, असें ठरलें.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.७४** **जुने प्रसादालय इमारत परिसरात सहकारी संस्था व एस.टी. महामंडळ यांना लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेल्या स्टॉलचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोयीसाठी (जुने) प्रसादालय परिसरात (स्टॉलसाठी)यापुर्वी ०१) श्रीरामपुर दुध जिल्हा मध्यवर्ती सहकारी व्यवसायीक संघ लि.बाभळेश्वर ०२) संगमनेर तालुका सहकारी दुध उत्पादक, ०३) प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रीया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्या. लोणी, ०४)गोदावरी खोरे दुध संघ, कोपरगांव यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर खालील प्रमाणे व्यवसाय चालविण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | डिपॉझिट फी व मासिक भाडे, विद्युत बिल वेगळे | जागेचा वापर | पुर्वीचा कालावधी | मुदतवाढीसाठी प्रस्तावीत कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीरामपुर दुध जिल्हा मध्यवर्ती सह.व्यवसायीक संघ,लि.बाभळेश्वर | मासिक भाडे १०,०००/- (डिपॉझिट रक्कम १०,०००/-) | दुध दुग्ध जन्य पदार्थ विक्रीसाठी | दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१० | दि.०१/०३/२०१० ते दि.३१/०१/२०११ |
| ०२ | संगमनेर तालुका सह.दुध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या.घुलेवाडी,ता.संगमनेर | मासिक भाडे १०,०००/- (डिपॉझिट रक्कम १०,०००/-) | आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थ ड्रिंकींग वॉटर विक्री कामी | दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१० | दि.०१/०३/२०१० ते दि.३१/०१/२०११ |
| ०३ | प्रवरा फळे भाजीपाला उत्पा.व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सह.संस्था,लोणी | मासिक भाडे १०,०००/- (डिपॉझिट रक्कम १०,०००/-) | बेदाणा विक्री साठी | दि.३०/११/२००८ ते दि.२९/११/२००९ | दि. ३०/११/२००९ ते दि. २९/११/२०१० |
| ०४ | गोदावरी खोरे दुध संघ कोपरगांव | मासिक भाडे १०,०००/- (डिपॉझिट रक्कम १०,०००/-) | दुध दुग्ध जन्य पदार्थ विक्रीसाठी | दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१० | दि.०१/०३/२०१० ते दि.३१/०१/२०११ |

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार उपरोक्त सहकारी संस्था यांना वापरांस देण्यात आलेल्या परवानगी कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील कालावधीकरीता सदर जागेत संस्थेस स्टॉल्स चालविणेस मागणी आहे. मात्र जुने प्रसादालय इमारतीचे नुतनीकरणाचे कामास सुरुवात होणार होती. करीता त्याठिकाणी स्टॉल्स असणे सोईचे होणार नाही. पुढील मुदतवाढीचा प्रस्ताव यापुर्वी सादर करण्यात आलेला नाही. मात्र अद्यापही प्रस्तुत ४ सहकारी संस्थेचे त्याठिकाणी स्टॉल्स चालुच आहेत. अशा परिस्थितीत त्यांचेकडून मासिक परवानगी फी भरुन घेणे उचित राहील. करीता उपरोक्त ४ सहकारी संस्थेस लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर वापरांस देण्यात आलेल्या स्टॉलसाठी मुदत संपलेल्या तारखेपासून ११ महिने किंवा ६ महिने पावेतो मुदतवाढ देता येईल व त्यांचेकडुन यापुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढीव परवाना फी आकारुन मुदतवाढ देता येईल. तरी सदरचे विषयांवर निर्णस होणेस विनंती .

**निर्णय क्र.५९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त ४ सहकारी संस्थेस लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर वापरास देण्यात आलेल्या स्टॉलला मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.७५ संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. ८७,८८ मधील वाहनतळाची पार्किंग व्यवस्था सुरु करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालय येथे प्रसाद भोजन घेणेसाठी येणारे साईभक्तांपैकी बरेचशे भक्त त्यांचे खाजगी वाहनातुन येतात. जे भक्त त्यांचे खाजगी वाहनातुन येतात. त्यांना त्यांचे वाहन पार्कीग करणेसाठी खाजगी वाहनातळावर जावे लागते किंवा रस्त्यावर वाहन उभे करावे लागते. प्रस्तुतची बाब लक्षांत घेऊन साईभक्तांचे सोईसाठी प्रसादालय येथे येणारे वाहनांसाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. ८७,८८ मध्ये एक हेक्टर क्षेत्रात खडीकरण करुन वाहन तळ तयार करण्यात आले आहे. सदरचे वाहनतळ तयार करणे कामी रुपये २५,५९,०००/ (अक्षरी पंचवीस लाख एकोणसाठ हजार मात्र) चा खर्च करणेत आला आहे. वाहनतळाचे काम दि.०८/०९/२००९ रोजी पुर्ण झालेले असून विदयुत व्यवस्था करणेबाबतचे काम होत आहे.

उपरोक्त ठिकाणी साईभक्तांच्या सोयीसाठी प्रत्यक्ष कारपार्किंगची व्यवस्था खाजगी ठेकेदारामार्फत/ सहकारी संस्थामार्फत सुरु करता येईल. प्रस्तुतची कारपार्किंगची व्यवस्था खाजगी ठेकेदारामार्फत किंवा सहकारी संस्थेमार्फत लिव्ह अँन्ड लायसन्स तत्वावर ११ महिने करीता देता येईल. त्याकामी ठेकेदाराकडुन जागेच्या वापराच्या परवानगी बाबत रक्कम रुपये ५,००,०००/-अक्षरी पाच लाख मात्र डिपॉझिट व मासिक परवानगी फी , विदयुत बिल आकारुन ठेका देता येईल.सदर परवानगी उचित ठेकेदारांस देणेचे दृष्टीने तसेच जागेच्या वापराबाबत उच्चतम मासिक लायसन्स फी संस्थानला प्राप्त होणे करिता सदर कामाचा कार पार्किंग व्यवस्था चालविणेचा ठेका लिलाव पध्दतीने लिव्ह अँड लायसन्स तत्वावर ११ महिने कालावधीसाठी देता येईल. त्यास मान्यता आसावी. याकामी जाहिर लिलाव प्रकटन निवेदन वर्तमान पत्रातुन प्रसिध्द् करणे कामी व त्याकामी येणा-या अनुषंगिक खर्चास मान्यता असावी.

सध्या संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान ५०० रुम येथे सध्या कार्यान्वित असलेली पार्किंगची व्यवस्था श्री साईबाबा संस्थान नोकरांची पतपेढी यांचेमार्फत कार्यान्वित आहे. वाहन व्यवस्थेबाबत भक्तांकडुन मोठया वाहनासाठी लक्झरी,बसेस वाहनासाठी रु.१५/-, जिप साठी रु.१०/- , रिक्षा व मोटार सायकलसाठी रु. ५/- अशी पार्किंगची फी आकारणी आकरण्यात येते. त्याप्रमाणेच दर व इतर अटी शर्ती लिलाव मंजुर धारक ठेकेदारांस ठरवुन देता येतील त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. ८७,८८ मधील वाहनतळाची पार्किंग व्यवस्था सुरु करणेकामी जाहिर लिलाव करुन उच्चतम दराने ठेकेदारास चालविण्यास देण्यात यावे,असें ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.७६ श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविण्यास देण्यात आलेल्या व्यवसायांच्या गाळयांना मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांना ११ महिन्याचे कराराने लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर संस्थान परिसरात क्लोकरुम, कारपार्किंग, प्रसाद नॉव्हेल्टी स्टोअर्स, एस.टी.डी.बुथ तसेच थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ असे खालील प्रमाणे विविध व्यवसाय चालविणेस परवानगी देण्यात आलेली आहे. सदरचे व्यवसाय समाधी मंदीर परिसर, साईप्रसाद परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, स्वागत कक्ष परिसर, धर्मशाळा (२०० रुम) परिसर, साईउद्यान व हॉस्पिटल परिसर या विविध ठिकाणी चालविले जात आहेत.

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | मासिक भाडे | ठिकाण | मंदिर परिसरातील गाळे |
|---|---|---|---|---|
| ०१ | **कार पार्किंग** | | | |
| | अ) नविन भक्तनिवासस्थान | रु.४७,१६०/- | ०१) भक्तनिवास परिसर | -- |
| | ब ) धर्मशाळा (२०० रुम ) | रु. ११,७९२/- | ०२ ) धर्मशाळा परिसर | -- |
| ०२ | **क्लोकरुम** | | | |
| | अ) सुलभ क्लोकरुम, | रु.५,१४८/- | ०१) सुलभ शौचालय इमारत | -- |
| | ब ) साईप्रसाद क्लोकरुम | **(एकत्रित फी )** | ०२) जुने चौकशी कार्यालय शेजारी | -- |
| ०३ | **एस.टी.डी.बुथ** | | | |
| | अ) एस.टी.डी.-०१, | रु.२,१४८/- | ०१) साईप्रसाद पॉ.हाऊस समोर | -- |
| | ब) एस.टी.डी.-०२, | रु. २,१४८/- | ०२) धर्मशाळा परिसर (२०० रुम) | -- |
| | क) एस.टी.डी.-०३ | रु.१,२९०/- | ०३) शांती निवास उत्तर गेट | -- |
| ०४ | **प्रसाद नॉव्हेल्टी** | | | |
| | अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-३, | रु. २,१४८/- | ०१) धर्मशाळा ब्लॉक नं.१, | -- |
| | ब ) प्रसाद स्टोअर नं.०२, | रु. २,१४८/- | ०२) धर्मशाळ ब्लॉक नं.२, | -- |
| ०५ | **दुध स्टॉल** | | | |
| | अ) दुध स्टॉल नं.०१, | रु. २,१४८/- | ०१) आब्दूलबाबा समाधी जवळ | अ) मंदिर परिसरात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब) दुध स्टॉल नं.२,<br>क) दुध स्टॉल नं.<br>ड) दुध स्टॉल नं.०५,<br>इ ) दुध स्टॉल नं.०६,<br>ई ) दुध स्टॉल नं.०७,<br><br>उ ) दुध स्टॉल नं.०८ | रु. २,१४८/-<br>रु. १७,७२०/-<br>रु. २,१४८ /-<br>रु. २,१४८ /-<br>रु. २,१४८/-<br><br>रु. २,१४८/- | ०२) साईप्रसाद परिसर स्टॉल<br>०३) उत्तर गेट पश्चिमेस गाळा<br>०४) स्वागत कक्ष स्टॉल<br>०५) उत्तर गेट पुर्वेस स्टॉल<br>०६) शांतिनिवास दर्शन लाईन गेट गाळा<br>०७) भक्तनिवास दर्शन लाईन (ओपन स्पेस.) | --<br>ब) मंदिर परिसरात<br>--<br>क) मंदिर प. बाहेरील बाजू<br>क ) मंदिर परिसरात<br><br>ड ) मंदिर परिसरात |

आता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांचे दि. ०६/०५/२०१० चे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून, त्यात उपरोक्त संस्था ही नोंदणीकृत असून संस्थान कामगारांचीच संस्था आहे. संस्था आपले मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी (उपरोक्त ) व्यवसाय चालवित असून त्याच बरोबर संस्थेमार्फत संस्थेच्या सभासदांना व कामगारांना त्यांच्या आर्थीक गरजा भागविणेसाठी कर्जरुपाने मोठ्या प्रमाणात अर्थ सहाय्य करत असल्याने संस्था हि संस्थेचे सभासद व कर्मचारी यांची कामधेनु आहे. असे पत्रात नमुद करणेत आले आहे. व उपरोक्त व्यवसाय सोसायटीस ५ वर्षा करीता चालविणेस मुदतवाढ द्यावी अशी विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीची दि. १०/०१/२०१० रोजीचा(इकडील विभागास ठराव प्रत प्राप्त दि.३/३/२०१०) विषय नं. ९१ निर्णय क्र. ९१ अन्वये दि. १/०६/२००९ ते ३१/०५/२०१० अखेर १२ महिने कालावधी साठी उपरोक्त व्यवसाय चालविणेस यापुर्वी मुदतवाढ देण्यात आली होती. याच

"संस्थान परिसरातील जनसंपर्क कार्यालय , रेल्वे रिझर्वेशन काऊंटर व संस्थान कर्मचाऱ्यांची श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सोसायटी साठी देण्यात आलेले सर्व स्टॉल जुने प्रसादालय परिसरात हलविण्यात यावे " अशा आशयाचा ठराव झालेला आहे. त्यानुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सोसायटीस १) जा.क्र. एसएसएस वशी-२/५७१६/१० दि. ०९/०४/२०१० रोजीचे पत्राने २) जा.क्र. एसएसएस वशी-२/३०७५/१० दि. २९/०५/२०१० रोजीचे पत्राने मंदिर परिसरातील गाळे जुने प्रसादालय परिसरात हलविणेबाबत लेखी व तोंडी वेळोवेळी कळविले आहे. व त्याशिवाय गाळे चालविणेस पुढील मुदतवाढीबाबत विचार करता येणार नाही असेही त्यांना कळविलेले आहे. परंतू अद्यापही श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सोसायटीने गाळे स्थलांतरीत केलेले नाहीत. व प्रकरणी सविस्तर चर्चा चालू आहे. असे सांगत आहेत व गाळ्यास पुढील मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

संस्थानने उपरोक्त प्रमाणे संस्थान परिसरात १) मंदिर परिसरात व २) मंदिर परिसराबाहेरील परिसरात श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटीस गाळे लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर दि. ३१/०५/२०१० अखेर वापरास दिलेले आहेत. त्याबाबत मुदत संपुष्टात आलेली आहे. उपरोक्त परिस्थीतीत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांना पुढील दि. १/०६/२०१० ते दि. ३१/०५/२०११ यावर्षासाठी उपरोक्त ठिकाणी असलेल्या व्यवसायास लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर पुढील १ वर्षासाठी मुदतवाढ पुर्वीचे मासीक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन १ वर्षासाठी मुदतवाढ द्यावयाची किंवा मुदतवाढ द्यावयाची नाही यासाठीचे निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.५९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे दिनांक १०.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्र. १९२ अन्वये ठरलेनुसार संस्थान मंदीर परिसरातील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटीस देण्यात आलेले गाळे मंदीर परिसराबाहेर हलविल्यासच मुदतवाढ देण्यात यावी. तसेच उर्वरित उपरोक्त गाळयांना लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर पुढील एक वर्षासाठी पुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १० % वाढ करुन मुदतवाढ देण्यात यावी, असें ठरले.**

(कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.७७** **श्री रामनवमी उत्सव २०१० अंदाजपत्रकातील तरतूदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव २०१० मध्ये ब व क मधील खर्चाचे अंदाजपत्रक कार्यासन ५ कडून व अ चे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून तयार करण्यात आलेले होते व त्यास मा.व्यवस्थापन समितीत निर्णय क्रं. ३१३ अन्वये मान्यताही मिळालेली होती. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षा काही बाबीवर जादा खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| | **अ.नं.** | **तपशील** | **मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम** | **प्रत्यक्ष खर्च** | **शेरा (जादा खर्च)** |
|---|---|---|---|---|---|
| अ | ०१. | मंडप, कमानी, गादीभाडे, स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | १२,३१,४६७.०० | १२,३१,४६७.०० | |
| | | एकूण अ- | १२,३१,४६७.०० | १२,३१,४६७.०० | --- |
| ब | ०१. | कलाकार बिदागी, | ३,००,०००.०० | ८५,०४७.०० | --- |
| | ०२. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ४,००,०००.०० | ३,६१,३११.०० | --- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ०३. | विद्युत रोषणाई | ५,२५,०००.०० | ५,६५,०८२.०० | ४०,०८२.०० |
| | ०४. | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | १५,००,०००.०० | १,२४,८४७.००<br>१४,५९,७४६.००<br>१५,८४,५९३.०० | ८४,५९३.०० |
| | ०५. | जादा कामगार | २,५०,०००.०० | ०१,२८,३२२.०० | -- |
| | ०६. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, लस्सी, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ३,००,०००.०० | १९,४३१.०० | --- |
| | ०७. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | ०२,२५,०००.०० | ०१,५६,५७८.०० | --- |
| | | एकुण ब- | ३५,००,०००.०० | २७,७२,०४२.०० | १,२४,६७५.०० |
| क | ०१ | कुस्ती हगामा | १,७५,०००.०० | २,०६,१२८.०० | ३१,१२८.०० |
| | | एकूण क- | १,७५,०००.०० | २,०६,१२८.०० | ३१,१२८.०० |
| | | एकुण अ+ब+क- | ४९,०६,४६७.०० | ४२,०९,६३७.०० | १,५५,८०३.०० |

अ.नं. अ-१ मध्ये होणारे खर्चास बांधकाम विभागामार्फत व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०३/२०१० चे सभेतील निर्णय क्रं. २७६ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे.

अ.नं. ब - ०३ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २०१० मध्ये विदयुत रोषणाई साठी रु. ५,२५,०००.०० इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता प्रत्यक्षात या कामी रु. ५,६५,०८२.०० इतका खर्च आलेला आहे. म्हणजेच विदयुत रोषणाई साठी रु. ४०,०८२.०० मात्र जादा खर्च झाला आहे .

अ.नं. ब - ०४ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव-२०१० मध्ये निमंत्रण पत्रिका , जाहिरात, पोष्टेज उदीप्रसादसह इ.साठी रु. १५,००,०००.०० इतका मंजूर झालेला होता व श्री रामनवमी उत्सव २०१० मध्ये प्रत्यक्ष निमंत्रण पत्रिका छपाई , जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादसह इ.साठी हा खर्च रु. १५८४५९३.०० इतका झालेला आहे. यामध्ये आजीवन सभासदांच्या संख्येत वाढ झालेने रु. ८४,५९३.०० इतका जादा खर्च झालेला आहे.

अ.नं. क-१ मध्ये झालेल्या जादा खर्चा बाबत - श्री रामनवमी-२०१० मध्ये कुस्ती हगामासाठी रु. १,७५,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली होती परंतू प्रत्यक्षात याकामी रु २,३८,७४२/- इतका खर्च झालेला आहे. म्हणजेच या कामी रु. ३१,१२८/- इतका खर्च जास्त झालेला आहे.

तरी अ.नं. ब-३ , ब-४ व क-१ प्रमाणे विदयुत रोषणाई , निमंत्रण पत्रिका छपाई व पोष्टेज, उदीप्रसाद पोष्टेज व कुस्ती हगामा साठी झालेल्या एकूण रु. १,५५,८०३-०० (अक्षरी रुपये एक लाख पंचावन्न हजार आठशे तीन मात्र) चे जादा खर्चास मान्यतेसाठी सादर

**निर्णय क्र.५९८ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.७८ गुरुपौर्णिमा उत्सव -२०१० किर्तनकार व कलाकार निश्चित करणे, बिदागी निश्चित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१० हा दि.२४/०७/२०१० ते दि.२६/०७/२०१० अखेर तीन दिवस साजरा होणार आहे. उत्सवात ३ दिवस नारदीय पध्दतीने किर्तन कार्यक्रम होत असतात. मागील रामनवमी उत्सवात ३ दिवसाचे किर्तनासाठी रु. ९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. खालील ३ कीर्तनकारांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१० मध्ये कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणून संस्थानकडे अर्ज केलेले आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **किर्तनकार नांव** | **बिदागी बाबत** |
|---|---|---|
| ०१. | ह.भ.प. मंदार गंगाधर व्यासबुवा,<br>साई सदन नं. १ / ३ रा मजला, जुना आयरे रोड, मढवी शाळेजवळ , डोंबिवली (पू) जि ठाणे. फोन नं.०२५१-२४४४५१६<br>मो.९५९४२५६५७० / ९८६९६२८९८६ | संस्थान देईल ती |
| ०२. | ह. भ. प. माधवराव तुकारामपंत आजेगांवकर<br>श्री.केशव कृपा ,कौस्तुभ मंगल कार्यालय ,श्री दासगुरू नगर,कारेगांव रोड,परभणी ४३१४०१ फोन नं.०२४५२ -२२२९८४<br>मो.९४२११८३०५१ | संस्थान देईल ती |
| ०३. | सौ. स्नेहल सतोष चित्रे .<br>६९६ म. ८ नं. शाळेजवळ, लाळगे बिल्डींग, शिवाजी पेठ, कोल्हापूर- ४१६०१२<br>मो.नं.९९२२४५८८७९ | संस्थान देईल ती |

उपरोक्त पैकी किर्तन कार्यक्रम कोणास द्यावा , बिदागी किती दयावी या बाबत निर्णय होणेस विनंती आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१० हा दि.२४/०७/२०१० ते दि.२६/०७/२०१० अखेर तीन दिवस साजरा होणार आहे. प्रत्येक उत्सवात तिन दिवस संगीत गायनाचे कार्यक्रमाचे आयोजन संस्थान मार्फत करण्यात येत असते. या कामी खालील प्रमाणे २२ कलाकारांनी सदरचे उत्सवात कार्यक्रम मिळणे बाबत अर्ज केलेले आहेत. त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम तपशील | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.रवीपाल गंधे<br>मु.पो.मांगलादेवी ,ता.नेर ,जि.यवतमाळ.<br>मो.९६८९३७३४२५ | सप्त खंजेरी वादन | ७ | संस्थान जे देईल ते |
| ०२ | कलाविष्कार कलापथक ,ठाणे.<br>श्री .विनोद नाखवा,<br>फोन नं. २५४७ ८६०९<br>मो. ९८२०७८४८४२. | "गर्जा महाराष्ट्र माझा."<br>विविध गीत गायन कार्यक्रम | १०-१५ | संस्थान जे देईल ते |
| ०३ | श्री.अमोल माधव पटवर्धन.<br>१०४१, पेठभाग<br>पांजरपोळ रोड , सांगली ४१६४१६<br>फोन नं.०२३३-२३२७८१०<br>मो .९८८११०७१५१ | भक्ती गीत व गीत रामायण गायन | कळविलेली नाही | प्रवास खर्च मिळावा |
| ०४ | श्री. कैलास (हरेकृष्णदास )<br>आकाशवाणी /दुरदर्शन<br>नागपुर ( महाराष्ट्र )<br>मो. ९८२३७२१५६३ / ९३७२३३०९८० | "भजनसंध्या " | ०५ | विना मानधन |
| ०५ | श्री. बद्री दिव्या भुषण , श्रीमती. अंजना भुषण<br>bsusansacademy@yahoo.com | "भरतनाटयम "कार्यक्रम. | कळविलेली नाही | |
| ०६ | सौ.शितल विनित खंडकर .(तन्मय)<br>ए २२, रत्नसमुह को ऑप सोख ,डी एन नगर पोस्ट ऑफिससमोर.डि.एन नगर ,अंधेरी (प.)<br>मुंबई -५३, मो.९३२५२९५२५३ | गीत गायन | १० | ११ हजार |
| ०७ | श्रीमती. वनिता बजाज .(दिल्ली).<br>रेडिओ सिंगर ,साईदुर्गा मंडल<br>साईबाबा की कव्वाली , भगवत जागरण.<br>GHA/१३९ वेस्ट विहार, नवी दिल्ली. | "साईभजन गायन " | १० | ११,हजार |
| ०८ | श्री. मकरंद खेर,महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी नगरशाखा,(पुण)व्यवस्थापन सल्लागार ,<br>ज्ञानशाखा, इंग्लीश मीडीयम स्कुल अ.नगर,<br>०२४१ (२३४७१५५)२४३०५०५<br>मो. ९४२२७२७७०२ | 'राणी तु कुठं ?, हुंडाबळी, स्त्रीभ्रुण सामाजिक असमानता यावर भावदर्शक कार्यक्रम (दीड तास वेळ.) | १२ | प्रवासामध्ये होणारा खर्च १५,००० |
| ०९ | स्वरसगम संगीत प्रसारक मंडळ,<br>डॉ. दिनेश वाघोलीकर, हॉस्पीटल<br>एस. टी स्टँड जवळ,संगमनेर -४२२६०५<br>जि.अ. नगर, दूरध्वनी ०२४२५-२२५७१३, २२७२५० मो.९८२२०५३८३४ | भावगीते व भक्तीगीते | कळविलेली नाही | |
| १० | श्री रविंद्र जोशी , साईकृपा, देवेद्रं सोसायटी, चार्वाक चौक, इंदिरानगर, नासिक,<br>मो.नं.९८५०४८०५०५ | बासरीवादन | ४ | संस्थान देईल ते |
| ११ | विजय साखरकर,<br>दत्तनिवास चाळ नं २ /१०, देवीपाडा, मच्छिमार्केट समोर, बोरिवली पूर्व- मुंबई -६६ | साई स्वर नृत्योत्सव. | १५ | १० हजार |
| १२ | पंडीत हिंदराज दिवेकर .<br>८२ बुधवार पेठ, रामसुख तुळशी बिल्डींग<br>३ रा माळा, फलॅट नंरब ३०१-३०२<br>गणपती चौक ,तुलसीबाग गणपती ,<br>पुणे-४११००२ . | रुद्र विना | कळविलेली नाही | |
| १३ | सौ.शुभांगी मुळे.९९६/१९,पूर्ती,<br>सरसंगम सोसायटी ,नवी पेठ ,पुणे -३०<br>मो नं.९८८१४३४४७३ | "स्वरगंध "गायन कार्यक्रम | १० ते १२ | ३० हजार. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | श्री.हृषिकेश महाले.A१ /२१, धर्मावीर पार्क सोसायटी, बीडवेवाडी, पुणे -४११०३७ मो. ९८२२९५३१३५, | साई भजन संध्या | २ ते ५ | |
| १५ | श्री.प्रियेश शर्मा. Priyesh.२४०१८८@gmail.com | साई संध्या कार्यक्रम | कळविलेली नाही | |
| १६ | श्री गंगाधर बुवा व्यास, काशिविश्वेश्वर मंदिर, टी.एच.कटारीया मार्ग, माहिम मुंबई- ४०० ०१६ | अभंग, भक्तीगीते, नाटयसंगीत | ३ ते ४ | ११ ते १५ हजार |
| १७ | श्री आर के सक्सेना, ९०३, टाईप-४, लक्ष्मी बाई नगर, आय एन ए मार्केट समोर, दिल्ली हाट जवळ, नवी दिल्ली. मो. ०९८१११२६४३६ | साई भजन | ८ | ३६०००/- निवासव्यवस्था संस्थानने करावी. |
| १८ | डॉ. सौ. मंगला आपटे, १०२, मधुरा अपार्टमेंट, कमला नेहरु पार्कचे मागे , प्रभा रोड , लेन नं.१०, एरंडवणे, पुणे ४११ ००१. फोन. (०२०) २५६५७८९८ | श्री साई गीतगायन | ५ | संस्थानचे नियमानूसार |
| १९ | श्री रवी राज नासेरी, डी,७०२, सिल्वर टॉवर, ठाकूर कॅाम्प्लेक्स, कांदीवली ईस्ट- मुंबई , ४०० १०१ मो. ०९८९२३०६१७३ | साई भजन संध्या | ८ ते १० | ६५०००/- + टॅक्स वेगळा |
| २० | श्री सुधीर बावकर , ११-ए, १२, साईबाबा नंगर, मुंबई पुणे रोड, कळवा(प) ठाणे- ४०० ६०५ | साई जिवनावरील प्रंसग व त्या प्रसंगानुरुप भजने गायन | ४५ | ६०,०००/- |
| २१ | किरण पारेख, कोपरगांव | साई भजन संध्या | ६ | ११,०००/- |
| २२ | मुकेश सक्सेना , ए-१, साई अपार्टमेंटस, ८३/१, गौतम नगर - नवी दिल्ली -११००४९ मो.नं. ०९८११०९१३०३ , ०९८९९२२००२४ | साई भजन संध्या | १४ | ११,०००/- |

उपरोक्त पैकी गुरुपोर्णिमा-२०१० चे उत्सवाचे तीन दिवसाचे कालावधीसाठी कलाकार / मानधनासह निश्चीती बाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.५९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२०१० मध्ये कीर्तनकार व कलाकारांचे खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात आले.**

**अ) - कीर्तन कार्यक्रम-.**

**कीर्तनकार ह.भ.प. मंदार गंगाधर व्यासबुवा , डोंबीवली**

| कीर्तनकाराचे नाव | वार | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| **ह.भ.प. मंदार गंगाधर व्यासबुवा , डोंबीवली** | **शनिवार** | **२४/०७/२०१०** | **दुपारी ४ ते ६** |
| | **रविवार** | **२५/०७/२०१०** | **दुपारी ४ ते ६** |
| | **सोमवार** | **२६/०७/२०१०** | **सकाळी १०.३०** |

**ब) - कलाकार कार्यक्रम**

| वार | दिनांक | वेळ | कार्यक्रम | कलाकाराचे नाव | बिदागी |
|---|---|---|---|---|---|
| **शनिवार** | **२४/०७/२०१०** | **रात्री ७.३० ते ९.३०** | **साई भजन संध्या** | **कैलास हरेकृष्ण दास नागपूर** | **१ रुपया, श्रीफळ** |
| | | **रात्रौ. ९.३० चे पुढे** | **साई भजन संध्या** | **श्रीमती वनिता बजाज दिल्ली** | **रु. ११ हजार** |
| **रविवार** | **२५/०७/२०१०** | **रात्री ७.३० ते ९.३०** | **भावगीते व भक्तीगीते गायन** | **स्वर संगम संगीत प्रसारक मंडळ, संगमनेर डॉ. वाघोलीकर** | **रु. ११ हजार** |
| | | **रात्रौ. ९.३० चे पुढे** | **गर्जा महाराष्ट्र माझा (विविध गीत गायन)** | **कलाविष्कार कलापथक ठाणे. विनोद नाखवा** | **रु.११ हजार** |
| **सोमवार** | **२६/०७/२०१०** | **रात्रौ ७.३० ते १०.००** | **साई भजन संध्या** | **किरण पारेख, कोपरगांव** | **रु. ११ हजार** |
| | | **रात्रौ. ९.३० चे पुढे** | **साई भजन संध्या** | **मुकेश सक्सेना दिल्ली** | **रु.११ हजार** |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.७९ डॉ.चेतना कुंतीलाल पटवा, आर.एम.ओ श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरहजेरीबाबत**

**प्रस्ताव-** डॉ. पटवा यांनी दि. १२/०९/२००९ रोजीच्या विनंती अर्जानुसार दि. १८/०९/२००९ ते दि. १६/१२/२००९ अखेर बाळतंपणाच्या रजेसाठी मागणी केली होती. त्यानुसार त्यांची दि. १८/०९/२००९ ते १६/१२/२००९ या कालावधीची ९० दिवसांची बाळतंपणाची रजा मंजुर करण्यात आलेली आहे.

सदरची रजा द मॅटरनिटी बेनिफिट ॲक्ट १९६१ व संस्थान सेवा नियमातील तरतुदीनुसार मंजुर करण्यात आलेली आहे. त्यानंतर डॉ. पटवा यांनी दि. १३/१२/२००९ रोजीच्या अर्जान्वये दि. १७/१२/२००९ ते दि.१६/०३/२०१० अखेर वाढीव ९० दिवस बाळतंपणाच्या रजेची मागणी केली. तथापि, बाळंतपणाचे कारणासाठी वाढीव रजा मंजुर करता येणार नाही. तरी सदरचे पत्र मिळताच दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे. अन्यथा तुमचे विरुध्द संस्थान सेवा नियमानुसार कार्यालयीन कारवाई करण्यात येईल. असे त्यांना कळविण्यात आले परंतु डॉ. पटवा या अद्यापपर्यंत कामावर हजर झालेल्या नाहीत.

डॉ. पटवा यांचा संस्थान सेवेतील पुर्व इतिहास बघता त्या संस्थानमध्ये दि. २१/०२/२००७ पासुन निवासी वैाकिय अधिकारी म्हणुन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कामावर हजर झालेल्या आहेत. त्यापुढे दि. १५/०५/२००७ रोजी डॉ. पटवा यांनी राजीनामा पत्र सादर केले होते. ते राजीनामा पत्र त्यांनी दि. २५/०५/२००७ रोजीच्या अर्जान्वये माघार घेतलेले आहे. डॉ. पटवा यांना दि. २१/०१/२००८ पासुन ८,०००-२७५-१३५०० या वेतन श्रेणीमध्ये वेतन अदा केले जात आहे. त्यांना दि. २१/०२/२००८ पासुन व्यवसाय रोध भत्ता अदा केला जात आहे. यावरुन असे दिसते की, डॉ. पटवा या संस्थान सेवेत राहु इच्छित नाहीत.

नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांना कामावर हजर होणेस संधी म्हणुन इकडिल जा. नं. एस एस एस / वशी- ७बी/४९००/२०१० दि. १९/०३/२०१० अन्वये रजिस्टर ए.डी.पोस्टद्वारे कळविण्यात आले होते की, दि. १३/१२/२००९ रोजीच्या रजा मागणी अर्जानुसार त्यांची दि. १७/१२/२००९ ते १६/०३/२०१० या कालावधीची विनावेतन रजा मंजुर करण्यात येत आहे. त्यांनी दि. १७/०३/२०१० पासुन पुर्ववत कामावर हजर व्हावे. तरी देखील त्या कामावर हजर झालेल्या नाहीत. त्यानंतर इकडील जा. नं. एसएसएस/वशी-७बी/६११३/२०१०. दि. २०/०४/२०१० व जा. नं. एसएसएस/वशी-७बी/६८९७/ २०१०. दि.०१/०५/२०१० अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवुन त्यांना कळविण्यात आले आहे की, कामावर हजर न झाल्यास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजुन त्यांचे नाव संस्थानचे हजेरीपटावरुन कमी करण्यात येईल. तरी देखील त्यांनी संस्थानचे पत्राची दखल न घेता त्या कामावर हजर झालेल्या नाहीत.

तरी डॉ. चेतना कुंतिलाल पटवा यांचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०० उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-(कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.८० श्री मिलींद लालचंद सोनवणे, ज्यु.कॅथलॅब टेक्नीशियन, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरीबाबत**

**प्रस्ताव-** जा. नं. एसएसएस/ वशी १/ ८७६/२०१०. दि. १८/०३/२०१० अन्वये श्री मिलींद लालचंद सोनवणे यांचेकडे त्यांचे शैक्षणीक प्रमाणपत्र व गुणपत्रिकेची प्रत्येकी दोन प्रतीत मागणी केली होती. त्यांनी अदयापपर्यंत मागणी केलेली कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यानंतर श्री सोनवणे दि. २५/०३/२०१० पासुन सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावर गैरहजर आहेत. इकडील जा. नं. एसएसएस/ वशी-७बी/ ६११२/२०१०. दि. २०/०४/२०१० अन्वये श्री सोनवणे यांना रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवुन कळविण्यात आले होते की, सात दिवसांचे आत कामावर हजर व्हावे किंवा गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर करावा. अन्यथा शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. परंतु त्यानंतर देखील श्री सोनवणे यांनी गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर केलेला नाही तसेच ते कामावर देखील हजर झालेले नाहीत. इकडील जा. नं. एसएसएस/ वशी-७बी/ ६९२१/२०१०. दि. ०३/०५/२०१० अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवुन त्यांना कळविणेत आले आहे की, पत्र मिळताच दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजुन तुमचे नावं संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. त्यानंतरही श्री सोनवणे यांनी लेखी खुलासा सादर केला नाही व कामावरही हजर झाले नाहीत. त्यानंतर पुन्हा इकडील जा. नं. एसएसएस/ वशी-७बी/ ७४२१ /२०१०. दि. २१/०५/२०१० अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवुन त्यांना कळविणेत आले आहे की, दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजुन तुमचे नावं संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. तरी देखील श्री सोनवणे कामावर हजर झाले नाहीत.

अशाप्रकारे त्यांना तीन वेळा संधी देवूनही ते कामावर हजर झाले नाहीत. यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे दिसते.

तरी श्री मिलींद लालचंद सोनवणे यांचे नांव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०१ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.८१** **संस्थान कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम आदा करणे तसेच संस्थान कर्मचारी गृहनिर्माण संस्था स्थापन करणेकामी संस्थानतर्फे मदत करणे.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन निर्णय क्र.वेपूर-१२०९/प्र.क्र.२०/सेवा-०९ मंत्रालय मुंबई दि.२७/०२/२००९ अन्वये शासनाकडील कर्मचा-यांना ०६ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०५/२००९ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ४६४ नुसार संस्थान कर्मचा-यांना ०६ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

त्यानुसार संस्थान कर्मचाऱ्यांना ०६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यात आल्याचा कार्यालयीन आदेश जा.नं.एसएसएस/२०४४/२००९ दि.२५/०६/२००९ चा पारीत करण्यात आलेला आहे. तथापी सदर आदेशात जानेवारी २००६ ते ३१ मे २००९ पर्यंतचा फरक आदा करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी असे नमूद केलेले आहे.

राज्य शासकिय कर्मचा-यांप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांनाही सहाव्या वेतन आयोगाची दि.०१ जानेवारी २००६ पासून दि.३१ मे २००९ अखेर ४१ महिन्यांची फरकाची रक्कम रोखीने मिळावी अशी विनंती श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना यांनी दि.२१/०६/२००९ व दि.२७/०७/२००९ चे अर्जाने तसेच श्री साईबाबा संस्थान राधाकृष्ण साईसिध्दी कर्मचारी युनियन,शिरडी यांनी संस्थानला केली आहे.

तसेच अध्यक्ष, शिलधी प्रतिष्ठान यांनी मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील सो मंत्री, बंदरे, परिवहन, विधी व न्याय महाराष्ट्र राज्य यांनाही निवेदन दिलेले आहे. त्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असे निर्देश आहेत.

दि.०१ जानेवारी २००६ ते ३० जून २००९ अखेर ४१ महिन्यांचे फरकाची रक्कम साधारणपणे रु.०८.५० कोटी होत आहे. सदर फरकाची रक्कम संस्थान कर्मचाऱ्यांना आदा करणेबाबत विचार होणेस विनंती.

श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना शिरडी यांनी मा.ना.राधाकृष्ण विखे साहेब मंत्री विधी व न्याय विभाग महाराष्ट्र राज्य यांना अग्रेशीत केलेल्या निवेदनात संस्थान कर्मचा-यांसाठी गृहनिर्माण संस्था स्थापन करणेस मोलाचे सहकार्य करुन आपले मार्गदर्शनाने संस्था स्थापन होणेबाबत विनंती केली आहे.

०१ जानेवारी १९९६ पासून संस्थान कर्मचाऱ्यांना ०५ वा वेतन आयोग मंजूर करण्यात आला होता. त्यावेळी सदर फरकाची त्यावेळी गृहनिर्माण संस्थेत ज्या कर्मचा-यांनी भाग घेतला होता त्यांना देण्यात आली होती व ती रक्कम त्यांनी संबंधीत गृहनिर्माण संस्थेकडे जमा केली व संबंधीत संस्थेने जागा खरेदी कामी सदर रक्कम उपयोगात आणली होती. सदर साईश्रध्दा गृहनिर्माण संस्थेत १२० कर्मचा-यांनी भाग घेतलेला आहे.

तसेच श्री साईप्रसाद भाडेकरु गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात आलेली असून सदर सस्थेमध्ये ५४ कर्मचा-यांचे रो -हाऊसेस आहेत.

उपरोक्त दोन्ही सोसायटीस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी कडून खालील प्रमाणे सहकार्य करण्यात आलेले आहे.

०१) सदर गृहनिर्माण संस्था स्थापनेच्या कालावधी मध्ये ज्या कर्मचाऱ्यांनी भाग घेतला होता त्यांच्या मान्यतेने त्यांना संस्थानकडून ०५ व्या वेतन आयोगाच्या फरकाच्या पोटी मिळणारी रक्कम संबंधीत गृहनिर्माण संस्थेकडे जमा केली होती.

०२) संबंधीत संस्थेच्या सभासदांनी घेतलेल्या कर्जाच्या एकुण व्याजाच्या ०६ टक्के पेक्षा अधिक व्याजाची रक्कम संस्थानमार्फत भरण्यात आलेली आहे. त्यानंतर संबंधीत संस्थेत भाग घेतलेले कर्मचारी व कर्मचारी यांनी वैयक्तीक घेतलेल्या गृहकर्जाच्या येणारे एकूण व्याजापैकी ५० टक्के व्याजाचा भरणा संस्थान करते.

०३) संबंधीत गृहतारण संस्थेस उपरोक्त गृहनिर्माण संस्थेमध्ये भाग घेतलेल्या कर्मचाऱ्यांना स्ट्रीट लाईट ( एम.एस.ई.बी. लाईट पुरवठा खंडीत झाल्यास संस्थान जनरेटरची लाईट चालू असते. ) , पाणी पुरवठा, रस्ता अशा सवलती संस्थान तर्फे देण्यात आलेल्या आहेत.

श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेने संस्थान कर्मचाऱ्यांकरीता गृह निर्माण संस्था स्थापन केल्यास त्यांना उपरोक्त प्रमाणे संस्थानकडून सहकार्य करता येईल.

संबंधीत नियोजित गृहनिर्माण संस्थेमध्ये भाग घेणा-या कर्मचाऱ्यांच्या फरकाची रक्कम त्यांना देऊन सदर फरकाची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांनी नियोजित संस्थेकडे जमा केल्यास नियोजित गृहनिर्माण संस्थेस जागा खरेदी कामी या रक्कमेचा उपयोग होईल तसेच ज्या संस्थान कर्मचाऱ्यांना स्वतःची घरकुले आहेत व ज्या कर्मचा-यांना नियोजित गृहनिर्माण संस्थेमध्ये भाग घ्यावयाचा नसेल त्यांना त्यांच्या फरकाची रक्कम रोखीने आदा करता येईल. तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार दि.०१.०१.२००६ पासून दि.३१.०५.२००९ अखेर पर्यंतचे कालावधीसाठी देय होणारी फरकाची रक्कम रोखीने आदा करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग/ मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.८२ श्री गबाजी सखाराम वराळ, कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) यांचा मुदतवाढ व मानधनवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री गबाजी सखाराम वराळ, कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) यांनी दि.२१/०५/२०१० रोजी अर्ज सादर करुन त्यात त्यांनी " मी माहे फेब्रुवारी २००६ पासून कंत्राटी पध्दतीने मोजणीदार म्हणून काम करीत आहे. मी गेल्या चार वर्षाच्या कालावधीत संस्थान मालकीचे मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील जमिनीचे नगर रचना कार्यालयास आवश्यक असणारे नकाशे तयार केलेले आहेत. तसेच भुसंपादनकामी आवश्यक असणारे नकाशे, मोजणी करणे इ. कामे पार पाडीत आहे. माझी मुदतवाढीची नेमणूक आदेश क्र.जा.नं.एसएसएस वशी ०१/२३६०/२००९ दि.१३/०७/२००९ अन्वये वाढविलेली मुदतवाढीची मुदत दि.१३/०६/२०१० रोजी संपत आहे. तरी मला एक वर्ष मुदतवाढ व मानधन रु.११०००/- मिळावे. " अशी विनंती केलेली आहे.

वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी " श्री वराळ यांचे कामाचे स्वरुप व सध्या भुसंपादन कक्षाकडे सुरु असणारे कामकाज पाहता मुदतवाढ देणेस हरकत नाही. मानधन व मुदतवाढीचे मुदतीबाबत मा. व्य.समितीचे निर्णयानुसार कार्यवाही ही विनंती. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री वराळ यांची जा.नं.एसएसएस वशी ०१/४५०४/२००६ दि.०३/०४/२००६ अन्वये संस्थानचे बांधकाम विभागाकडे कंत्राटी पध्दतीने मोजणीदार म्हणून मासिक एकत्रित मानधन रु.७०००/- नेमणूक करण्यात आलेली असून त्यांना वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांना मा.व्य.स.चे दि.२१/०६/२००९ सभेतीन निर्णयानुसार जा.नं.एसएसएस वशी ०१/२३६०/२००९ दि.१३/०७/२००९ अन्वये देण्यात आलेली एक वर्ष मुदतवाढ दि.१३/०६/२०१० रोजी संपुष्ठात येत आहे.

तरी **अ)** वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता पूर्वीच्याच अटी-शर्तीवर दि.१४/०६/ २०१० पासून एक वर्ष मुदतवाढ देणेबाबत आदेश होणेस विनंती.

**ब)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०६/२००९ रोजीचे सभेतील निर्णय व दि. १३/०७/२००९ रोजीच्या आदेशातील निर्णयानुसार श्री वराळ यांना प्रतिमहा रु.७०००/- ऐवजी रु.८०००/- मानधन देण्यात येत आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्री वराळ यांना मुदतवाढ तसेच मानधनवाढ द्यावी अगर कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गबाजी सखाराम वराळ, कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) यांना दि.१३/०६/२०१० पासून पूर्वीचेच अटी-शर्ती व मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**विषय नं.८३ दिलीप शंकरराव शेळके व आठ सहाय्यक शिक्षिका, श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेज,शिर्डी यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री. दिलीप शंकरराव शेळके व इतर आठ उमेदवार यांना रु.७२२५-११०५० या वेतनश्रेणीमध्ये दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी श्री साईबाबा ज्युनियर कॉलेज शिरडी कडे सहाय्यक शिक्षक यां पदावर तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली असुन त्यांचा सर्वसाधारण तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असल्याची तारीख | वैद्यकिय पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | ०५ | **०६** |
| ०१ | श्री. दिलीप शंकराव शेळके सहाय्यक शिक्षक (इंग्रजी) | एमए बी.एड (इंग्रजी ) | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |
| ०२. | श्रीमती स्वाती इंद्रभान कडू (नेहे) सहाय्यक शिक्षिका (वाणीज्य) | एम कॉम बी.एड | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |
| ०३. | श्री. प्रशांत दत्तात्रय गडकरी सहाय्यक शिक्षक (इंग्रजी) | एमए बी.एड (इंग्रजी ) | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |
| ०४. | श्रीमती सिमा दिलीप सोनवणे (जाधव) सहाय्यक शिक्षक (राज्यशास्त्र) | एमए बी.एड (राज्यशास्त्र ) | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |
| ०५. | श्रीमती वंदना रावसाहेब देशमुख सहाय्यक शिक्षक (भूगोल) | एमए बी.एड (भूगोल ) | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०६. | श्री. सुजीतकुमार अशोक दळवी सहाय्यक शिक्षक (वाणिज्य) | एम कॉम बी.एड | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |
| ०७. | श्रीमती सरिता सुदाम लावरे (गागरे) सहाय्यक शिक्षक (इतिहास) | एमए बी.एड (इतिहास) | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |
| ०८. | श्री. सुनिल पंढरीनाथ कांडेकर सहाय्यक शिक्षक (हिन्दी) | एमए बी.एड (हिन्दी) | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |
| ०९. | श्रीमती कांचन विकास चौधरी (झावरे) सहाय्यक शिक्षीका(मराठी) | एमए बी.एड (मराठी ) | १६/०६/२००८ | १५/०६/२०१० | दि.३०/०८/२००५ चे प्रमाणपत्रनुसार पात्र |

उपरोक्त अ.नं. ०१ ते ०९ वरील सहाय्यक शिक्षक यांचे काम समाधानकारक असून त्यांना संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.असे अभिप्राय प्रभारी प्राचार्य श्री साईबाबा ज्यु.कॉलेज शिरडी व प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेले आहेत.

दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स,कंडीशन्स ऑफ सर्व्हीस रेग्युलेशन ॲक्ट, १९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ मध्ये कायम करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**CERTAIN OBLIGATIONS OF MANAGEMENT OF PRIVATE SCHOOL.**

(2) Every person appointed to fill a permanent vacancy shall be on probation for a period of two years. Subject to the provisions of sub sections on (3) & (4) he shall,on completion of this probation period of two years,be deemed to have been confirmed.

(3) if in the opinion of the Management, the work or behaviour of any probationer during the period of his probation,is not satisfactory, the Managment may terminate his services at any time during the said period after giving him one month's notice (or salary of one month in lieu of notice.)

उपरोक्त नियमातील तरतूद व प्रभारी प्राचार्य, श्री साईबाबा ज्यु.कॉलेज,शिरडी व प्रशासकीय अधिकारी ( श्री साईबाबा ज्यु.कॉलेज) यांचे अभिप्राय विचारात घेता,उपरोक्त अ.नं. ०१ ते ०९ वरील सहाय्यक शिक्षक /शिक्षीका यांना वेतन बॅंड रु. ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन रु.४६००/- मध्ये त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या (कॉलम नं.०५) तारखेच्या लगतच्या तारखेपासून संस्थान सेवेत कायम करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स,कंडीशन्स ऑफ सर्व्हीस रेग्युलेशन ॲक्ट,१९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ नियमातील तरतूद व प्रभारी प्राचार्य, श्री साईबाबा ज्यु.कॉलेज,शिरडी व प्रशासकीय अधिकारी ( श्री साईबाबा ज्यु.कॉलेज) यांचे अभिप्राय विचारात घेता, उपरोक्त अ.नं. ०१ ते ०९ वरील सहाय्यक शिक्षक /शिक्षीका यांना वेतन बॅंड रु. ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन रु.४६००/- मध्ये त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या (कॉलम नं.०५) तारखेच्या लगतच्या तारखेपासून संस्थान सेवेत कायम करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.८४** **डॉ.शितल उंडे, ज्युनिअर डेंटीस्ट याना डेंटीस्ट हे पदनाम देऊन त्या पदाची वेतनश्रेणी देणे बाबत**

**प्रस्ताव-** डॉ.शितल ज्ञानेश्वर ऊंडे, ज्यु. डेन्टीस्ट, श्री साईनाथ रुग्णालय ( प्रत्यक्ष काम श्री साईबाबा हॉस्पीटल) यांनी दि.१२/११/२००९ रोजी विनंती अर्ज सादर करुन त्यात "माहे नोव्हेबर -२००६ पासून ज्युनियर डेन्टीस्ट या पदावर श्री साईबाबा हॉस्पीटलकडे दंत विभागात कार्यरत असून मला वेतनश्रेणी मिळालेली नाही. तरी मला वेतनश्रेणी मिळावी " अशी विनंती केली आहे.

वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल,शिरडी यांनी त्यांचे दि.१७/११/२००९ रोजीचे टिपणीत "डॉ. शितल ऊंडे यांची माहे नोव्हेंबर २००६ पासून ज्यु. डेन्टीस्ट या पदावर नेमणूंक करण्यात आलेली आहे. तथापी श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलचे मंजूर आकृतीबंधात ज्यु. डेंन्टीस्ट हे पद मंजूर नाही. त्यांची शैक्षणिक पात्रता बी.डी.एस. अशी आहे. त्यांना वेतनश्रेणी देणेबाबत नियमाप्रमाणे विचार व्हावा. असे नमूद केलेले आहे. "

०१. डॉ. शितल ऊंडे, यांची श्री साईनाथ हॉस्पीटल विभागाकडे, ज्यु. डेंन्टीस्ट या पदावर नेमणूंक करण्यात आलेली असून त्या प्रत्यक्ष श्री साईबाबा हॉस्पीटल कडे काम पहात आहेत. त्यांना सध्या सर्व मिळून दरमहा एकत्रित वेतन रु. १५,०००/- देण्यात येत आहे. त्यांच्या नेमणूकीस मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०१/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८ नुसार मान्यता मिळालेली आहे.

०२. श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलचे मंजूर आकृतीबंधात ज्यु. डेंन्टीस्ट हे पद नाही.

०३. आकृतीबंधामध्ये वेतनबॅंन्ड रु.९३००-३४८०० ची श्री साईबाबा हॉस्पीटलचे आस्थापनेवर डेंन्टीस्टची दोन पदे मंजूर असून सदरची दोन्ही पदे भरलेली आहेत. श्री साईनाथ रुग्णालयात डेंन्टीस्ट ची दोन पदे मंजूर असून एक पद रिक्त आहे.

संस्थान कर्मचा-यांच्या आकृतीबंधास दि.०७ ऑगष्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे.

डॉ. शितल ऊंडे यांची नोव्हेंबर-२००६ पासून ज्यु. डेंन्टीस्ट या पदावर झालेली सेवा, डेन्टीस्ट या पदासाठी आवश्यक असलेली बीडीएस ही शैक्षणिक पात्रता त्यांचेकडे आहे. वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिलेले अभिप्राय विचारात घेऊन, श्री साईनाथ हॉस्पीटलकडे ' डेन्टीस्ट ' या रिक्त पदावर वेतन बॅड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५४०० + अनुज्ञेय भत्ते देऊन डॉ. शितल ऊंडे, यांना नेमणूक देणेबाबत दि.०६/०३/२०१० रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्र. ३२६:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात डेंटीस्ट या पदावरकाम करत असलेल्या वैद्यकिय अधिका-यांपुढे दररोज किती पेशंटची तपासणी केली याबाबत सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावी असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल या दोन्ही हॉस्पीटल मधील दंतरोग विभागामध्ये प्रतिदिनी, प्रति डॉक्टर किंती दंतरोग पेंशटची तपासणी केलेली आहे. या बाबत तपशील खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

| अ.नं. | हॉस्पीटलचे नांव | दंतरोग तज्ञाची संख्या | माहे एप्रिल-२००९ ते मार्च-२०१० या कालावधीतील दंतरोग **पेशंटस्ची एकूण संख्या** | माहे एप्रिल-९ ते मार्च-१० या कालावधीतील **प्रती माह दंतरोग पेशंटस्ची सरासरी संख्या** | माहे एप्रिल-९ ते मार्च-१० या कालावधीतील दंतरोग पेशंटस्ची **दैंनंदिन सरासरी संख्या** | माहे एप्रिल-९ ते मार्च-१० या कालावधीतील **प्रतीदिनी, प्रती डॉक्टर दंतरोग पेशंटस्ची सरासरी संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईनाथ | दंतरोग तज्ञ-२ | ७१२१ | ५९३ | २३ | ११ |
| ०२ | श्री साईबाबा हॉस्पीटल | मॅ.फे. सर्जन-०१<br>दंतरोग तज्ञ -०२<br>एकूण - ०३ | ३५१३ | २९३ | ११ | ०४ |

उपरोक्तप्रमाणे दोनही हॉस्पीटलमधील दंतरोग विभागाकडील वार्षीक,मासिक, प्रती वैद्यकिय अधिका-यांनी प्रतीदिनी तपासणी केलेले दंतरोग आऊटडोअर पेशंटस् (O P D) संख्येचा तपशील सादर केला आहे.

तरी डॉ.शितल उंडे यांना ' डेन्टीस्ट ' या पदावर नेमणूंक व त्या पदासाठी वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५४०० + अनुज्ञेय भत्ते देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.शितल उंडे यांना त्यांचे नेमणूकीचा कालावधी संपलेचे तारखेपासून म्हणजे दि.२८.११.२००९ पासून दि.०४.०७.२०१० पर्यंत 'ज्यु. डेन्टीस्ट' या पदावर सद्या आहे त्याच अटी-शर्तीवर व रु.१५,०००/- मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच दि.०५.०७.२०१० पासून श्री साईनाथ रुग्णालयात रिक्त असलेल्या 'डेन्टीस्ट' या पदावर सदर पदासाठी देय असलेल्या वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५४०० + अनुज्ञेय भत्ते यावर नेमणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं. ८५ मयत अनुकंपा तत्वावरील वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे व वेतन बॅण्ड देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रीमती शशीकला नानासाहेब डांगे, कु. वैशाली विलास कोते, श्री साईप्रसाद साहेबराव वाघ, यांची प्रसादालय विभागाकडे, श्रीमती प्रियंका सुभाष वर्मा यांची श्री साईनाथ हॉस्पीटलकडे, श्री.सचिन अशोक गिते यांची कॅन्टीन विभागाकडे, श्री. श्रीगणेश शिवकुमार बोलशेट्टी यांची साईप्रसाद निवासस्थानकडे, श्रीमती उषा सुरेश शिंगाडे यांची आरोग्य विभागाकडे श्री साईदास निवृत्ती शिंदे यांची औ.प्र.संस्थेकडे श्री.उपेंद्र तुकाराम पाठक मदतनीस (वर्ग-४ चे कर्मचारी) या पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी सर्व मिळून दरमहा रु.२०००/- (रु. दोन हजार मात्र) चे नियत वेतनावर नेमणूक करण्यात आलेली आहे.त्यानुसार ते कामावर हजर झाले असून त्यांचा एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी सपंल्यानंतर त्यांना सध्या दरमहा रु.२५००/- नियत वेतन आदा करण्यात येत आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | वैद्यकिय पात्रता | संस्थान सेवेत कायम करणेची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती शशीकला नानासाहेब डांगे<br>वर्ग-४ कर्मचारी , प्रसादालय | ०७ वी पास | १७/०६/०८ | १६/०६/१० | २२/०७/०८ चे प्रमाणपत्रानुसार पात्र | १७/०६/१० |
| ०२ | कु. वैशाली विलास कोते<br>वर्ग-४ कर्मचारी , प्रसादालय | १० वी पास | १७/०६/०८ | १६/०६/१० | २२/०७/०८ चे प्रमाणपत्रानुसार पात्र | १७/०६/१० |
| ०३ | श्री साईप्रसाद सा. वाघ<br>वर्ग-४ कर्मचारी प्रसादालय | ३ री पास | १७/०६/०८ | १६/०६/१० | २१/०७/०८ चे प्रमाणपत्रानुसार पात्र | १७/०६/१० |
| ०४ | श्रीमती प्रियंका सु.वर्मा<br>वर्ग-०४ कर्मचारी श्री सा. हॉस्पीटल | ०९ वी पास | २१/०६/०८ | २०/०६/१० | ०७/०७/०८ चे प्रमाणपत्रानुसार पात्र | २०/०६/१० |
| ०५ | श्री. सचिन अ. गिते | ११ वी | १७/०६/०८ | १६/०६/१० | ०१/०७/०८ चे | १७/०६/१० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ग-४ कर्मचारी कॅन्टीन विभाग | पास | | | प्रमाणपत्रानुसार पात्र | |
| ०६ | श्री. श्रीगणेश शि. बोलशेट्टी वर्ग-४ कर्मचारी साईप्रसाद भक्तनिवास | १२ वी पास | २३/०६/०८ | २२/०६/१० | ०९/०७/०८ चे प्रमाणपत्रानुसार पात्र | २३/०६/१० |
| ०७ | श्रीमती उषा सु. शिंगाडे वर्ग-४ कर्मचारी आरोग्य विभाग | ०९ वी पास | १८/०६/०८ | १७/०६/१० | ०९/०७/०८ चे प्रमाणपत्रानुसार पात्र | १८/०६/१० |
| ०८ | श्री साईदास नि. शिंदे वर्ग-४ कर्मचारी आय.टी.आय | ८ वी पास | २१/०६/०८ | २०/०६/१० | १२/०५/१० चे प्रमाणपत्रानुसार पात्र | २१/०६/१० |
| ०९ | श्री. उपेंद्र तुकाराम पाठक वर्ग-०४ कर्मचारी मंदिर विभाग | १० वी पास | १९/०६/०८ | १८/०६/२०१० | २१/०५/२०१० चे प्रमाणपत्रानुसार पात्र | १९/०६/१० |

उपरोक्त अ.नं. ०१ ते ०९ वरील वरील वर्ग-४ कर्मचारी यांचे काम व वर्तणूक चांगली आहे ते हुकमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतेही प्रकरण चालू किंवा प्रस्तावित नाही. त्यांना वेतनश्रेणी देऊन सेवेत कायम करणेस हरकत नाही. असे अभिप्राय संबंधीत अधिक्षक /विभाग प्रमुख यांनी दिले आहेत.

उपरोक्त अ.नं. ०१ ते ०९ वरील वर्ग-४ कर्मचारी यांचे बाबत संबंधीत अधिक्षक/विभाग प्रमुख यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपासून (कॉलम नं.७) वेतन बॅड रु.४४४०-७४४० + गेडवेतन रु.१३००/- देऊन,संस्थान सेवेत कायम करणेबाबतचे प्रस्तावावर विचार होणेस विनंती

**निर्णय क्र.६०६ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे उपरोक्त अ.नं. ०१ ते ०९ वरील वर्ग-४ कर्मचारी यांचे बाबत संबंधीत अधिक्षक/विभाग प्रमुख यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपासून वेतन बॅड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देऊन,संस्थान सेवेत कायम करण्यात यावे असें ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ श्री साईलीला नियतकालीक अंकाचे पाकिटे छपाई कामाचे दरपत्रक उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संस्थान प्रकाशित श्री साईलीला नियतकालीक अंकाचे पाकिटे छपाईकामी मुंबई येथील १३ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/७६३४ दि.०५.०६.२०१० अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.२१.०६.२०१० अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

श्री साईलीला नियतकालीक अंकाचे पाकिटे छपाई कामाचे दरपत्रक १३ निवडक प्रेसधारकांपैकी दि. २१.०६.२०१० रोजी १) मे.मेग्ना ग्राफिक्स ( इंडीया ) लिमिटेड,मुंबई २) मे.उचिता ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई ही ०२ दरपत्रके मुदतीत तर दि. २३.०६.२०१० रोजी १) मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई या प्रेसधारकांचे दरपत्रकमुदतीनंतर सीलबंद दरपत्रके प्राप्त झाले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.मेग्ना ग्राफिक्स ( इंडीया ) लिमिटेड,मुंबई |
| ०२ | मे.उचिता ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई |
| ०३ | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई |

श्री साईलीला नियतकालीकअंकाचे पाकिटे छपाई कामी कमीत कमी ३ दरपत्रके आवश्यक आहे. मुदतीत २ दरपत्रके प्राप्त झाल्याने निर्णय घेणे योग्य नाही. त्यामुळे मुदतीनंतर मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई यांचे सीलबंद दरपत्रक विचारात घेऊन याप्रमाणे एकूण ३ निवडक प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके उघडून निर्णय घ्यावा असे वाटते.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले तीन दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | श्रीसाईलीला मराठी अंक पाकीटे छपाई संख्या ८०,००० | श्रीसाईलीला हिंदी-इंग्रजी अंक पाकीटे छपाई संख्या १,२०,००० |
|---|---|---|---|
| ०१ | मे.मेग्ना ग्राफिक्स ( इंडीया ) लिमिटेड,मुंबई | ०.९० पैसे | ०.८९ पैसे |
| ०२ | मे.उचिता ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई | ०.८९ पैसे | ०.८४ पैसे |
| ०३ | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई | ०.८५ पैसे | ०.८० पैसे |

**निर्णय क्र.६०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईलीला द्वैमासिक मराठी व हिंदी-इंग्रजी अंक छपाई कामाचे दरपत्रके उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संस्थान प्रकाशित श्री साईलीला अंक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाईकामी मुंबई येथील १० निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/६९५१/दि.०४.०५.२०१० अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.२८.०५.२००९ अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

श्री साईलीला द्वैमासिक गुजराथी अंक छपाई कामाचे दरपत्रक १० निवडक प्रेसधारकांपैकी दि. २८.०५.२०१० रोजी १) मे.मेग्ना ग्राफिक्स (इंडीया) लिमिटेड,मुंबई २) मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई ही ०२ दरपत्रके मुदतीत तर दि. २९.०५.२०१० रोजी १) मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई २) न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस,मुंबई तसेच दि. ३१.०५.२०१० रोजी ३) ऑस्कर ऑफसेट प्रा.लि.मुंबई ही ०३ प्रेसधारकांची दरपत्रके मुदतीनंतर सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली आहेत.असे एकूण खालीलप्रमाणे ५ दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.मेग्ना ग्राफिक्स ( इंडीया ) लिमिटेड,मुंबई |
| ०२ | मे.मदर्स् ग्राफिक्स (इंडिया) प्रा.लि., मुंबई |
| ०३ | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई |
| ०४ | न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस,मुंबई |
| ०५ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |

श्री साईलीला द्वैमासिक गुजराथी अंक छपाई कामी कमीत कमी ३ दरपत्रके आवश्यक आहे. मुदतीत २ दरपत्रके प्राप्त झाल्याने निर्णय घेणे योग्य नाही. त्यामुळे मुदतीनंतर १) मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई २) न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस,मुंबई ३) ऑस्कर ऑफसेट प्रा.लि.मुंबई यांचे ०३ सीलबंद दरपत्रके विचारात घेऊन याप्रमाणे एकूण ५ निवडक प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके उघडून निर्णय घ्यावा असे वाटते.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले पाच दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | श्रीसाईलीला द्वैमासिक मराठी | श्रीसाईलीला द्वैमासिक हिंदी- इंग्रजी | श्रीसाईलीला दसरा विशेषांक मराठी | श्रीसाईलीला दसरा विशेषांक हिंदी- इंग्रजी |
|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या- | ६०,००० | ८५,००० | १२,००० | १७,००० |
| ०१ | मे.मेग्ना ग्राफिक्स ( इंडीया ) लिमिटेड,मुंबई | १०.२५ | ९.५० | १७.५० | १६.०० |
| ०२ | मे.मदर्स् ग्राफिक्स (इंडिया) प्रा.लि., मुंबई | १०.३५ | ९.२० | १७.०९ | १६.०० |
| ०३ | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई | **१०.२३** | **९.१८** | **१७.०८** | **१५.९८** |
| ०४ | न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस,मुंबई | १३.३५ | १२.४० | २२.८० | २१.२० |
| ०५ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | १२.५० | ११.९० | २१.६५ | २०.२८ |

**निर्णय क्र.६०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई यांचे अधोरेखीत निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **पुस्तके व फोटोंचे पुनर्मुद्रण करणेकामीचे दरपत्रक उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संस्थान प्रकाशित खालील पुस्तके व फोटोंचे पुनर्मुद्रण करणे कामी प्रकाशने दि.१.५.२०१० चे मंजूर प्रस्तावाने व मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१८.०४.२०१० चे सभेतील निर्णय.४०४ व ४४५ अनव्ये मंजूरी मिळालेली आहे.

**अ) पुस्तके छपाई कामाचे परिशिष्ट**

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | भाषा | छपाई संख्या | अंदाजे छपाई दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईसच्च चरित २८ वी आवृत्ती | मराठी | ३०,००० | ६५.०० | १९५०००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | श्री साईसत् चरित्र २१ वी आवृत्ती | तेलगू | १,००,००० | ४०.०० | ४०००००० |
| ०३ | श्री साईसतचरित्र १५ वी आवृत्ती | तामिळ | ४०,००० | ४०.०० | १६००००० |
| ०४ | श्री साईसतचरित तेलगू पोथी ५ वी आवृत्ती | तेलगू | १०००० | ७०.०० | ७००००० |
| ०५ | तेलगू पुजाविधी (आरती) १४ वी आवृत्ती | तेलगू | २५००० | ०८.०० | २००००० |
| ०६ | मुलांचे बाबा १३ वी आवृत्ती | इंग्रजी | १०,००० | ५.०० | ५०००० |
| ०७ | मुलांचे बाबा ३ री आवृत्ती | कन्नड | ५,००० | ५.०० | २५००० |
| ०८ | श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना ५० वी आवृत्ती | मराठी | १,००००० | ०५.०० | ५००००० |
| ०९ | श्री साई स्तवन मंजरी ३१ वी आवृत्ती | मराठी | १,००,००० | ३.०० | ३००००० |
| १० | श्री साईस्तवन मंजरी ०७ वी आवृत्ती | इंग्रजी | १५००० | ३.०० | ४५००० |
| ११ | सांई की ओर मेरा पहला कदम आ.क्र.१ | हिंदी/इंग्रजी | ५००० | १०० | ५००००० |
| १२ | गुरुपाठाचे अभग २ री आवृत्ती | मराठी | ५००० | ०४.०० | २०००० |
| १३ | श्री साईस्तवन मंजरी २९ वी आवृत्ती | तेलगू | ५००० | ५.०० | २५००० |
| | | | | | **एकूण रक्कम रुपये** | **९९,१५,०००/-** |

**ब) फोटो छपाई कामाचे परिशिष्ट**

| अ.नं. | फोटोचे नांव | साईज | छपाई संख्या | अंदाजे दर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | द्वारकामाईत बसलेले बाबा चार रंगात | १४" x२०" | १,००,००० | ३.०० | ३,००,०००/- |
| ०२ | दगडावर बसलेले बाबा चार रंगात | २०" x२८" | १,००,००० | ६.०० | ६,००,०००/- |
| | | | | **एकूण रुपये** | **९,००,०००/-** |

पुस्तके व फोटोंचे पुनर्मुद्रण करणे कामी २३ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/७७४६ दि.१०.०६.२०१० अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.३०.०६.२०१० अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार दि. ३०.०६.२०१० रोजी खालील १३ प्रेसधारकांची दरपत्रके मुदतीत सीलबंद दरपत्रके प्राप्त झाले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकांचे नांव | अ.नं. | प्रेसधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | ०८ | मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई |
| ०२ | मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई | ०९ | मे.प्रेमिअर प्रेस,सिंकदाबाद |
| ०३ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे | १० | मे.शिवम ऑफसेट ,कोल्हापूर |
| ०४ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | ११ | मे.ओरिएंट प्रेस लि.,मुंबई |
| ०५ | मे.सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई | १२ | मे.लाव्हीश प्रिंटर्स,मुंबई |
| ०६ | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई. | १३ | मे.प्रेमिअर प्रेस,कोल्हापूर |
| ०७ | मे.कल्याणी कार्पोरेशन,पुणे | | |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले १३ निवडक प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यासमोर आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

**(०१) पुस्तके-अ**

| अ.नं | प्रेसधारकाचे नाव | श्री साईसच्च चरित मराठी पोथी | श्री साईसत् चरित्र तेलगु | श्री साईसत चरित्र तामिट | श्री साईसत चरित तेलगू पोथी | तेलगू पुजाविधी (आरती) | चिल्ड्रेन्स श्री साईबाबा इंग्रजी | मुलांचे साईबाबा कन्नड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | ३०,००० नग | १,००,००० नग | ४०,०० ०० नग | १०,००० नग | २५,००० नग | १०,००० नग | ५,००० नग |
| ०१ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | ७६.३२ | ३७.३० | ४५.२१ | ९८.०० | --- | --- | --- |
| ०२ | मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई | ७७.१५ | ४०.७५ | ४५.२० | ७९.६५ | ८.१५ | ६.०० | ७.७० |
| ०३ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे | ७६.१५ | ३९.८५ | ४३.८२ | ७८.०९ | १०.०२ | ५.५१ | ६.२५ |
| ०४ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | ७२.८३ | ३७.७४ | ४१.५८ | ७६.६० | ८.६० | ७.१८ | --- |
| ०५ | मे.सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई | १०७.७५ | ५५.७० | ५८.०० | ११३.८० | ११.९५ | ७.८५ | १०.०० |
| ०६ | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई. | १९२.१५ | ६९.३० | ८७.१५ | १४५.९५ | ११.०५ | ९.०० | १०.५० |
| ०७ | मे.कल्याणी कार्पोरेशन,पुणे | ८९.०० | ४१.२२ | ४७.३५ | ९४.२५ | ९.९० | ५.४० | ८.२५ |
| ०८ | मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई | **७२.२८** | **३३.७०** | **४०.७६** | **७४.७२** | ७.४९ | **४.९६** | ६.२४ |
| ०९ | मे.प्रेमिअर प्रेस,सिंकदाबाद | १२०.०० | ३३.७५ | ५२.०० | १४६.०० | **६.७५** | ५.०० | **६.००** |
| १० | मे.शिवम ऑफसेट ,कोल्हापूर | ८६.०० | ४७.७० | ५४.०० | ९५.०० | ११.०० | ९.०० | १०.०० |
| ११ | मे.ओरिएंट प्रेस लि.,मुंबई | ८२.५० | ४४.०० | ४८.०० | ८८.०० | १०.५० | ८.०० | ७.८० |
| १२ | मे.लाव्हीश प्रिंटर्स,मुंबई | १३२.८२ | ६६.४१ | ७८.४८ | १४२.४८ | १२.३७ | ८.८१ | १०.६८ |
| १३ | मे.प्रेमिअर प्रेस,कोल्हापूर | ९५.०० | ५२.०० | ५७.०० | ९७.०० | ९.०० | ६.५० | ५.५० |

**(०१) पुस्तके-ब**

| अ.नं | प्रेसधारकाचे नाव | श्रीसाईनाथ सगुणोपासना मराठी | श्रीसाईनाथ स्तवन मंजरी मराठी | श्रीसाईनाथ स्तवन मंजरी इंग्रजी | सांई की ओर मेरा पहला कदम हिन्दी/इंग्रजी | गुरुपाठाचे अभग मराठी | श्रीसाईनाथ स्तवन मंजरी तेलगु |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | छपाई संख्या | १ लाख नग | १ लाख नग | १५ हजार नग | ५ हजार नग | ५ हजार नग | ५ हजार नग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | ५.०० | --- | --- | --- | --- | --- |
| ०२ | मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई | ३.५० | १.७५ | २.७० | ६६.१० | २.९५ | ३.९५ |
| ०३ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे | ४.८५ | **१.७५** | २.९७ | --- | -- | **३.२७** |
| ०४ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | ४.८२ | २.०५ | ३.२६ | ५३.५० | --- | -- |
| ०५ | मे.सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई | ५.२५ | २.५० | ४.०० | ९९.५० | ३.३६ | ४.८२ |
| ०६ | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई. | ४.७५ | ३.२८ | ४.२० | --- | ३.७३ | ५.८३ |
| ०७ | मे.कल्याणी कार्पोरेशन,पुणे | **२.९०** | ३.५० | ५.२५ | ११८.५० | २.९० | ६.०० |
| ०८ | मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई | --- | ३.५८ | ४.६७ | --- | **२.८५** | ३.८६ |
| ०९ | मे.प्रेमिअर प्रेस,सिंकदाबाद | ३.०० | २.५० | ४.०० | ६६.०० | ३.०० | ५.०० |
| १० | मे.शिवम ऑफसेट ,कोल्हापूर | ५.२५ | २.२५ | **२.७०** | **५१.००** | ३.०० | ६.०० |
| ११ | मे.ओरिएंट प्रेस लि.,मुंबई | ७.०० | ४.५० | ४.७५ | ९२.०० | ४.५० | ६.०० |
| १२ | मे.लाव्हीश प्रिंटर्स,मुंबई | ६.६४ | ३.१९ | ५.१३ | ९७.२० | ३.९८ | ६.९४ |
| १३ | मे.प्रेमिअर प्रेस,कोल्हापूर | ३.२५ | २.७५ | ३.५० | ९५.०० | ३.५० | ४.७५ |

**०२ फोटो-**

| अ.नं | प्रेसधारकाचे नाव | द्वारकामाईत बसलेले बाबा चार रंगात १४" x २० | दगडावर बसलेले बाबा चार रंगात २०" x २८ |
|---|---|---|---|
| | छपाई संख्या | १ लाख नग | १ लाख नग |
| ०१ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | ३.०० | ६.०० |
| ०२ | मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई | ३.२० | ६.८२ |
| ०३ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे | --- | --- |
| ०४ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | २.९० | ६.१४ |
| ०५ | मे.सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई | ४.६६ | ९.१३ |
| ०६ | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई. | ३.५९ | ६.८६ |
| ०७ | मे.कल्याणी कार्पोरेशन,पुणे | ४.३० | ५.९० |
| ०८ | मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई | **२.७०** | **५.७०** |
| ०९ | मे.प्रेमिअर प्रेस,सिंकदाबाद | २.७५ | ५.७५ |
| १० | मे.शिवम ऑफसेट ,कोल्हापूर | ३.९० | ७.८० |
| ११ | मे.ओरिएंट प्रेस लि.,मुंबई | ३.५० | ७.०० |
| १२ | मे.लाव्हीश प्रिंटर्स,मुंबई | ५.०१ | ९.०५ |
| १३ | मे.प्रेमिअर प्रेस,कोल्हापूर | ४.२५ | ७.५० |

**निर्णय क्र.६०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पुस्तके व फोटो खरेदीकामी उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत दर मान्य करण्यात येऊन मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई या प्रेसधारकास कार्यादेश देण्यात यावेत, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने)

---------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्रीसाईबाबांचे मिरवणूकीसाठी नक्षीदार चंदनाची पालखी स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त श्री सुरेश वाधवा, वाशी, नवी मुंबई यांनी दि.२६/०६/२०१० रोजीचे पत्राने श्री साईबाबांच्या चरणी चंदनाच्या लाकडाची नक्षीदार पालखी देणगी दाखल देणे बाबतची इच्छा प्रदर्शित केलेली असून यासाठी होणारा सर्व खर्च ते स्वत: देणगी दाखल करणेस तयार आहेत. तरी सदरची चंदनाचे लाकडाची नक्षीदार पालखी आपण स्विकारावी याबाबत त्यांनी विनंती केलेली असून पालखी तयार करणेसाठी परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान मार्फत श्रींचे प्रमुख तीन उत्सव व इतर स्थानिक उत्सव साजरे केले जातात. उत्सवाचे प्रथम दिनी श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक काढली जाते. तसेच प्रत्येक गुरुवारी रात्री ०९.१५ वाजता श्रींचे फोटो व पादुकांची मिरवणूक समाधी मंदिरातून द्वारकामाईत व द्वारकामाईतून चावडीकडे पालखीची शोभायात्रा काढली जाते. हजारो भाविक या सोहळ्यासाठी उपस्थित असतात.

सध्या संस्थानकडे दोन सागवानी लाकडी पालख्या असून एक पालखील चांदीचा नक्षीदार पत्रा बसविण्यात आलेला आहे. ती सध्या वापरात असून ती १८ ते १९ वर्षापासुनची आहे. सदर पालखी गुजरातचे साईभक्ताने बनविलेली आहे. एक पालखी श्रींचे वस्तू संग्रहाल्यात ठेवण्यात आलेली आहे, ती बाबांचे वेळेची पालखी आहे. ती पालखी वापरुन वापरुन खिळखिळी झालेली आहे. आता ती वस्तू संग्रहालयात साईभक्तांच्या दर्शनार्थ ठेवलेली आहे. तर दुसरी चांदीचा नक्षीदार पत्रा बसविलेली पालखी मिरवणूकीसाठी वापरली जाते. सध्या मिरवणूकीसाठी वापरात असलेली सागवानी लाकडी पालखी मोठी व वजनाने जास्त जड आहे. ज्यावेळी गावातून मिरवणूक असते त्यावेळी पालखी उचलणारे चोपदार, सेवेकरी पुजारी यांना त्याचा जास्त त्रास होतो.

तरी श्री सुरेश वाधवा हे देणगी दाखल देत असलेली चंदनाची लाकडी पालखी स्विकारावी असे नम्र मत आहे. जेणेकरुन मिरवणूकीचे वेळी सहजासहजी पालखी मिरविता येईल असे वाटते. श्री सुरेश

वाधवा यांनी पालखीचे डिझाईन बाबतचे आराखडा सोबत जोडलेला आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ६१० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सुरेश वाधवा,वाशी,नवी मुंबई यांनी श्रीसाईबाबांचे चरणी देणगी दाखल देऊ केलेली चंदनाचे लाकडाची नक्षीदार पालखी स्विकारणेत यावी,असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र. ६११ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(०१)** संस्थानचे प्रसादालय व विविध विभागात ठेकदारी कर्मचारी नेमणेऐवजी प्रायोगिक तत्वावर सेवेकरी नेमण्यात यावेत. (कार्यवाही-कामगार अधिकारी/अधिक्षक, प्रसादालय)

**(०२)** श्रीसाईबाबा हॉस्पिटल व भक्तनिवासस्थान येथे सध्या वापरात असलेल्या एकूण ०७ लिफ्ट वारंवार नादुरुस्त होत असल्याने सदरच्या लिफ्ट ओटीस कंपनीस बायबॅक देऊन नवीन ओटीस कंपनीच्या स्वंयचलित लिफ्ट बसविण्यात याव्यात. (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

**(०३)** व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्र.२७६ अन्वये श्रीसाई प्रसादालयाकरिता LED डिस्प्ले बोर्ड बसविण्यात यावेत व ते योग्य वाटल्यास मंदीर परिसराकरिता LED डिस्प्ले बोर्ड बसविणेबाबत निर्णय घेण्यात यावा असे ठरले होते. सध्या प्रसादालयाकरिता LED डिस्प्ले बोर्ड बसविण्यात आलेले असून ते योग्य असल्याने प्रसादालयाकरिता LED डिस्प्ले बोर्ड पुरवठादारांकडून त्यांनी दिनांक ६.०३.२०१० चे सभेच्या वेळी नमूद केलेल्या दरानूसार मंदीर परिसराचा LED डिस्प्ले बोर्ड घेण्यात यावा. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**(०४)** श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना तूर्त ०६ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/बांधकाम विभाग प्रमुख)

**(०५)** नगर-मनमाड या राजमार्गावरीत दुभाजकाचे सुशोभिकरण (१०२५ मी.लांब व १.४ मी.रुंदी) संस्थानमार्फत करण्यात येते. त्यामधील ५०० मीटर लांबीचे डिव्हायडर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.०५.२०१० रोजीचे सभेत श्री.हरिषचंद्र एकनाथ फापाळे, धुळे यांना त्यांचे रु.९९,९९९/- न्युनतम दर स्विकारुन देण्यात आलेले होते. त्यानुसार उर्वरित दुभाजक सुशोभिकरण संकेत नर्सरी, (श्री.आनंद काले) यांच्याकडून त्याच दरात करुन घेण्यात यावे व संरक्षणासाठी बसविण्यात येणाऱ्या ग्रीलसाठी जादा लागणारा खर्च देण्यात यावा. (कार्यवाही- बगीचा विभाग प्रमुख )

**(०६)** दि.२५.०७.२०१० रोजीच्या श्री गुरुपौर्णिमा निमित्ताने समाधी व समाधी मंदिर परीसरात फुलांची सजावट श्री.के.सी. सुब्रामणीराजु, बंगलोर यांच्याकडुन देणगी स्वरुपात करुन घेण्यात यावी. तसेच, त्यांच्या मागणीनुसार त्यांना स्वतःकरिता साईनिवास इमारतीत १ रुम मोफत व द्वारावती इमारतीत २० रुम सेवाआकार आकारुन देण्यात याव्यात. त्यांचे दर्शनाची सोय जनसंपर्क कार्यालयामार्फत करण्यात यावी,तसेच त्यांची व त्यांचे कारागीरांची राहण्याची व जेवणाची सोय संस्थानमार्फत करण्यात यावी. (कार्यवाही- बगीचा विभाग प्रमुख )

**(०७)** मा.अध्यक्ष महोदय यांनी आजचे सभेत चर्चेचे दरम्यान असे सांगितले की, राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेतर्फे व करीता मा. कार्यकारी विश्वस्त श्री. प्रेम कलियनदास दर्यानानी यांनी मौजे रुई येथील/शिवारातील गट नंबर २९३ क्षेत्र ०७ हेक्टर ३२ आर ही जमीन संस्थानला आध्यात्मिक व शैक्षणिक संकुलाचे उभारणीसाठी नोंदणीकृत बक्षीसपत्राव्दारे दिनांक ०१ डिसेंबर, २००९ रोजी दिलेली आहे. सदर ज मिनीचे लगत असलेले काही खातेदार/जमीनमालक आपली जमीन संस्थानला खरेदी देऊ इच्छित आहेत. अशा खातेदारांच्या/जमीनमालकांच्या जमिनी विहीत पध्दतीने कायदेशीर बाबी तपासून खरेदी करणेस हरकत नाही. भविष्यात संस्थानतर्फे मौजे रुई येथील बक्षीसपत्राने मिळालेल्या जमिनीमध्ये विकास प्रकल्प साकारल्यानंतर इतर अनुषंगिक उपयोगासाठी जादा जमिनीची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे सदर जमिनी रक्कम रुपये ४५,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये पंचेचाळीस लाख मात्र) प्रति एकर या दराने खरेदी करणेस काही हरकत नाही. याकामी आवश्यकता असल्यास मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य मा. श्री. शैलेश कुटे, मा.श्री. सुरेशराव वाबळे, मा.श्री. अशोकराव खांबेकर यांनी या जमिनींची पाहणी करावी. मा. अध्यक्ष महोदय यांनी मांडलेल्या सदरहू विषयांस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०८)** मा. अध्यक्ष महोदय यांनी आजचे सभेत चर्चेचे दरम्यान असे सांगितले की, केंद्र व राज्य शासनाकडून तीर्थक्षेत्र, पर्यटन व इतर विकास कार्यक्रम योजना प्रकल्पांतर्गत शासकीय आर्थिक अनुदान/आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणेत येत असते. अशा प्रकारच्या शासकीय अनुदान प्राप्तीसाठी विहीत नमुन्यांमध्ये सर्वंकष प्रस्ताव सादर करणे आवश्यक असल्याने, या क्षेत्रात काम

करणारे पुणे येथील अभय शास्त्री असोसिएटस् (चार्टर्ड अकौंन्टटस्), पुणे यांची नियुक्ती करणे उचित राहील. याकामी मे. अभय शास्त्री असोसिएटस् (चार्टर्ड अकौंन्टटस्), पुणे यांचे प्रतिनिधींशी याबाबत प्राथमिक चर्चा झालेली आहे. सदर कामी प्रस्तावित प्रस्ताव किंमतीच्या ०२ (दोन) टक्के (अधिक सेवाकर) रक्कम सर्वसमावेशक खर्चासह सल्लागार शुल्क म्हणून मिळावे, अशी त्यांनी तोंडी विनंती केलेली आहे. याकामी संबंधीत सल्लागार संस्थेस, केंद्र अथवा राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केलेनंतर मंजूर सल्लागार शुल्कापैकी प्रथम ०१ (एक) टक्का (अधिक सेवाकर) सल्लागार शुल्क आदा करणेत यावे व उर्वरित ०१ (एक) टक्का (अधिक सेवाकर) सल्लागार शुल्क केंद्र अथवा राज्य शासनाकडून अशा प्रकारचे आर्थिक अनुदानाचे प्रस्ताव मंजूर होऊन, त्याप्रमाणे मंजूर रक्कम संस्थान व्यवस्थापनाला प्राप्त झालेनंतर, असे एकूण ०२ (दोन) टक्के (अधिक सेवाकर) सल्लागार शुल्क आदा करणेत यावे. तसेच याकामी लागणारे आवश्यक कागदपत्रे, नकाशे आदि संकलित करणेसाठी येणाऱ्या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली. मा. अध्यक्षसाो. यांनी मांडलेल्या सदरहू विषयांस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

वरील निर्णय क्र ५१८ ते ६११ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)